सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, ४ जानेवारी २०२५। युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक ५९ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


## ▶▶ महत्त्वाचे...

### वैद्यकीय जागा रिक्त राहू शकत नाहीत

**नवी दिल्ली :** देशात एकीकडे चांगल्या डॉक्टरांची वानवा असताना दुसरीकडे सुपर स्पेशालिटीच्या जागा रिक्त राहतात, हे दृश्य अतिशय खेदजनक आहे. वैद्यकीय तूट भरून काढणे गरजेचे असल्याने या जागा रिक्त राहू शकत नाहीत, असे ठणकावत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला यासंदर्भात कडक दिशानिर्देश जारी केले आहेत. न्यां भूषण गवई आणि न्या. के. व्ही. विश्वनाथन् यांच्या न्यायासनाने म्हटले की, एप्रिल २०२३ मध्ये वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या जागा रिक्त राहिल्या. या जागा भरणे अत्यावश्यक होते. तरी त्या ठिकाणी विद्यार्थी मिळाले नाहीत.

### ग्रुप डी पदाचे शैक्षणिक पात्रता निकष शिथिल

**नवी दिल्ली :** रेल्वे बोर्डाने ग्रुप डी पदासाठी शैक्षणिक पात्रता निकष शिथिल केले आहेत. नवीन नियमानुसार, या पदासाठी दहावी उत्तीर्ण किंवा आयटीआय डिप्लोम ाधारक किंवा समतूल्य शिक्षण किंवा राष्ट्रीय अप्रेंटिसशिप प्रमाणपत्र असणे गरजेचे आहे. यापूर्वी दहावी परीक्षा उत्तीर्ण आणि आयटीआय प्रमाणपत्र असणे या पदासाठी आवश्यक होते. २ जानेवारी रोजी रेल्वे बोर्डाने सर्व विभागांना पत्र पाठवून शैक्षणिक पदाच्या निकषासंदर्भात माहिती दिली.

### अजय कुमार भल्ला मणिपूरचे राज्यपाल

**इम्फाळ :** माजी केंद्रीय गृहसचिव अजय कुमार भल्ला मणिपूरचे १९ वे राज्यपाल म्हणून नियुक्त झाले आहे. शुक्रवारी राजभवनात उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश डी. कृष्णकुमार यांनी भल्ला यांना गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी मुख्यमंत्री एन. बिरेनसिंग उपस्थित होते. शपथविधीनंतर भल्ला यांच्या नियुक्तीचे स्वागत करताना मुख्यमंत्री बिरेनसिंग म्हणाले, वास्तविक परिस्थितीची जाणीव असलेले आणि वेगवान निर्णय घेणारे अशी त्यांची ओळख आहे.

# परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र पुन्हा अव्वल

**सहा महिन्यांत १ लाख १३ हजार २३६ कोटींची गुंतवणूक | वार्षिक सरासरीच्या ९५ टक्के एफडीआय अवघ्या ६ महिन्यांत**

◆ **मुंबई, ३ जानेवारी**

२०२४-२५ या आर्थिक वर्षातील सप्टेंबरला संपलेल्या दुसऱ्या तिमाहीत, अवघ्या सहा महिन्यांत १ लाख १३ हजार २३६ कोटी रुपये इतकी परकीय गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात झाली असून, परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र पुन्हा एकदा अव्वल ठरला आहे.



**वर्षनिहाय महाराष्ट्रातील गुंतवणूक**

| | | |
|---|---|---|
| २०२०-२१ | : | १,१९,७३४ कोटी |
| २०२१-२२ | : | १,१४,९६४ कोटी |
| २०२२-२३ | : | १,१८,४२२ कोटी |
| २०२३-२४ | : | १,२५,१०१ कोटी |
| २०२४-२५ (एप्रिल ते सप्टेंबर) | : | १,१३,२३६ कोटी |

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या एक्स अकाऊंटवरून याबाबतची माहिती दिली. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये 'मी महाराष्ट्राचे मन:पूर्वक अभिनंदन करतो...' माझे सहकारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि संपूर्ण मंत्रिमंडळाच्या नेतृत्वात आपल्या महाराष्ट्राची ही घौडदौड अशीच कायम राहील, अशी ग्वाही देतो, असे नमूद केले.

गेल्या ४ वर्षांतील सरासरी पाहिली तर १ लाख १९ हजार ५५६ कोटी रुपये वार्षिक गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. याचाच अर्थ, संपूर्ण वर्षभराच्या ९४.७१ टक्के गुंतवणूक फक्त ६ महिन्यांत आली आहे.

परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्राखालोखाल कर्नाटक दुसऱ्या क्रमांकावर आहे. गुजरातमध्ये ३३ हजार ६० कोटी एवढी गुंतवणूक झाली असली तरी, ते राज्य महाराष्ट्राच्या कोसोदूर आहे. तिसऱ्या क्रमांकावर गुजरात असून, तिथे २९ हजार ५९७ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली. राजधानी दिल्ली चवथ्या स्थानावर असून, दिल्लीत २६,८०७ कोटींची परकीय गुंतवणूक झाली.

तामिळनाडू परकीय गुंतवणुकीत पाचव्या स्थानावर असून, तिथे १३,५५३ कोटी आणि त्याखालोखाल सहाव्या स्थानावर असलेल्या तेलंगणात १२,८६५ कोटी गुंतवणूक झाली आहे. सातव्या क्रमांकावर हरयाणा असून, येथे १०,९७४ कोटी रुपयांची, त्यानंतर राजस्थानमध्ये १,२४२ कोटींची आणि सर्वांत शेवटी असलेल्या पश्चिम बंगालमध्ये ९४८ कोटी रुपयांची गुंतवणूक आली.◀ *(तभा वृत्तसेवा)*

# सोलापूरला पालकमंत्री पाटील की गोरे; रंगली चर्चा

## बीडमध्ये मुंडे बहिण-भावाचा पत्ता कट?: पालकमंत्री अजित पवार होण्याची शक्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी -**

सोलापूरच्या पालकमंत्रीपदी चंद्रकांत पाटील यांची वर्णी लागण्याची दाट शक्यता वर्तविण्यात येत असतानाच साताऱ्याचे जयकुमार गोरे यांचे नाव देखील पुढे येवू लागल्याने सोलापूरचे पालकमंत्री कोण यावरून आता राजकीय चर्चा रंगू लागल्या आहेत. दरम्यान, बीडच्या संतोष देशमुख हत्याकांडामुळे अवघ्या महाराष्ट्राचे राजकारण तापले आहे. या घटनेमुळे बीड जिल्ह्यातील कथित गुन्हेगारीचा मुद्दा चव्हाट्यावर आला आहे. ही गुन्हेगारी म ोडून काढण्यासाठी सर्वपक्षीय आमदारांनी बीडचे पालकत्व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किंवा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घ्यावे अशी मागणी केली आहे. त्यावर अजित पवारांनी यासंबंधी सकारात्मकता दर्शवल्याची माहिती आहे. याम ुळे या प्रकरणी मंत्री धनंजय मुंडे व त्यांच्या भगिनी पंकजा मुंडे यांचा पत्ता कट झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची गत ९ डिसेंबर रोजी निर्घृण हत्या झाली. या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचे विश्वासू वाल्मीक कराड यांचे नाव आले आहे. त्यामुळे धनंजय मुंडे यांना चौफेर टीकेचा सामना करावा लागत आहे. विशेषतः बीडमधील सर्वपक्षीय आमदारांनी या प्रकरणी त्यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरल्याम ुळे त्यांच्या अडचणी वाढल्या आहेत.





या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी बीडचे पालकमंत्रीपद स्वीकारण्याची तयारी दर्शवल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. बीडच्या पालकमंत्रीपदावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात चर्चा झाली आहे. या चर्चेत बीडचे पालकमंत्रीपद धनंजय मुंडे किंवा त्यांच्या भगिनी मंत्री पंकजा मुंडे यांना न देण्यावर मतैक्य झाल्याची माहिती आहे. विशेषतः बीडम ध्ये घडणाऱ्या चुकीच्या गोष्टींवर अंकुश ठेवण्यासाठी स्वतः अजित पवार या जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारतील, असा दावा एका मराठी वृत्तवाहिनीने केला आहे. विशेष म्हणजे राज्य मंत्रिमंडळाच्या विस्ताराला दोन आठवड्यांचा कालावधी लोटला आहे.

पण अद्याप जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची घोषणा झाली नाही. सत्ताधारी महायुतीमधील घटकपक्षांमध्ये सध्या या प्रकरणी सल्लामसलत सुरू असल्यामुळे या प्रकरणी विलंब होत असल्याची माहिती आहे. दरम्यान मंत्रीपदाच्या राजीनाम्याची मागणी मंत्री धनंजय मुंडे यांनी फेटाळली आहे.

# मी देखील शिशमहल बांधू शकलो असतो : मोदी

**नवी दिल्ली :** दिल्लीतील दहा वर्षांची आपची राजवट दिल्लीतील जनतेसाठी एकप्रकारची 'आप'दा होती, या शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज आप आणि या पक्षाचेचे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांच्यावर घणाघाती हल्ला चढवला. उत्तर दिल्लीच्या अशोकविहारस्थित रामलीला मैदानावरील झोपडीत राहणाऱ्या लोकांना स्वाभिमान अपार्टमेंट हस्तांतरित करण्याच्या कार्यक्रमात मोदी बोलत होते. या कार्यक्रमातून मोदी यांनी दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा शुभारंभ केला. दिल्लीतील झोपडपट्ट्यांत राहणाऱ्यांना पक्के घर निश्चितच मिळेल, आज नाही तर ते उद्या मिळेल, पण मिळाल्याशिवाय राहणार नाही, असे ते म्हणाले.


शिशमहलच्या मुद्यावरून केजरीवाल यांच्यावर हल्ला चढवताना मोदी म्हणाले की, देशातील जनतेला हे माहीत आहे की, मोदींनी स्वत:साठी कधीच घर बनवले नाही, पण गेल्या दहा वर्षांत ४ कोटी जनतेचे घराचे स्वप्न पूर्ण केले. मी सुद्धा माझ्यासाठी शिशमहल बांधू शकलो असतो, पण झोपडपट्टीत राहणाऱ्यांना पक्के घर मिळावे, हेच माझे स्वप्न होते.

# फडणवीस-भुजबळांचा एकाच गाडीतून प्रवास

### भुजबळ अजित पवारांची साथ सोडणार का?

### शरद पवारांसोबतही कार्यक्रमात एकत्र







**सातारा :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नाराज असलेले ज्येष्ठ नेते छगन भुजबळ या दोघांची आज पुन्हा एकदा भेट झाली आहे. सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सातारा जिल्ह्यात आयोजित कार्यक्रमाच्या निमित्ताने या दोन्ही नेत्यांनी एकाच गाडीतून प्रवास केला. इतकेच नाही तर या कार्यक्रमात झालेल्या भाषणात छगन भुजबळ यांनी देवेंद्र फडणवीस यांचे तर फडणवीस यांनी छगन भुजबळ यांचे कौतुक केले. दरम्यान शरद पवार आणि छगन भुजबळ देखील दुसऱ्या एका कार्यक्रमात एकत्र होते. एकूणच भुजबळांची राजकीय दिशा काय असणार आणि ते अजित पवारांची साथ सोडणार का, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

मंत्रिमंडळ स्थान न मि ळाल्याने छगन भुजबळ हे नाराज आहेत. त्यांनी आपली नाराजी उघडपणे व्यक्त केली होती. मात्र त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना भुजबळ यांनी फडणवीस आपल्याशी नंतर चर्चा करणार असल्याचे सांगितले होते. त्या भेटीनंतर आज पुन्हा या दोन्ही नेत्यांची भेट झाली आहे. मात्र या भेटीत दोघांमध्ये काय चर्चा झाली? याची माहिती अद्याप समोर आलेली नाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत या कार्यक्रमात भुजबळ तसेच मंत्रिमंडळातील सदस्य पंकजा मुंडे, शंभूराज देसाई, शिवेंद्रसिंहराजे भोसले, जयकुमार गोरे, मकरंद पाटील, आदिती तटकरे आणि काही आमदार उपस्थित होते. छगन भुजबळ यांच्याशी आपली चर्चा झाली त्यानुसार काय नेमकी चर्चा झाली असे विचारले असता मुख्यमंत्री फडणवीस यांनी सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांचे कार्य पुढे नेण्याची व समता युक्त समाज तसेच संविधान प्रेमी समाज कसा निर्माण करता येईल यासाठी काय करावे लागेल याविषयी छगन भुजबळ यांच्याशी चर्चा झाल्याचे आणि दुसरी कोणतीही चर्चा झाली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नायगाव येथील सावित्रीबाई फुले यांच्या स्मारका अभिवादन केल्यानंतर सावित्रीबाई फुले यांच्या मुळ घरी उभारलेल्या चित्र प्रदर्शनाची व घरातील वस्तूंची पाहणी केली. स्मारक चांगल्या पद्धतीने व्हावे यासाठी आमचे प्रयत्न असल्याचे ते म्हणाले. दरम्यान सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्तच्या दुसऱ्या एका कार्यक्रमात छगन भुजबळ आणि शरद पवारही एकत्र आले होते हे विशेष होय.

# एसआयटी अहवाल आल्यानंतर धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याबद्दल निर्णय

### मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचे पंढरपुरात संकेत

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ जानेवारी-**

एसआयटी अहवाल आल्यानंतर धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबद्दल निर्णय होईल, असे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले.





राज्याचे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील हे गुरुवारी पंढरपुरात आले होते. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर म हाराज जळगावकर, व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल- रुक्मि णीची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी भाजपाचे प्रणव परिचारक, माऊली हळणवर, सुभाष मस्के, तमीम सय्यद, अक्षय वाडेकर, उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, जलसंपदा विभागाचे अधिक्षक अभियंता श्री खांडेकर, प्र. तहसीलदार सचिन मुळीक, कार्यकारी अभियंता सोम शेखर हरसुरे, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड उपस्थित होते. विखे-पाटील म्हणाले, दोन पवार एकत्र यावे अथवा न यावे हा त्यांचा कौटुंबिक विषय आहे. कोणी यासाठी काय साकडे घालावे ही त्यांची इच्छा आहे. याबाबत व्यक्तीशः टिपणी करणे उचित राहणार नाही. महायुतीच्या सरकारमध्ये मंत्री मंडळात खाते वाटप झाल्यावरून कोणतीही नाराजी नाही. जलसंपदा खाते विभागून दिल्याने आपण नाराजी नाही. या खात्यात काम करण्यास खूप वाव आहे. नदी जोड प्रकल्प, तसेच गोदावरी खोरे यात काम करण्यास वाव आहे. महापालिका, जिल्हा परिषद निवडणूक महायुती एकत्रपणे लढणार आहे. आधी दिलेले १० टक्के आरक्षण कायम आहे. मनोज जरांगे यांनी सरकारला वेळ दिला पाहिजे. लगेच उपोषणाला बसू नये, असे मत मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी व्यक्त केले.

# १५ जानेवारीला नौदलाला मिळणार नवी शक्ती



### पंतप्रधानांच्या उपस्थितीत युद्धनौका, विनाशिका, पाणबुडीचे जलावतरण

**मुंबई, ३ जानेवारी**

एकाचवेळी अनेक लढाऊ हेलिकॉप्टर्स उतरू शकणारी शस्त्रसज्ज अशी नीलगिरी, शत्रूला नेस्तनाबूत करण्याची क्षम ता बाळगणारी प्रोजेक्ट १५ बी सुरत विनाशिका आणि शत्रूच्या हालचालींची माहिती टिपणारी पाणबुडी वागशीर अशा युद्धनौका, विनाशिका आणि पाणबुडी भारतीय नौदलात १५ जानेवारीला दाखल होणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.

युद्धनौका, विनाशिका, पाणबुडी स्वदेशी बनावटीच्या आहेत. मुंबईतील नेव्हल डॉकयार्ड येथे होणाऱ्या समारंभात या युद्धनौका आणि पाणबुडी कार्यान्वित होणार आहे. क्षेपणास्त्रनाशक सुरत विनाशिका, स्टेल्थ फ्रिगेट निलगिरी या युद्धनौकांसह पाणबुडी वाघशीर अत्याधुनिक शस्त्रे आणि सेन्सर्सने सुसज्ज असून, यामुळे नौदलाला नवी शक्ती मिळणार आहे. दोन्ही युद्धनौकांमध्ये मोठ्या संख्येने महिला अधिकारी आणि खलाशांसाठी विशेष व्यवस्था आहे. १५ जानेवारीला होणारा हा ऐतिहासिक कार्यक्रम भारतीय नौदलाच्या लढाऊ क्षमतेत वाढ करेल, असे नौदलाच्या निवेदनात म्हटले आहे.






# जनमंगल पतसंस्थेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ जानेवारी-**

मीठ गल्ली येथील जनमंगल महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या २०२५ या वर्षातील नूतन दिनदर्शिकेचे प्रकाशन महाराष्ट्र राज्याचे पुणे विभागाचे माजी सहकार आयुक्त शैलेश कोतमिरे यांच्या हस्ते करण्यात आले. पुणे येथे हा प्रकाशन सोहळा पार पडला. यावेळी कोतमिरे यांनी जनमंगल पतसंस्थेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करून पतसंस्थेने अधिकाधिक प्रगती साधावी, असे आवाहन केले. यावेळी पतसंस्थेच्या अध्यक्षा सविता थोरात, उपाध्यक्षा नयना पलंगे, सचिवा प्रीती कांबळे, सहसचिवा मनीषा मोरे, पतसंस्था व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष कानिफनाथ थोरात, सहसचिव विशाल मोरे, संस्कार पलंगे आदी उपस्थित होते.

# भीमा-सीना जोडकालव्याच्या सर्वेक्षणाला मान्यता

## ५३ कि.मी. परिसरातील शेतकऱ्यांना होणार फायदा

## आ. सुभाष देशमुख यांच्या प्रयत्नांना यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील भीमा सीना जोडकालव्याच्या सर्वेक्षणाला कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कार्यकारी संचालकांनी बुधवारी मान्यता दिली आहे. त्यामुळे लवकरच या कामाचे सर्वेक्षण होणार असल्याची माहिती जलसंपदाचे अधीक्षक अभियंता धीरज साळे यांनी दिली. आ. सुभाष देशमुख यांनी महायुती सरकारच्या काळात याबाबत वारंवार पाठपुरावा केला होता, अखेर त्याला यश आले आहे.

विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने भीमा सीना नदीजोड प्रकल्पास मंजुरी दिली होती. महायुती सरकारने ०.५११ टीएमसी पाण्याच्या तरतुदीस मंजुरी दिली होती. आता या प्रकल्पाच्या सर्वेक्षणास कृष्णा खोरे विकास महामंडळाने मान्यता दिली आहे. आता अंदाजपत्रक तयार करून निविदा काढण्यात येणार असून त्यानंतर त्याचे सर्वेक्षण केले जाणार आहे.

पावसाळ्यात वडापूर येथील भीमा नदीतून



खालच्या भागात जवळपास ६० ते १०० टीएमसी पाणी वाहून जाते. वडापूर येथे भीमा नदीवर बॅरेज बांधून हे पाणी बोगद्याद्वारे अकोले मंद्रूप येथे सीना नदीत सोडण्याचे नियोजन आहे. याद्वारे १४.४७ दशलक्ष घनमीटर पाणी सीना नदीत येणार आहे. वाहून जाणारे पाणी दुष्काळी भागाकडे वळविण्यात येणार असल्याने सिंचनासाठी बारमाही पाणी उपलब्ध होणार आहे. सीना नदीवरील एकूण ५३ किलोमीटर लांबीच्या परिसरातील शेतकर्यांना सिंचनासाठी पाणी मिळणार आहे. सीना नदीवरील नंदूर, वडकबाळ, सिंदखेड, बंदलगी, कोर्सेगाव व कुडल येथे कोल्हापूर पध्दतीच्या सहा बंधार्यांत उजनी धरणाचे पाणी उपलब्ध होणार आहे. या जोडकालव्याची लांबी १८ किलोमीटर असून अकोले मंद्रप ते कुडल संगमपर्यंतचे अंतर ३५ किलोमीटर आहे.

### या गावांना होणार फायदा

या वाढीव ०.५११ टीएमसी पाण्यामुळे नंदूर, डोणगाव, तेलगाव, अकोले मंद्रूप, गुंजेगाव, पाथरी, वांगी, मनगोळी, वडकबाळ, वांगी, हत्तूर, समशापूर, सिंदखेड, बिरनाळ, चंद्रहाळ, होनमुर्गी, बंदलगी, औराद, राजूर, संजवाड, चिंचोळी, कोर्सेगाव, कुमठा, केगाव, हत्तरसंग, बोळकवठा, कल्लकर्जाळ या गावांत बागायती क्षेत्र वाढणार आहे.



भीमा - सीना नदीजोड प्रकल्पासाठी सातत्याने राज्य सरकारकडे पाठपुरावा केला. त्यामुळे विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने याला मंजुरी दिली. आता सर्वेक्षणाला मान्यता मिळाली आहे. लवकरच या प्रकल्पाचे सर्वेक्षण होणार आहे. हा प्रकल्प लवकर मार्गी लागण्यासाठी प्रयत्नशील आहे.

**- सुभाष देशमुख, आमदार, सोलापूर दक्षिण**

# मुंबई-सोलापूर वंदे भारत एक्स्प्रेसवर दगडफेक

## भाळवणी रेल्वे स्थानकाजवळील घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी -**

मुंबई ते सोलापूर वंदे भारत एक्स्प्रेसवर भाळवणी रेल्वे स्थानकाजवळ दगडफेक करण्यात आली आहे. ही घटना गुरुवारी रात्री साडेनऊच्या सुमारास घडली असून यामध्ये खिडकीच्या काचा फुटल्या असून प्रवाशांना कोणतीही इजा झाली नाही.

मुंबई-सोलापूर वंदे भारत रेल्वे गाडी क्र. २२२२५ ही गुरुवारी रात्री साडेनऊच्या सुमरास जेऊर-कुर्डूवाडी सेक्शनमधील भाळवणी स्थानकाजवळ आल्यानंतर अज्ञात व्यक्तींनी गाडीवर दगडफेक केली. यामध्ये वंदे भारतचा कोच क्र. सी ११ मधील सीट क्र. २ आणि ३ च्या खिडकीच्या काचा फुटल्या. या घटनेत प्रवाशांना कोणतीही इजा झाली नाही. याप्रकरणी दगडफेक करणाऱ्यांचा रेल्वे पोलिसांकडून शोध घेतला जात आहे. याआधीही याच परिसरात वंदे भारत रेल्वे गाडीवर दगडफेक करण्यात आल्याच्या



घटना घडल्या आहेत. दगडफेकीच्या घटनांना आळा घालण्यासाठी रात्रीच्यावेळी या परिसरात रेल्वे रूळालगत गस्त वाढविण्याचा निर्णय रेल्वे सुरक्षा दलाने घेतला आहे.

## संक्षिप्त वृत्त

### बार्शी रोडवरील सुखसागर बारमध्ये दोन मुलींना मारहाण

**सोलापूर, दि. ३ जानेवारी -**

सोलापूर ते बार्शी रोडवरील भोगाव परिसरातील सुखसागर बारमध्ये मुलींना पैशाच्या व्यवहारातून मारहाण करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. आलिया अब्दुल खान (वय २७) आणि माहिम कनक देवनान (वय १७, दोघी रा. शिवाजी नगर, बाळे) अशी जखमी मुलींची नावे आहेत. त्यांच्यावर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार करण्यात आले. सोलापूर ते बार्शी रोडवरील बार्शी टोळ नाक्याच्या पुढे असलेल्या सुखसागर बारमध्ये ३ जानेवारी रोजी पहाटे पाचच्या सुमारास आलिया खान व माहिम देवनान या रुममध्ये बसल्या होत्या. त्यावेळी पैशाच्या व्यवहारातून मिथून राठोड, भैय्या पाटील व इतर दोघांनी मिळून आलिया व माहिम या दोघींना लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण केली. त्यामुळे दोघीं स्वतः जखमी अवस्थेत पहाटे पावणे सहाच्या सुमारास सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल झाल्या असून याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### दुचाकीवरून पडून तरूण जखमी

**सोलापूर, दि. ३ जानेवारी -**

ऑफिसर क्लबजवळील इंपिरियल हॉलजवळ स्पिड ब्रेकरवर दुचाकी आदळून दुचाकीवरून पडून तरूण जखमी झाला. महेश मोहनसिंग लग्गेवाले (वय २५, रा. बेडर पूल, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. २ जानेवारी रोजी रात्री पावणे बाराच्या सुमारास महेश लग्गेवाले हा कुमठा नाका ते बेडर पूल असे दुचाकीवरून येत होता. त्यावेळी इंपिरियल हॉलजवळ स्पीड ब्रेकरवर दुचाकी आदळून दुचाकीवरून पडल्याने महेश याच्या डोक्यास मार लागून जखमी झाला. त्यामुळे त्यास शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### आयटीआय चौकीसमोर स्पीड ब्रेकरवर आदळून पडल्याने दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि. ३ जानेवारी -**

आयटीआय चौकीसमोर स्पीड ब्रेकरवर आदळून पडल्याने दुचाकीस्वार जखमी झाला. राकेश सुरेश शिवशरण (वय ३२, रा. सैफुल, कित्तुर चनम्मा नगर, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. ३ जानेवारी रोजी मध्यरात्रीच्या सुमारास राकेश शिवशरण हे सैफुल ते बुधवार पेठ असे दुचाकीवरून जात होते. त्यावेळी आयटीआय चौकीसमोर स्पीड ब्रेकरवर दुचाकी आदळून पडल्याने राकेश यांच्या डोक्यास मार लागल्याने त्यांना मित्र कमलेश घोरपडे यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### गरम पाण्याचे हिटर फुटल्याने तरूण जखमी

**सोलापूर, दि. ३ जानेवारी -**

श्रीपूर (ता. माळशिरस) येथे गरम पाण्याचे हिटर फुटल्याने तरूण जखमी झाला. रामेश्वर सुनिल मगर (वय ३०, रा. श्रीपूर) असे जखमीचे नाव आहे. ३ जानेवारी रोजी मध्यरात्रीच्या सुमारास राहत्या घरी रामेश्वर हे झोपले असताना बाजूला कट्ट्यावर गरम पाण्याचे हिटर चालू होते. ते हिटर अचानक फुटल्याने गरम पाणी रामेश्वर यांच्या अंगावर पडून त्यामध्ये ते भाजून जखमी झाले. त्यामुळे त्यांना सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### शेटफळ येथे रस्ते अपघातातील जखमीचा मृत्यू

**सोलापूर, दि. ३ जानेवारी -**

सोलापूर ते पुणे महामार्गावरील शेटफळ ब्रीजखाली रस्ते अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. दादा राजाराम शिवपुजे (वय ४०, रा. माहिती नाही) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. ३ जानेवारी रोजी सकाळी शेटफळ ब्रिजखाली रस्ते अपघातात जखमी व बेशुध्दावस्थेत दादा शिवपुजे हे मिळून आल्याने त्यांना १०८ रुग्णवाहिकेतील डॉ. प्रदीप पाटील यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु, शिवपुजे यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. ओंकार तलकोकुल यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### नागनाथ आदोने यांचे निधन



**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

गुरूवार पेठ येथील कापड व्यापारी व सामाजिक कार्यकर्ते नागनाथ व्यंकोबा आदोने (वय ७४) यांचे गुरूवार दि. २ जानेवारी रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांचेवर पार्थिवार शुक्रवारी अक्कलकोट रोड येथील भावसार समाज स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात बंधू, भगिनी, तीन मुले, व एक मुलगी व पुतणे, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# माळशिरस येथे जबरी चोरी; २ लाख २४ हजारांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि.३ जानेवारी-**

माळशिरस येथे गुरुवारी मध्य रात्रीच्या सुमारास श्रीकांत गायकवाड यांच्या घरी धारदार हत्याराची दाख दाखवत सुमारे २ लाख २४ हजार रुपयाचे सोने, चांदीचे दागिने लंपास केल्याची घटना घडली आहे. या गुन्ह्याची तक्रार श्रीकांत गायकवाड यांनी माळशिरस पोलिसात दिली आहे.

याबाबत माहिती अशी की श्रीकांत गायकवाड हे माळशिरस शहरालगत गायकवाड वस्ती याठिकाणी राहत असून काल रात्री साडे बारा ते एकच्या सुमारास अज्ञात चार इसमाने त्यांच्या घराचा दरवाजा कटावणीने तोडून घरामध्ये प्रवेश केला.या दरवाजा तोडण्याच्या आवाजाने गायकवाड यांच्या पत्नी नंदा या ओरडल्या त्यावेळी या अज्ञात चोरत्याने गप्प बस म्हणून दम दिला.तसेच मला शांत राह नाहीतर जिवंत ठेवणार नाही असे म्हणून गालावर चार पाच चापटा मारल्या व गळ्याला लोखंडी हत्यार लावून गळ्यातील मंगळसूत्र व कानातील कर्णफुले व हातातील अंगठी काढून घेतली.तुमचेकडे पैसे आहेत. ते कुठे ठेवले आहेत ते सांगा असा दम दिला.त्यापैकी एकाने देवघरा जवळ जावून चांदीचे देव घेतले.त्याच बरोबर कपाटातील दागिने नेहले.यामध्ये पन्नास हजार किमंतीची अंगठी,पन्नास हजार किमतीचे मंगळसूत्र,पन्नास हजार किमतीचे कर्णफुले,पंचवीस हजार किमतीची सोन्याची ठुसी,पंधरा हजार किमितीची अंगठी, पंचवीस हजार किंमतीचे चांदीचे ऐवज व नऊ हजार किंमतीचे बेन टेक्स घटन असा २ लाख २४ हजार ऐवज लंपास केला असून याबाबत श्रीकांत गायकवाड यांनी माळशिरस पोलिसात गुन्हा दाखल केला असून, त्यानुसार पोलीस निरीक्षक नारायण पवार व त्याच्या सहकाऱ्यांनी श्वान पथकाला पाचारण केले. श्वान पथक घरा पासून शेतातून जाऊन रस्त्या जवळ गुठमळले. तपास पोलीस निरीक्षक नारायण पवार करीत आहे.



# वैराग खून प्रकरणी चौघे निर्दोष

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ३ जानेवारी -**

चोरीच्या सोन्यावरून सुरू असलेली भांडणे सोडवणाऱ्या वैराग (ता.बार्शी) येथील युवकाचा खून केल्याप्रकरणी बार्शी येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्हि के मांडे यांनी चौघांची निर्दोष मुक्तता केली. हा खून २ एप्रिल २०२२ रोजी वैराग येथे सोलापूर रोडवर असलेल्या एका चप्पलच्या दुकानात झाला होता.

मिथुन दादाराव साळवे, अखिल याकुब शेख, जुबेर आयुब शेख ( तिघेही रा. वडवणी, तालुका वडवणी, जिल्हा बीड) आणि हरी मोहन केकडे (रा. वैराग, तालुका बार्शी, जिल्हा सोलापूर) अशी या प्रकरणात निर्दोष मुक्तता झालेल्या आरोपींची नावे आहेत.

दिनांक २ एप्रिल २०२२ रोजी मिथुन साळवे, जुबेर शेख आणि अखिल शेख हे चोरीच्या सोन्यावरून हरि मोहन केकडे यास वैरागमध्ये मारहाण करत होते. त्यावेळी वैराग येथील पप्पू उर्फ सचिन महादेव पवार यांनी ही भांडणे सोडवली होती. दरम्यान हा प्रकार समजल्यानंतर संतोष सिद्धलिंग गणेचारी (वय ५६, रा.वैराग) यांनी पप्पू उर्फ सचिन पवार यास फोन करून विठ्ठल कांबळे यांच्या सोलापूर रोडवरील चप्पल दुकानात बोलावून घेतले असता अखिल शेख, मिथून साळवे आणि जुबेर शेख यांच्यासह पप्पू उर्फ सचिन पवार त्या ठिकाणी आला. त्यावेळी विठ्ठल कांबळे यांच्या दुकानात विठ्ठल कांबळे यांच्यासह सुनील धोकटे, चंद्रकांत कावरे व संतोष गणेचारी यांनी त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र पप्पू आणि अन्य तिघांमधील वाद वाढत गेला. त्यावेळी पप्पू उर्फ सचिन पवार यांनी कोणत्यातरी पोलिसाला फोन करून चोरीच्या सोन्यासंदर्भात माहिती दिली. त्यावेळी अखिल आयुब शेख याने चप्पलच्या दुकानात असलेला लाकडी ठोकळा उचलून सचिन पवार यांच्या डोक्यात मारहाण करण्यास सुरुवात केली. मिथुन दादाराव साळवे याने चप्पलच्या दुकानातील रापीने वार केला तर जुबेर आयुब शेख याने लाथाबुक्क्याने मारून सचिन पवार यास खाली पाडले. सचिन पवार रक्ताच्या थारोळ्यात पडल्यानंतर त्याचीच मोटरसायकल घेऊन तिने आरोपी घटनास्थळावरून पळून गेले होते. दरम्यान जखमी अवस्थेतील सचिन पवार यास त्याचा भाऊ सुरेश पवार आणि आई यांनी तात्काळ उपचारासाठी सोलापुरातील एका खाजगी रुग्णालयात दाखल केले. उपचारादरम्यान दुसऱ्या दिवशी म्हणजे ३ एप्रिल २०२२ रोजी पप्पू उर्फ सचिन पवार यांचा मृत्यू झाला होता.



याप्रकरणी मयत सचिनचा भाऊ सुरेश महादेव पवार यांनी हरी केकडे यांच्या सांगण्यावरून इतर आरोपींनी सचिन पवार याचा खून केला अशी फिर्याद दिली होती. या फिर्यादीवरून चारही आरोपींवर वैराग पोलीस स्टेशन येथे खून आणि मोटार सायकल चोरून नेल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात चारही आरोपींना अटक करून तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे यांनी आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले होते.या खटल्याची सुनावणी बार्शी येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही.के. मांडे यांच्यासमोर झाली. सुनावणी दरम्यान फिर्यादी सुरेश पवार यांच्यासह चार नेत्र साक्षीदार आणि तपासी अंमलदार सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे यांच्या साक्षी नोंदवण्यात आल्या. फिर्यादी सुरेश पवार आणि नेत्र साक्षीदार यांच्या साक्षीमध्ये असलेली तफावत आणि आरोपींच्या वकिलांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही. के. मांडे यांनी या प्रकरणातील चारही आरोपींची निर्दोष मुक्तता केली. या खटल्यात सरकारतर्फे अॅड. दिनेश देशमुख यांनी तर आरोपी केकडे यांच्यावतीने अॅड. राजकुमार नरुटे, अॅड. राजकुमार बाबरे, अॅड. एम. ए. लांडगे आणि आरोपी साळवे, आखिल शेख आणि जुबेर शेख यांच्या वतीने अॅड प्रशांत एडके, अॅड. सुहास कांबळे आणि अॅड. आकाश तावडे यांनी काम पाहिले.




# वाचन संकल्प महाराष्ट्र व सिद्धोत्सवाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

श्री सिध्देश्वर देवस्थान संचलित श्री सिध्देश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक मध्ये ''सिद्धोत्सव २०२५'' चे उद्घाटन वैशाली अघोर व योगेश इंडी यांच्या हस्ते दीप्रज्वलनाने करण्यात आले. विद्यार्थिनीच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी पूर्ण आठवडा सिद्धोत्सव साजरा करण्यात येणार आहे व तसेच वाचन संकल्प महाराष्ट्र ही संकल्पना १ ते १५ जानेवारीमध्ये राबवण्यात येईल.

यावेळी आपल्या प्रेरणादायक भाषणात, वैशाली आघोर यांनी म्हणाल्या, ''पुस्तक हा छंद म्हणून जगण्यापेक्षा सवास स्वास म्हणून जागा.'',पुस्तक वाचन फक्त एक व्यक्तिगत आनंद किंवा छंद नसून, त्यातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या व व्यक्तिगत भल्यासाठी करणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षणाच्या युगात ज्ञान प्राप्ती केवळ व्यक्तिगत उद्देशांसाठी न करता, समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी उपयोगी व्हावी, असे त्यांनी सांगितले. स्पोर्ट्स मैदान उद्घाटन प्रसंगी योगेश इंडि यांनी खेळाचे महत्व सांगून सर्व विद्यार्थिनी ना शुभेच्छा दिल्या.

प्राचार्य गजानन धरणे यांनी स्वागत करून सर्व विद्यार्थिनीना जास्तीत जास्त सहभाग होण्याचे आव्हान केले. सिद्धोत्सव २०२५ या मध्ये टेक्निकल व स्पोर्ट्स इवेंट मध्ये विविध स्पर्धा आयोजित करण्यात आले आहे, असे संस्कृतीक विभाग प्रमुख सुचिता चौधरी यांनी प्रास्तविकात सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्कृति झंवर व भाग्यलक्ष्मी सुतार या विद्यार्थिनीनी केले. कार्यक्रमाच्या प्रसंगी डॉ. नीता अळंगे, डॉ. अविनाश पाटील, प्रमोद शिवगुंडे, नवनाथ माने, प्रतिभा पाटील, अतुल कंदले, श्रीशैल माळेवडी, कोमल चिट्टे, अमृता दौलताबाद व ग्रंथपाल रेणुका इरशेट्टी उपस्थित होते.

# चोरीस गेलेला जेसीबी कर्नाटकातून हस्तगत

## सोलापूर तालुका पोलिसांची कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी -**

तिऱ्हे तांडा (ता.उत्तर सोलापूर) येथून चोरीस गेलेला ३० लाख रुपये किंमतीचा जेसीबी सोलापूर तालुका पोलिसांनी कर्नाटकातून हस्तगत केला असून याप्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक केली आहे.

अब्बास अली दाऊद साब हेरुर (वय २४, रा. येद्रामी, ता. जेवरगी, जि. कलबुर्गी), बाशाखान अल्लाबक्ष नाईक (वय २५, रा. विडी घरकुल बी, कुंभारी), आकाश अशोक सुतार (वय ३२, रा. सुतार गल्ली, पडळी खुर्द ता. करवीर जि.कोल्हापूर, सध्या रा. हत्तुर वस्ती विमानतळ जवळ होटगी रोड सोलापूर) अशी त्यांची नावे आहेत. १७ डिसेंबरच्या रात्री विश्वराज लालु राठोड (रा.ति-हे तांडा, ता. उत्तर सोलापूर) यांच्या मालकीचा ३० लाख २५ हजार रूपये किंमतीचा पिवळया रंगाचा एमएच-१३-ईके-६०७६ क्रमांकाचा जेसीबी हा कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला होता. याबाबत सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



या गुन्ह्याचा तपास करताना चोरीस गेलेला जे.सी.बी हा कर्नाटक राज्यात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून सोलापूर तालुका पोलिसांनी कर्नाटक राज्यात शोध घेतला असता त्यांना बोमनहल्ली (ता.सुरपुर, जि.यादगीर, कर्नाटक) येथुन चोरीस गेलेला जे. सी. बी. वरील तीन संशयित आरोपींना ताब्यात घेतले. या तिघांना सोलापूर तालुका पोलिसांनी गुन्ह्यात अटक करून न्यायालयात हजर केले, त्यावेळी न्यायालयाने त्यांना पोलीस कस्टडी सुनावली. या गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक सुनिल बनसोडे करीत आहेत. ही कारवाई पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलिस अधिकारी संकेत देवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश घोडके, यांची टीम करीत आहे.

# सोलापूरकरांच्या विमानसेवेविषयीच्या तीव्र भावना केंद्रीय स्तरावर पोहोचवा

## सोलापूर विकास मंचने घेतली जिल्हाधिकारी यांची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

सोलापूर विमानतळाच्या दीर्घकाळ प्रलंबित परिस्थितीमुळे सोलापूरमधील नागरिक, व्यापारी, आणि उद्योजकांमध्ये तीव्र नाराजी आहे. या नाराजीचा आवाज सोलापूर विकास मंचाच्या नेतृत्वाखाली नुकत्याच झालेल्या निदर्शनांमधून स्पष्टपणे उमटला. सोलापूर विकास मंचाचे प्रतिनिधी केतन शहा, घनश्याम दायमा, रुपाली निंबाळकर, सुनील दुस्सल, लक्ष्मीकांत दंडी, सुहास भोसले, मनोज क्षिरसागर, आणि विजय कुंदन जाधव यांनी जिल्हाधिकारी मा. कुमार आशिर्वाद यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी सोलापूर प्रवासी विमानसेवेतील सर्व अडथळे तात्काळ दूर करण्यासाठी ठोस पावले उचलण्याची मागणी केली.

त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले, विमानतळाची उपेक्षा झाल्याने सोलापूरचा विकास ठप्प झाला आहे. कृषी, उद्योग, व्यवसाय, आणि व्यापार यावर मोठा परिणाम झाला असून सोलापूरचा आर्थिक विकास अडचणीत सापडला आहे. सोलापूर विकास मंचच्या प्रतिनिधींनी इशारा दिला की, जर विमानतळाच्या कामकाजात आणखी उशीर झाला, तर



शहरातील नागरिक आणि संघटना उग्र आंदोलन करतील. यावर जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सर्व अडथळे तातडीने दूर करण्यासाठी आणि विमानतळ प्रकल्प वेगाने पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे आश्वासन दिले. दरम्यान, सोलापूर विकास मंचच्या ३० डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या आंदोलनाची दखल घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सोमवार, ०६ जानेवारी २०२५ रोजी महत्त्वपूर्ण बैठक आयोजित केली आहे. या यशस्वी प्रयत्नामुळे सोलापूर विकास मंचने सोलापूरकरांचे प्रश्न थेट राज्य आणि केंद्र सरकारपर्यंत पोहोचवले आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# चीनमध्ये नव्या व्हायरसमुळे विध्वंस

## स्मशानभूमीत जागा नाही, रुग्णालयांत गर्दी

◆ **बीजिंग, ३ जानेवारी**

२०२० मध्ये जगभरात थैमान घातलेल्या कोरोना महामारीनंतर चीन आणखी एका धोकादायक व्हायरसच्या विळख्यात सापडला आहे. ह्युमन मेटाप्न्युमोव्हायरस (एचएमपीव्ही) वेगाने पसरत आहे, ज्यामुळे रुग्णालयांमध्ये खूप गर्दी होत आहे आणि स्मशानभूमीतही जागा नसल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. या व्हायरसने चीनमध्ये कोरोनासारखा कहर केला आहे.

सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या वृत्तानुसार, या विषाणूमुळे मोठ्या प्रमाणात लोक आजारी पडत आहेत. एचएमपीव्ही, इन्फ्लूएंझा ए, मायकोप्लाझ्मा न्यूमोनिया आणि कोरोनासारखे अनेक विषाणू एकाच वेळी थैमान घालत आहेत. चीनमधील



परिस्थिती बिघडत चालली आहे आणि लोक चिंतेत आहेत की, चीन सरकार या नवीन व्हायरसबद्दल योग्य माहिती देत का नाही.

**एचएमपीव्ही व्हायरस म्हणजे काय?**

ह्युमन मेटापन्यूमोव्हायरस (एचएमपीव्ही) हा आरएनए व्हायरस आहे. २००१ मध्ये डच संशोधकांनी याचा प्रथम शोध लावला होता. हा व्हायरस प्रामुख्याने श्वसन संक्रमणास कारणीभूत ठरतो आणि खोकल्यामुळे किंवा शिंकण्याद्वारे पसरतो. संक्रमित लोकांच्या संपर्कात आल्याने देखील तो वेगाने पसरू शकतो. त्याच्या संसर्गाचा कालावधी ३ ते ५ दिवसांचा असतो आणि हिवाळ्यात हे सर्वांत सामान्य आहे. याचे मुख्य लक्ष्य मुले आणि वृद्ध आहेत. याच लोकांना कोरोना महामारीच्या काळात सर्वाधिक फटका बसला होता.

### भारतात अलर्ट जारी

कोरोनाचा धोका आता आटोक्यात आला असे वाटत असतानाच चीनमध्ये आलेल्या नव्या विषाणूने आशियाई देशांची झोप उडवली आहे. भारताच्या आरोग्य मंत्रालयांतर्गत काम करणाऱ्या नॅशनल सेंटर फॉर डिसीज कंट्रोल या आपत्तीवर लक्ष ठेवून आहे. यासंदर्भात भारतातही अलर्ट जारी झाला आहे. हिवाळ्यात या विषाणूचा वाढता प्रसार लक्षात घेता याचा फैलाव होण्याची भीती नाकारता येत नाही. ■

व्हायरसचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता आरोग्य अधिकाऱ्यांनी लोकांना मुखाच्छादन घालण्याचा, गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळण्याचा आणि वारंवार हात स्वच्छ करण्याचा सल्ला दिला आहे. (वृत्तसंस्था)



इस्त्रायलच्या भीषण हवाई हल्ल्यामध्ये पूर्णपणे उद्ध्वस्त झालेल्या गाझा शहराचा भाग. दक्षिण इस्त्रायलमधून हा विध्वंस असा दिसतो

## हरयाणात खाणमाफियांचा ईडी पथकावर हल्ला

◆ **गुरुग्राम, ३ जानेवारी**

हरयाणाच्या नूंह जिल्ह्यातील घाटा शमशाबाद गावात बेकायदेशीर खाणकामाची तपासणी करण्यासाठी गेलेल्या ईडीच्या पथकावर २५ पेक्षा अधिक लोकांनी हल्ला केला. यात ईडीचे दोन कर्मचारी जखमी झाले आहे. या प्रकरणी २२ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

फिरोजपूर झिरका पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक राकेश कुमार यांनी सांगितले की, ईडीचे पाच सदस्यीय पथक घाटा शमशाबाद येथील फिरोजपूर झिरका बीवन मार्गावरील बेकायदेशीर खाणकामाच्या तपासणीसाठी आले. त्यावेळी त्यांनी गिट्टी घेऊन जाणाऱ्या तीन ट्रॅक्टर रोखण्याचा प्रयत्न केला असता, त्यांना चिरडण्याचा प्रयत्न झाला. त्यानंतर खाणकाम सुरू असलेल्या ठिकाणी गेले असता तेथील त्यांच्यावर दगडफेक करण्यात आली. (वृत्तसंस्था)

# युनियन कार्बाईड कचऱ्याला विरोध

### पिथमपूरमध्ये पोलिसांचा लाठीचार्ज; दोन युवकांचा आत्महत्येचा प्रयत्न

◆ **धार, ३ जानेवारी**

धार जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्र असलेल्या पिथमपूरमध्ये भोपाळहून आणलेल्या युनियन कार्बाईड कचऱ्याला विरोध वाढत आहे. याच्या निषेधार्थ जाहीर करण्यात आलेल्या बंदला आज व्यापक प्रतिसाद मिळला. आंदोलकांवर पोलिसांना सौम्य बळाचा वापर करावा लागला. त्याच वेळी आंदोलनात सहभागी दोन तरुणांनी पेट्रोल ओतून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. सध्या त्यांना इंदूरच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

शुक्रवारी सकाळपासून पिथमपूरच्या बाजारपेठा बंद होत्या. चहा-पाण्याची दुकाने बंद ठेवून नागरिकांनी या बंदला पाठिंबा दिला. छोटी दुकानेही बंद होती. येथे काही बंद समर्थकांनी धनगड बसस्थानक व



युनियन कार्बाईड कचऱ्याला विरोध करताना आंदोलक

आझाद चौक गाठून रास्ता रोको करण्याचा प्रयत्न केला. तेथे आंदोलकांची पोलिस अधिकाऱ्यांशी बाचाबाची झाली. पोलिसांनी काही आंदोलकांवर लाठीमार केला, सौम्य बळाचा वापर केला आणि समुपदेशन करून त्यांना तेथून पाठवले.

गुरुवारपासून बेमुदत उपोषणाला बसलेल्या संदीप रघुवंशी यांच्या समर्थनार्थ मोठ्या संख्येने लोक येत आहेत. भेट देत असताना आमदार कमलेश दोडियार हेही आंदोलनस्थळी उपस्थित होते. मात्र, औद्योगिक परिसर सुरू असून, कर्मचारी आणि मजुरांच्या हालचालींमध्ये कोणताही अडथळा नाही. बस सेवाही सुरू आहे. परिसरात पुरेसा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

धारच्या लाठीचार्जवरून काँग्रेसने भाजपा सरकारला घेरले आहे. मध्यप्रदेशात लोकशाही उरली आहे की नाही, असा सवाल काँग्रेसने केला. पिथमपूरमध्ये युनियन कार्बाईडने विषारी कचरा जाळल्याच्या निषेधार्थ तरुणांवर लाठीचार्ज, एमपीपीएससीच्या निषेधार्थ तरुणांना तुरुंगात डांबले. हे सरकार केवळ विरोध दाबायला शिकले आहे. (वृत्तसंस्था)

# मुख्यमंत्री आतिशीविरोधात अलका लांबा रिंगणात

## काँग्रेसची नवी यादी जाहीर

◆ **नवी दिल्ली, ३ जानेवारी**

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने उमेदवारांची आणखी एक यादी आज जाहीर केली. मुख्यमंत्री आतिशी यांच्या विरोधात कालकामधून महिला काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा अलका लांबा यांची उमेदवारी जाहीर केली आहे.

नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी अलका लांबा यांनी कालकाजी मंदिरात जाऊन दर्शन घेतले होते, तेव्हापासूनच कालकाजीमधून त्यांना काँग्रेसची उमेदवारी मिळणार, अशी चर्चा सुरू झाली होती. काँग्रेसने आतापर्यंत ४८ उमेदवारांच्या नावाची





घोषणा केली आहे. अलका लांबा यांच्या उमेदवारीमुळे कालकाजी मतदारसंघातील लढत चुरशीची होईल, असा अंदाज आहे. भाजपा या मतदारसंघात माजी खासदार रमेश बिधुरी यांना उमेदवारी देण्याची शक्यता आहे. भाजपा आपली यादी येत्या दोन-तीन दिवसांतच जाहीर करण्याची शक्यता आहे.

मूळ काँग्रेसच्या असलेल्या अलका लांबा यांनी २०१४ मध्ये आपमध्ये प्रवेश केला होता. २०१५ मध्ये त्या आप उमेदवार म्हणून चांदनी चौक मतदारसंघातून विजयी झाल्या होत्या. पक्षात महत्त्व मिळत नाही, अनादर होतो, असा आरोप करीत २०१९ मध्ये त्यांनी पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पक्षांतरबदी कायद्याखाली विधानसभेचे अध्यक्ष रामनिवास गोयल यांनी त्यांना अपात्र ठरवले होते. २०२० ची विधानसभा निवडणूक त्यांनी चांदनी चौक मतदारसंघातून काँग्रेसतर्फे लढवली होती, पण त्यात त्यांचा पराभव झाला. २००३ मध्ये पहिल्यांदा लांबा यांनी मोतीनगर विधानसभा मतदारसंघातून भाजपा नेते मदनलाल खुराणा यांच्याविरुद्ध निवडणूक लढवली होती. यात त्यांचा पराभव झाला, तरी त्या चर्चेत आल्या. (तभा वृत्तसेवा)

# नववर्षाच्या प्रारंभीच साईचरणी कोट्यवधींचे दान

## सोने-चांदी, चेक, कॅश अन् ऑनलाईनही अर्पण

◆ **शिर्डी, ३ जानेवारी**

नवीन वर्षाच्या सुरुवातीला हजारो भाविकांनी देवदर्शनासाठी शिर्डी साई दरबारी गर्दी केली होती. राज्यातील अनेक तीर्थस्थळी दर्शन घेऊन भाविकांनी नववर्षाची सुरुवात केली, यावेळी मंदिरात भरभरून दान दिले.

नाताळाच्या सुट्या व नवीन वर्षाच्या स्वागता दरम्यान भाविकांकडून साईंच्या चरणी कोटींचे दान अर्पण करण्यात आले आहे. २५ डिसेंबर ते २ जानेवारी दरम्यान ९ दिवसांत भाविकांकडून एकूण १६ कोटी ६१ लाख ८० हजार रकमेचे दान करण्यात आले आहे. शिर्डी साई संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी माध्यमांना याबाबत माहिती दिली. ३१ डिसेंबर ते २ जानेवारीदरम्यान ८ लाखांहून अधिक भाविक साईचरणी नतमस्तक झाले आहेत. देणगी काऊंटरवरून ३ कोटी २२ लाख २७ हजार ५०८ रुपये प्राप्त झाले तर पीआरओ सशुल्क देणगी पासेसचे १ कोटी ९६ लाख ४४ हजार २०० रुपये गोळा झाले. दानपेटीतून ६ कोटी १२ लाख ९१ हजार ८७५ रुपयांचे दान साईचरणी झाले आहे. डेबिट क्रेडिट कार्ड, ऑनलाईन देणगी, चेक डी. डी. देणगी, मनी ऑर्डर ४ कोटी ६५ लाख ७३ हजार ६९८ इतक्या मिळाल्या. सोने ८०९.२२० ग्रॅम - ५४ लाख ४९ हजार ६८६ रुपये, तर चांदी - १४३९८.३०० ग्रॅम - ९ लाख ९३ हजार ८१५ रुपये इतके प्राप्त झाल्याचे समजते. (वृत्तसंस्था)



आगामी प्रजासत्ताक दिनाच्या सरावाचा भाग म्हणून आसाम रायफल्सच्या जवानांनी शुक्रवारी राजधानी दिल्लीतील कर्तव्यपथवर सराव केल्यानंतर विरंगुळ्याचे काही क्षण

# एकटे फिरणे, बुरखा न घालणे क्रूरता नाही

## घटस्फोट प्रकरणी उच्च न्यायालयाचा निर्णय

◆ **अलाहाबाद, ३ जानेवारी**

महिलेने सार्वजनिक ठिकाणी बुरखा न घालणे ही क्रूरता नसल्याने पतीला या आधारावर घटस्फोट मागता येणार नाही, असे निरीक्षण अलाहाबाद उच्च न्यायालयाने नोंदवले आहे.

पत्नी पारंपरिक रीतिरिवाज पाळत नसल्याचे कारण देत एका व्यक्तीने घटस्फोटाची याचिका दाखल केली होती. त्यावर न्या. सौमित्र दयाल सिंह आणि न्या. दोनाडी रमेश यांच्या खंडपीठाने उपरोक्त निरीक्षण नोंदवले. असे असले तरी, पती-पत्नी गेल्या २३ वर्षांपेक्षा अधिक काळ वेगळे राहत असल्याने न्यायालयाने या आधारावर त्यांचा घटस्फोट मंजूर केला.

मानसिक क्रूरता, पत्नी वारंवार एकटीच बाहेर फिरायची आणि बुरखा प्रथा पाळत नसल्याची कारणे देत पतीने घटस्फोटाची मागणी केली होती. पण न्यायालयाने पत्नी एकटी बाजारात व इतर ठिकाणी जायची आणि ती बुरखा घालायची नाही, हा युक्तिवाद स्वीकारण्यास नकार दिला.

पत्नीने किंवा एखाद्या व्यक्तीने कोणतेही बेकायदेशीर किंवा अनैतिक संबंध न ठेवता समाजातील इतर लोकांना भेटणे, याला क्रूरता म्हणता येणार नाही, असे खंडपीठाने म्हटले. (वृत्तसंस्था)

# पाच टक्के महिलांनी गर्भाशय काढले

◆ **नवी दिल्ली, ३ जानेवारी**

भारतातील सुमारे पाच टक्के महिलांनी हिस्टेरेक्टॉमी म्हणजेच गर्भाशय काढण्याचे ऑपरेशन केले आहे. शस्त्रक्रिया केलेल्या महिलांमध्ये सर्वांत सामान्य समस्या म्हणजे मासिक पाळीच्या दरम्यान जास्त रक्तस्त्राव.

इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पॉप्युलेशन सायन्सेस, मुंबई आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ अ‍ॅण्ड फॅमिली वेल्फेअर, नवी दिल्लीच्या संशोधकांनी राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाच्या चौथ्या टप्प्यात २५ ते ४९ वर्षे वयोगटातील महिलांमध्ये हिस्टेरेक्टोमीचे प्रमाण ४.८ टक्के आढळले. हे दर्शवते की, २५-४९ वर्षे वयोगटातील प्रत्येक १०० पैकी पाच भारतीय महिलांनी हिस्टेरेक्टोमी केली आहे. या अभ्यासात असेही आढळून आले की, इतर व्यवसायात काम करणाऱ्या महिलांच्या तुलनेत कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांमध्ये शस्त्रक्रिया होण्याची शक्यता ३२ टक्के अधिक आहे. याशिवाय आंध्रप्रदेश, तेलंगणा आणि बिहार या राज्यांमध्ये हिस्टेरेक्टोमीचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले. ही राज्ये भारतातील अनावश्यक हिस्टेरेक्टोमीसाठी चर्चेचे केंद्र राहिली आहेत. देशभरातील हिस्टेरेक्टॉमी ऑपरेशन्सपैकी जवळजवळ दोन तृतीयांश ऑपरेशन्स खाजगी दवाखाने किंवा हॉस्पिटलमध्ये केले जातात. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### फेब्रुवारीअखेर येणार ‘चिकी चिकी बुबूम बुम’

**मुंबई :** सगळीकडे नववर्षाच्या उत्साहाचे वातावरण असताना स्वप्नील जोशी, प्रार्थना बेहरे, प्राजक्ता माळी, प्रसाद महादेव खांडेकर, रोहित माने, प्रथमेश शिवलकर, वनिता खरात ही नामवंत कलाकार मंडळी ‘चिकी चिकी बुबूम बुम’ म्हणत आपल्याला हसवायला सज्ज झाली आहे. या चित्रपटाचे गमतीशीर पोस्टर प्रदर्शित झाले आहे. यात स्वप्नीलचा हटके लूक दिसत आहे, तर बाकीचे कलाकार घाबरलेल्या आणि गोंधळलेल्या अवस्थेत दिसत आहेत. त्यामुळे ही भानगड काय आहे, हे समजायला मार्ग नाही. चित्रपटसृष्टीतील कसलेल्या कलाकारांची भली मोठी फौज आणि धमाल मनोरंजनाची ट्रीट देणारा ‘चिकी चिकी बुबूम बुम’ चित्रपट येत्या २८ फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज होणार आहे. विशेष म्हणजे, याचे दिग्दर्शन प्रसाद खांडेकर यांनी केले आहे. ■




### ‘किसीक’फेम श्रीलीलाचे बॉलिवूड पदार्पण

**मुंबई :** ‘पुष्पा २’मध्ये ‘किसीक’ गाण्यात तुफान नृत्य करणाऱ्या श्रीलीलाची सध्या सर्वत्र चर्चा आहे. तिला करण जोहरच्या धर्मा प्रॉडक्शनकडून मोठ्या चित्रपटाची ऑफर मिळाली आहे. त्यात कार्तिक आर्यन मुख्य भूमिकेत दिसणार आहे. श्रीलीलाने या प्रोजेक्टमध्ये काम करण्यास होकार दिला असून, लवकरच याची अधिकृत घोषणा होणार आहे. ‘तू मेरी मै तेरा, मैं तेरा तू मेरी’ असे नाव असलेल्या या चित्रपटाविषयी कार्तिकने २५डिसेंबरला सूतोवाच केले होते. हा चित्रपट २०२६ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. समीर विद्धांस यांच्याकडे दिग्दर्शनाची जबाबदारी असेल. कार्तिकसोबत समीरचा हा दुसरा चित्रपट असणार आहे. यापूर्वी दोघांनी ‘सत्यप्रेम की कथा’ साठी काम केले आहे. ■



### ‘फुले’ सिनेमा एप्रिलमध्ये प्रदर्शित होणार

**मुंबई :** महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त मागील वर्षी त्यांच्यावर आधारित हिंदी सिनेमाची घोषणा करण्यात आली. त्याचे नाव ‘फुले’ असे आहे. सावित्रीबाई फुलेंच्या जयंतीचे औचित्य साधून ‘फुले’ चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख जाहीर करण्यात आली. हा चित्रपट ११ एप्रिलला प्रदर्शित होणार आहे. यात प्रतीक गांधी महात्मा गांधी तर अभिनेत्री पत्रलेखा सावित्रीबाईंच्या भूमिकेत दिसणार आहेत. महात्मा फुलेंच्या जयंतीला हा सिनेमा प्रदर्शित केला जाणार आहे. झी स्टुडिओची निर्मिती असलेल्याया चित्रपटाचे दिग्दर्शन अनंत महादेवन् यांनी केले आहे. ■




### ‘पाताल लोक २’चा टीझर आला समोर

**मुंबई :** काही दिवसांपूर्वी ‘पाताल लोक २’ या वेबसीरिजचे पहिले पोस्टर प्रदर्शित झाले. यात मुख्य अभिनेता जयदीप अहलावत दिसून आला. आता याचा टीझर रिलीज झाला आहे. या टीझरमध्ये हाथीराम चौधरी एक कहाणी सांगतो. ही कहाणी ऐकताच ‘पाताल लोक २’ मध्ये आणखी काय बघायला मिळणार, याची उत्कंठा वाढते. या सीरिजचा नवा सीझन १७ जानेवारी रोजी प्राईम व्हिडीओवर दिसणार आहे. ■

# बिश्नोई मुलाखत प्रकरणी पोलिस उपअधीक्षक बडतर्फ

◆ **चंदीगड, ३ जानेवारी**

गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई खरार येथे सीआयएच्या कोठडीत असताना त्याची मुलाखत एका खाजगी टीव्ही चॅनेलने रेकॉर्ड केली होती. या प्रकरणी पंजाब सरकारने कारवाई करीत पोलिस उपअधीक्षक गुरशेरसिंग संधू यांना बडतर्फ केले.

पंजाब आणि हरयाणा उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर ही कारवाई करण्यात आली. न्यायालयाने या प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा आदेश दिला होता. गृह विभागाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशात सांगण्यात आले होते की, गुरशेरसिंग संधू यांनी लॉरेन्स बिश्नोई पोलिस कोठडीत असताना गैरवर्तन करून पंजाब पोलिसांच्या प्रतिमेला गंभीर नुकसान पोहोचवले.

लॉरेन्स बिश्नोई पोलिस कोठडीत असताना त्याची मुलाखत घेण्यात आली होती. ज्यात खरार सीआयए स्टाफच्या आवारातील एका मुलाखतीचाही समावेश होता. ही मुलाखत मार्च २०२३ मध्ये एका खाजगी वृत्तवाहिनीवर प्रसारित करण्यात आली होती. संधू यांना बडतर्फ करण्याचा आदेश गृह विभागाचे सचिव गुरकिरत किरपालसिंग यांनी जारी केला. या आदेशात भारतीय राज्यघटनेच्या कलम ३११चा हवाला देण्यात आला. (वृत्तसंस्था)


# पहिली वंदे भारत स्लीपर ट्रेन सज्ज

## २६ जानेवारीला धावण्याची शक्यता

◆ **नवी दिल्ली, ३ जानेवारी**

भारतातील पहिली वंदे भारत स्लीपर ट्रेन या महिन्याच्या अखेरीस धावण्यास सुरुवात होईल. पहिली ट्रेन दिल्ली ते कटरा दरम्यान असेल. या गाडीचा वेग ताशी १३० किलोमीटर असेल. वंदे भारत ट्रेनचा वेग ताशी १८० किलोमीटर एवढा आहे. मात्र, स्लीपर कोच असल्याने या गाडीचा वेग कमी असेल. पहिली ट्रेन २६ जानेवारीला धावू शकते.

ही नवी गाडी पूर्णपणे स्वदेशी बनावटीची आहे. भारत अर्थ मूव्हर्स लिमिटेड आणि इंटिग्रल कोच फॅक्टरीद्वारे ही गाडी तयार करण्यात



आली आहे. यात उत्तम वातानुकूलित सेवा, यूएसबी पोर्ट, पाळीव प्राण्यांसाठी स्वतंत्र जागा आणि आधुनिक सुविधा असतील. या सुविधांसह ब्लॅक बॉक्स, उत्तम क्रॅश प्रोटेक्शन आणि अत्याधुनिक आगरोधक प्रणालीसह सुरक्षेला प्राधान्य देण्यात आले आहे. या ट्रेनमध्ये स्लीपर बर्थ जोडले गेले आहेत, जे मूळतः वंदे भारत चेअर कारसाठी तयार केले आहेत.

अधिक पाणी साठवण्यासाठी या ट्रेनच्या रचनेत बदल करण्यात आला आहे. या बदलांमुळे कोचचे वजन वाढले असून, त्याचा वेगावर परिणाम होणार आहे.

स्लीपर वंदे भारत ट्रेनमध्ये एकूण १६ डब्यांसह ८२३ प्रवासी बर्थ आहेत. १६ डब्यांमध्ये ११ डबे तृतीय श्रेणी वातानुकूलित, ४ डबे द्वितीय श्रेणी वातानुकूलित आणि १ डबा प्रथम श्रेणी वातानुकूलित आहे. प्रथम श्रेणीतील प्रवाशांना शॉवरची सुविधा आहे. भारतीय आणि पाश्चात्य पद्धतीचे आधुनिक शौचालय आहेत. स्वच्छता राखण्यासाठी प्रत्येक डब्यात बायो-डायजेस्टर टँक आणि ३० लिटर क्षमतेच्या कचरा पेट्या देण्यात आल्या आहेत. (वृत्तसंस्था)

## अग्रलेख...

# जम्मू-काश्मीर आणि व्याप्त काश्मीर

भारताचे नंदनवन म्हणून कधीकाळी ओळखल्या जाणाऱ्या जम्मू-काश्मीरचा खऱ्या अर्थाने कोणी सत्यानाश केला असेल तर तो देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी. खरं म्हणजे जम्मू-काश्मीर हे देशातील अन्य राज्यांसारखेच एक राज्य. पण दिल्लीतील आणि त्या राज्यातील राज्यकर्त्यांच्या भूमिकेमुळे जम्मू-काश्मीर हे भारतातील एक राज्य असल्याचे तेथील जनतेला तसेच देशाच्या अन्य भागातील जनतेलाही कधी जाणवले आहे. 'सारी दुनिया एक तरफ जोरू का भाई एक तरफ' असे म्हटले जाते; तशीच वागणूक आपल्या देशाच्या तत्कालीन नेतृत्वाची होती. जम्मू-काश्मीर नेहरू-गांधी घराण्यातील नेत्यांसाठी 'जोरू का भाई'सारखे होते. काश्मीरच्या मुद्यावरून देशाची एकता, अखंडता आणि सार्वभौमतेसोबत राज्यकर्त्यांनी नेहमीच तडजोड केली. जम्मू-काश्मीरची एकूणच वागणूक नेहमी स्वतंत्र देशासारखी होती. आपण भारतासोबत आहोत, हे आपले भारतावर उपकार आहेत, आपल्याला भारताची गरज नाही, तर भारताला आपली गरज असल्याचे तेथील राज्यकर्त्यांच्या वागणुकीवरून पदोपदी जाणवत होते. तेथील राज्यकर्त्यांचे भारतापेक्षा पाकिस्तानवर जास्त प्रेम होते. म्हणजे मंगळसूत्र भारताच्या नावाचे, पण शृंगार पाकिस्तानसोबत अशी व्यभिचारी भूमिका जम्मू-काश्मिरातील राज्यकर्त्यांची नेहमीच राहिली. जम्मू-काश्मीरमधील राज्यकर्त्यांच्या या भूमिकेला काँग्रेसच्या विशेषत: नेहरू-गांधी घराण्यातील नेत्यांची फूस होती. घरात एखाद्या मुलाचे अनावश्यक लाड व्हावे, तसेच जम्मू-काश्मीरचे लाड देशातील राज्यकर्त्यांनी केले. जम्मू-काश्मीरसोबत भारतात विलीन झालेली अन्य संस्थाने दुधात साखर विरघळावी, तसे समरस आणि एकजीव झाले. पण जम्मू-काश्मीरची जखम स्वातंत्र्यप्राप्तीपासूनच अश्वत्थाम्याच्या कपाळावरील जखमेसारखी सतत भळभळत राहिली. जम्मू-काश्मीरच्या विघटनवादी समस्येचे मूळ त्या राज्याला दिलेल्या ३७० कलमात आहे. देशातील अन्य कोणत्याही राज्याला असा दर्जा मिळाला नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जम्मू-काश्मीरचे भारतात विलीनीकरण करताना कारण नसताना जम्मू-काश्मीरला ३७० कलमाचे सुरक्षाकवच देण्यात आले. त्यावेळी पंडित नेहरूंनी ३७० कलमाचे बुजगावणे उभे केले नसते, तर जम्मू-काश्मीर आणि तेथील राज्यकर्ते उन्मत्त झाले नसते. 'आधीच मर्कट त्यात मद्य प्याला' अशी त्यांची स्थिती झाली नसती. जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० कलम निष्प्रभ करण्याचा ऐतिहासिक निर्णय मोदी सरकारने घेतल्यानंतर तेथे आश्वासक आणि आल्हाददायक असा नव्या युगाचा सूर्योदय झाला. जी हिंमत देशातील अन्य राज्यकर्ते दाखवू शकले नाही, ती हिंमत ५६ इंच छातीवाल्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दाखवली.

जम्मू-काश्मीरचा खरा इतिहास आजपर्यंत देशासमोर आला नाही. तो आणण्याचे काम राष्ट्रीय पुस्तक न्यासाने नुकतेच केले. जम्मू-काश्मीर आणि लडाखच्या इतिहासाचा शास्त्रयुद्ध आढावा एका अभ्यासपूर्ण ग्रंथातून घेण्यात आला. या ग्रंथाच्या प्रकाशन समारंभात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी, आतापर्यंत जे गमावले ते परत मिळविण्याचा संकल्प सोडला आहे. अमित शाह यांनी व्याप्त काश्मीरचा उल्लेख केला नसला, तरी त्यांच्या मनात तेच असेल, अशी देशवासीयांची खात्री आहे. पाकिस्तान काश्मीरवर दावाच कसा करू शकतो, हा मोठा गहन प्रश्न आहे. मुळात पाकिस्तानची निर्मितीच भारताच्या फाळणीतून झाली. त्यामुळे पाकिस्तानने काश्मीरवर दावा करणे, हे कधीच मान्य करता येत नाही. तर्कसंगत तर ते कधीच नव्हते. व्याप्त काश्मीर ही अशीच संकल्पना आहे. हे म्हणजे भाडेकरूने घरावर कब्जा करण्यासारखे आहे. व्याप्त काश्मीरच नाही तर संपूर्ण काश्मीर हा भारताचा भाग होता, भारताचा भाग आहे आणि यावत्चंद्रदिवाकरो भारताचा भाग राहणार आहे. तो कोणीही भारतापासून तोडू शकत नाही, हिरावून घेऊ शकत नाही. एखाद्या तान्ह्या मुलाला ज्याप्रमाणे जगातील कोणतीही शक्ती त्याच्या आईपासून तोडू शकत नाही, तसे काश्मीरला पाकिस्तानच काय पण जगातील कोणतीही शक्ती आणि महाशक्ती भारतापासून दूर करू शकणार नाही. पाकिस्तानच काय, जगातील सर्व मुस्लिम देश एकत्र आले तरी ते काश्मीर भारतापासून हिसकावून घेऊ शकत नाही. कारण भारताचे नेतृत्व देशातील दुसऱ्या पोलादी पुरुषाच्या म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हातात आहे. सरदार वल्लभभाई पटेल हे देशातील पहिले पोलादी पुरुष आहेत. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग खऱ्या अर्थाने सरदार होते, पण त्यांची वागणूक सरदार शब्दाला शोभणारी कधीच राहिली नाही. याउलट मूळ गुजराती असलेले नरेंद्र मोदी यांना त्यांच्या कणखर निर्णयांनी सरदार संबोधायला हरकत नाही. सुरुवातीलाच जम्मू-काश्मीरचा सत्यानाश पंडित नेहरू यांनी केला, असा उल्लेख आहे. जम्मू-काश्मीरचा मुद्दा नेहरूंनी संयुक्त राष्ट्रात नेत आपल्या नाही तर देशाच्या पायावर दगड पाडून घेतला. हा दगड नेहरूंच्या पायावर पडला असता तरी देशातील लोकांना त्याचे फारसे वाईट वाटले नसते. पण तो देशाच्या पायावर पडल्यामुळे त्याच्या वेदना दीर्घकाळ देशाला सहन कराव्या लागल्या. देशाचे शेवटचे व्हॉईसराय लॉर्ड माऊंटबॅटन यांनी असा दिवाळखोरीचा सल्ला नेहरूंना दिला आणि बुद्धिभ्रष्ट नेहरूंनी तो डोळे मिटून मान्य केला. नेहरूंचे डोळे त्यावेळी कुणावर होते, याची सभ्यांनी चर्चा करण्याचे कारण नाही. पण नेहरूंच्या या निर्णयाची किंमत देशाला आताआतापर्यंत चुकवावी लागली.

पाकिस्तानने जम्मू-काश्मीरवर आक्रमण करणे ही त्या देशाची पहिली चूक आणि हा मुद्दा संयुक्त राष्ट्रात नेणे ही नेहरूंची दुसरी चूक म्हणायला पाहिजे. दोन देशांतील वाद हा संयुक्त राष्ट्रात न्यायचा असतो, आपल्या देशातील एखाद्या राज्याशी संबंधित वाद हा संयुक्त राष्ट्रात न्यायचा नसतो. तो एकतर पोलिस वा लष्करी ताकदीवर तसेच राजकीय मुत्सद्देगिरीने सोडवायचा असतो, पण याचे भान तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेल्या नेहरूंना राहिले नाही. संयुक्त राष्ट्राच्या देखरेखीखाली काश्मीरमध्ये जनमत संग्रह करण्याची सूचनाही माऊंटबॅटन यांनी केली होती. सुदैवाने आपण आतापर्यंत असा जनमत संग्रह केला नाही, हे जम्मू-काश्मीरच्याच नाही तर देशातील जनतेचेही भाग्य म्हटले पाहिजे. तुम्हाला भारतात राहायचे की पाकिस्तानात अशी विचारणा यातून करण्यात येणार होती. असा जनमत संग्रह म्हणजे माकडाच्या हातात कोलित देणे होते. ३७० कलमाने जम्मू-काश्मीरला भारतापासून पूर्णपणे तोडले होते. जम्मू-काश्मीरचा झेंडा वेगळा होता, घटना वेगळी होती आणि तेथील शासकीय प्रमुखाला मुख्यमंत्री नाही तर पंतप्रधान असे संबोधले जात होते. म्हणजे जम्मू-काश्मीरला नेहरूही देशातील एक राज्य समजत नव्हते, तर स्वतंत्र देश मानत होते, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी 'एक देश में दो विधान, दो निशान और दो प्रधान' विरुद्ध आंदोलन करत आपल्या प्राणाचे बलिदान केले; त्याचाच परिणाम म्हणून नंतर भारताचा तिरंगा जम्मू-काश्मीरचा झेंडा झाला. तेथील घटनेत सुधारणा करण्यात आली आणि पंतप्रधानाला मुख्यमंत्री म्हटले जाऊ लागले. यासाठी देशातील जनतेने डॉ. मुखर्जी यांचे मानावे तेवढे आभार कमी आहे. जम्मू-काश्मीरचा नागरिक हा भारताचा नागरिक होता, पण भारताचा नागरिक जम्मू-काश्मीरचा नागरिक मानला जात नव्हता, त्याला तेथे कोणतेही घटनात्मक अधिकार नव्हते. हा जो इतिहास आहे, त्यावर जम्मू-काश्मीरवर लिहिण्यात आलेल्या नव्या ग्रंथातून प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. व्याप्त काश्मीर पुन्हा आपल्या काश्मीरला पर्यायाने देशाला जोडले जावे, ही देशवासीयांची मनापासूनची इच्छा आहे. मोदी सरकारने सत्तेत आल्यावर ३७० कलम ज्या हिमतीने आणि धाडसाने हटवले, त्याच हिमतीने आणि धाडसाने मोदी सरकार व्याप्त काश्मीर एक दिवस आपल्या ताब्यात घेतल्याशिवाय राहणार नाही. अखंड भारताचे जे स्वप्न आपण कधीपासून पाहात आहे, त्याच्या पूर्तीच्या मार्गातील हा पहिला टप्पा समजायला हरकत नाही. 'मोदी है तो मुमकिन है' असे उगीच म्हटले जात नाही.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# शालेय अध्यापनात नाट्य प्रशिक्षणाची आवश्यकता



जगाच्या पाठीवर दक्षिण अमेरिका खंडाच्या उत्तर भागात व्हेनेझुएला नावाचा एक देश आहे. या देशाची लोकसंख्या सुमारे तीन कोटी आहे. मात्र, हा देश गुन्हेगारीमध्ये अव्वल क्रमांकावर आहे. इथे अनेक वर्षांपासून खून, अपहरण, मानवी तस्करी, ड्रग्ज रॅकेट यांसारखे हिंसक गुन्हे सर्रास घडतात. १२ ते १५ वर्षांची लहान मुलं हातात बंदुका घेऊन खून-दरोडे करण्यास प्रवृत्त होतात. इथे पराकोटीचा भ्रष्टाचार होतो. इथलं सरकार आणि न्यायव्यवस्थाही भ्रष्ट आहे. त्यामुळे कुणीही या देशात फिरायला जात नाही. इतकी वाईट परिस्थिती असतानाही १९७५ मध्ये एका देवदूताने गुन्हेगारीत भरडलेल्या या देशाला आशेचा किरण दाखवला. त्या देवदूताचे नाव आहे जोस ॲण्टोनियो ॲब्र्यू. त्यांनी 'एल सिस्टेमा' नावाचा एक संगीत प्रशिक्षण उपक्रम विकसित केला. 'एल सिस्टेमा' म्हणजे दि सिस्टिम. सामाजिक बदल करण्यासाठी मुलांना, विशेषतः वंचित, मागासलेल्या समाजातील किंवा गुन्हेगारी पृष्ठभूमी असलेल्या मुलांना मोफत शास्त्रीय संगीत शिक्षण देणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. एका अंडरग्राऊंड पार्किंग गराजमध्ये या उपक्रमाची सुरुवात झाली. सुरुवातीला केवळ ११ विद्यार्थी आले. २०१५ मध्ये ४०० म्युझिक सेंटर्स आणि ७ लाख बाल व तरुण संगीतकार तयार झाले आहेत. विशेष म्हणजे हा उपक्रम व्हेनेझुएलाच्या सीमा ओलांडून सुमारे ६० देशांमध्ये पोहोचला आहे. 'सामाजिक बदलासाठी संगीत' हे त्यांचं ब्रीदवाक्य आहे. कारण संगीत व इतर कलांमुळे एकता, बंधुता, परस्परांबद्दल आदर वाढू लागतो. आता 'एल सिस्टेमा' एक जागतिक चळवळ होऊ लागली आहे. एल सिस्टेमामुळे व्हेनेझुएलाच्या अनेक मुलांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव पडला आहे. या उपक्रमात सहभागी झालेल्या मुलांमध्ये आमूलाग्र बदल दिसून आला. ते गुन्हेगारीपासून परावृत्त झाले. मुलांना आत्म-नियंत्रण करता आले, वाईट वर्तणुकीवर ताबा मिळविता आला. ही लक्षणे विशेषतः हिंसाचाराला सामोरे जाणाऱ्या मुलांमध्ये दिसून येतात. 'एल सिस्टेमा' उपक्रमाच्या माध्यमातून मुलांचे कौशल्य विकसित केले जाते, ही कौशल्येच त्यांना गुन्हेगारीपासून दूर ठेवतात.

आपला भारत देश या मानाने खूप समृद्ध आणि सज्जन लोकांचा देश आहे. इथला गुन्हेगारी दर आटोपशीर आहे तसेच आतंकवाद, नक्षलवाद यावर आता सरकार अंकुश ठेवत आहे. पण विचार करा, गुन्हेगारीने होरपळलेल्या देशात असा आमूलाग्र बदल घडू शकतो, तर भारत देशात किती मोठा परिणाम दिसून येईल. तुरुंगात असलेल्या गुन्हेगारांसाठी अनेक उपक्रम राबविले जातात. त्यात कला हा विषय महत्त्वाचा आहे. सच्चा कलाकार हा संवेदनशील असतो. त्यात नाट्य कला ही अत्यंत समृद्ध व सर्वसमावेशक आहे. कारण त्यात केवळ अभिनय नसून संगीत, नेपथ्य, रंगभूषा, वेशभूषा असे अनेक घटक सामावलेले आहेत. अनेक वर्षांपासून शालेय अध्यापनात नाट्य प्रशिक्षणाचा समावेश व्हावा, यासाठी मागणी केली जात आहे. पूर्वी लोक हा विषय गांभीर्याने घेत नव्हते. गेल्या १०-१२ वर्षांत मात्र हळूहळू बदल घडू लागला आहे. सरकारी यंत्रणादेखील याबाबत सकारात्मक दिसत आहे. अनेक पालकांना व शिक्षकांना असे वाटते की, नाटक केल्याने मुलांचे अभ्यासातील लक्ष उडून जाईल. काही पालक म्हणतात की, नाटकात काम केल्यास मूल वाया जाईल; पण तसे नसते. ही प्रतिमा या क्षेत्रातील गलिच्छ लोकांनी निर्माण केली आहे. या क्षेत्रात अनेक सज्जन लोकही आहेत. खरे पाहता नाटकामुळे 'एल सिस्टेमा' प्रमाणे प्रभाव पडतो. मुलं चांगल्या वळणावर येतात. मुलांना अभ्यास चांगल्या प्रकारे कळू लागतो. कारण नाटकात संवाद पाठ करावा लागतो. इतकंच काय, तर समोरच्याचे संवादही लक्षात ठेवावे लागतात. त्यामुळे मुलांची स्मरणशक्ती वाढते, पाठांतराची व आकलनाची क्षमता वाढते. विषय लवकर कळू लागतात. नाटकात संवाद मोठ्याने म्हणावे लागतात. शेवटच्या बाकावर बसलेल्या प्रेक्षकांपर्यंत आपला आवाज पोहोचला पाहिजे. म्हणून बुजरी, हळू आवाजात बोलणारी मुलंही मोठ्याने बोलू लागतात. नाट्य प्रशिक्षणामुळे उच्चार स्पष्ट होतात.

त्याचबरोबर सभाधीटपणा, आत्मविश्वास वाढतो. रंगभूषा, वेशभूषा करावी लागते म्हणून गबाळेपणा जाऊन नीटनेटकेपणा येतो. नेपथ्याच्या माध्यमातून जंगल, रस्ता, घर इत्यादी गोष्टी दाखवल्यामुळे कल्पकता वाढते, मुलांमध्ये स्वतःचे घर सजवण्याची, आपली खोली स्वच्छ ठेवण्याची वृत्ती जागृत होते. नाटक एकट्याचे नसते, तर सगळ्यांनी मिळून करायचे असते. प्रत्येकाला मुख्य भूमिका देता येत नाही. काही सहायक असतात, इतकंच काय, 'बॅक स्टेट आर्टिस्ट'ही असतात, जे अभिनय करत नाहीत, पण नाटकाचा भाग असतात. यामुळे सांघिक भावना वाढते. गटबाजी न करता एकत्र येऊन काम करण्याची वृत्ती वाढू लागते. हे लक्षात घेतले पाहिजे की, शालेय नाट्याचा उद्देश मुलांना केवळ अभिनेता बनवणे असा नसून एक चांगला जबाबदार माणूस बनवणे असा आहे. आजच्या जगात चांगल्या माणसांची नितांत आवश्यकता आहे. ही चांगली माणसं या नाट्य प्रशिक्षणातून घडतील. कारण यातून व्यक्तिमत्त्व विकास घडत असतो. पालकांनो व शिक्षकांनो, लक्षात घ्या, शालेय नाटकांत काम करणारी सगळीच मुलं भविष्यात अभिनय क्षेत्रात जात नाहीत, एखाद-दुसरं मूल या क्षेत्रात करीअर करतं. पण इतर मुलांच्या बाबतीत माणूस होण्याची प्रक्रिया घडते. शालेय नाटकांचे विषय संस्कारक्षम असल्यामुळे मुलांना चांगलं वागण्याचा धडा मिळतो. जसे रस्त्यावर थुंकू नये, कचरा टाकू नये, मोठ्यांशी उलट बोलू नये, अभ्यास व्यवस्थित करावा इ. मात्र तुमचे प्रशिक्षक चांगले असायला हवेत ही अट आहे. पालकांनो, तुमच्या मुलांना चांगली वर्तणूक असलेल्या व्यक्तीकडेच नाट्य प्रशिक्षणाला पाठवा.

शालेय अध्यापनात नाट्य प्रशिक्षणाचा समावेश केल्याने मुलांमध्ये खरोखरच चांगला बदल दिसून येईल. अत्यंत आगाऊ मुलंसुद्धा जबाबदारीने वागताना मी पाहिली आहेत. मी गेली काही वर्षे नाट्य दिग्दर्शन व प्रशिक्षण देण्याचे काम करतोय. माझ्या स्वतःच्या मुलाला त्याच्या जन्मापासूनच मी हे प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली आणि मला खूप सकारात्मक परिणाम दिसून आले. दादागिरी करणारी मुलंही चांगली वागू लागतात, हा माझा अनुभव आहे. त्यांच्या अभ्यासात प्रगती झालेली मी पाहिली आहे. नाट्य प्रशिक्षण म्हणजे माणूस घडवण्याची शाळा आहे, असे आपण समजू शकतो. त्यामुळे शालेय अध्यापनात नाट्य प्रशिक्षणाचा समावेश केल्याने आपण चांगला माणूस घडवू शकतो. ही मुलं शाळा व महाविद्यालयातून बाहेर पडून जबाबदार नागरिक म्हणून देशाच्या भवितव्यात आपला मोलाचा वाटा देतील. जर 'एल सिस्टेमा'मुळे व्हेनेझुएलासारख्या गुन्हेगारी देशात चांगला परिणाम दिसून येऊ शकतो तर आपला सुजलाम् सुफलाम् भारत देश नाट्य प्रशिक्षणातून माणूस झालेल्या मुलांच्या बळावर जागतिक सत्ता नक्कीच बनेल. म्हणूनच केंद्र व राज्य सरकारने यावर आता गांभीर्याने विचार करायला हवा व शालेय अध्यापनात नाट्य प्रशिक्षणाचा समावेश करायला हवा.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# स्टील हबच्या दिशेने...

चोर पावलाने गडचिरोली जिल्ह्यात शिरलेल्या माओवादी चळवळीने मागील चार दशकांत या जिल्ह्याला मागासलेपणाच्या काळ्या यादीत पोहोचविले होते. गरिबी, बेकारी, मागासलेपण, अशिक्षितपणा, आरोग्य आणि शिक्षण या समस्यांच्या गर्तेत अडकलेल्या गडचिरोली जिल्ह्याकडे शासन व प्रशासन या साऱ्यांनीच पाठ फिरविली होती. लोहखनिजाचे विपुल साठे, चुनखडी व इतर खनिजे आणि उत्तम प्रतीच्या सागाचे जंगल असलेल्या श्रीमंत गडचिरोली जिल्ह्याच्या वाट्याला गेली कित्येक वर्षे उपेक्षाच आली. येथील माणसे गरीब म्हणून येथील देवसुद्धा गरीबच राहिले. विदर्भाची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खजुराहो काळातील शिल्पकलेने नटलेल्या मार्कंडा नगरीची दुरवस्था केवळ आणि केवळ राजकीय व प्रशासकीय अनास्थेचा बळी ठरले आहे. नक्षल चळवळीमुळे शापित ठरलेल्या या जिल्ह्यात लॉयड मेटल्स ॲण्ड एनर्जी लिमिटेड कंपनीने पाय ठेवला आणि जिल्ह्याचे चित्र बदलायला सुरुवात झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने हा शापित जिल्हा आता विकासाची नवी पहाट उजाडत राज्याच्या पटलावर उमटू लागला आहे. परवा नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस संपूर्ण दिवसभर गडचिरोलीत होते. जिल्ह्याच्या विकासासाठी काही महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचे भूमिपूजन तर काही प्रकल्पांचे उद्घाटन करून गडचिरोलीची ओळख महाराष्ट्रातील पहिला जिल्हा अशी केल्याची स्पष्टोक्ती त्यांनी केली. जो गडचिरोली जिल्हा मागास म्हणून ओळखला जात होता तोच गडचिरोली जिल्हा आता 'स्टील हब' म्हणून ओळखला जाईल, नैसर्गिक संपत्तीने श्रीमंत असतानाही गरिबीचे जीणे जगत होता, त्याचा प्रवास आता स्टील हबच्या दिशेने सुरू झाला आहे. भविष्यात मिनी जमशेदपूर म्हणूनही गडचिरोली जिल्हा उदयास येईल, असा आशावाद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. त्रिवेणी अर्थमुव्हर्स कंपनीचे मालक व लॉयड मेटल्सचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन् यांच्या नेतृत्वात ६२०० कोटींची गुंतवणूक गडचिरोली जिल्ह्यात झाली असून, या कंपनीच्या माध्यमातून गडचिरोलीतील हजारो बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. खुद्द मुख्यमंत्र्यांनी प्रभाकरन् यांचा उल्लेख करीत गडचिरोलीच्या परिवर्तनाचा इतिहास लिहिला जाईल तेव्हा सर्वात पहिले बी. प्रभाकरन् यांचे नाव अधोरेखित केले जाईल, असे म्हटले आहे. सुरजागड येथील लोहखनिज उत्खनन करण्यासोबतच हेडरी येथे कंपनीने निर्माण केलेली सीबीएसई शाळा, मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल व कोनसरी येथे निर्माण झालेला लोहप्रकल्प गडचिरोली जिल्ह्यासाठी वरदान ठरू लागले आहे. दोन दिवसांपूर्वी लॉयड मेटल्स कंपनीच्या विविध उपक्रमांचा मुख्यमंत्री फडणवीस यांनी शुभारंभ केला. कोनसरी येथे ४०० कोटींच्या डीआरआय प्लांटचे उद्घाटन केले. याशिवाय तीन हजार कोटींचा पेलेट प्लांट आणि स्लरी पाईप लाईन प्रकल्पाचे भूमिपूजन फडणवीसांनी केले. या प्रकल्पामुळे एक हजार लोकांना रोजगार मिळणार आहे. याशिवाय हेडरी, एटापल्ली येथे २७०० कोटींचा आयरन ओव्हर ग्रॅडिंग प्लांट व २० कोटी रुपयांचा गारमेंट युनिटही लॉयड मेटल्सच्या पुढाकाराने गडचिरोली जिल्ह्यात उभारला जात आहे. त्यामुळे येत्या काळात गडचिरोलीच्या विकासाचे चित्र अतिशय वेगळे राहणार असून संपूर्ण राज्याचे लक्ष गडचिरोली जिल्हा वेधून घेत आहे. केवळ गडचिरोली जिल्ह्यातील खनिज उत्खनन करणे हा आपला उद्देश नसून गडचिरोली जिल्ह्यातील बेरोजगारांच्या हाताला काम देणे, गडचिरोलीत रोजगाराच्या संधी निर्माण करणे, येथील मुलांना प्राथमिक व उच्च शिक्षण देणे याशिवाय या येथील लोकांना आरोग्याशी संबंधित अडचणींचा सामना करावा लागू नये यासाठी सर्वसोयीयुक्त १०० खाटांचे मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्याचा मानस लॉयड मेटल्स कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन् यांनी व्यक्त केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सात वर्षांपूर्वी कोनसरी प्रकल्पाच्या पायाभरणीसाठी पुढाकार घेऊन या प्रकल्पाचे भूमिपूजन केले होते आणि सात वर्षांनंतर त्याच जागेवर आता भव्य लोह प्रकल्प उभारला गेला असून त्या प्रकल्पाचे उद्घाटनसुद्धा फडणवीस यांच्याच हस्ते झाले आहे. फडणवीस जे बोलतात ते करतात हे पुन्हा एकदा गडचिरोलीवासीयांनी बघितले आहे. गडचिरोलीच्या विकासासाठी खुद्द राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लक्ष ठेवून आहेत. त्यांच्या विकासाच्या अजेंड्यावर गडचिरोली जिल्हा अग्रस्थानी आहे. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी टि?ट करीत फडणवीसांच्या कार्याची प्रशंसा केली आहे. गडचिरोली जिल्हा स्टील हब म्हणून उदयास येत असताना कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक बी. प्रभाकरन् व मुख्यमंत्री फडणवीस यांना विसरून चालणार नाही. त्यांच्या पुढाकारानेच गडचिरोलीच्या विकासाची पहाट उजाडेल, यात तिळमात्र शंका नाही.

९९२२९९९५८८

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# साऱ्या अपेक्षा इतरांकडूनच!

राज्यात कायदा व सुव्यवस्था चांगली असली पाहिजे, आरोग्य व्यवस्था चांगली असली पाहिजे, मुली, महिला सुरक्षित असल्या पाहिजेत, राज्यावरचा कर्जाचा डोंगर कमी केला पाहिजे, डागाळलेले, भ्रष्टाचाराचा डाग लागलेले मंत्री मंत्रिमंडळात नसावे, स्वच्छ व पारदर्शक सरकार असलं पाहिजे, संविधानाचं राज्य असलं पाहिजे, गुंडाराज नसावा, राज्याचा विकास झाला पाहिजे, कामगार, शेतकरी, कष्टकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे, शेतकऱ्यांना मदत दिली पाहिजे, नुकसानभरपाई दिली पाहिजे, कर्ज मुक्त केलं पाहिजे, वीज माफ केली पाहिजे, सिंचनाचे प्रकल्प मार्गी लावले पाहिजे, दलित, आदिवासींचा विकास केला पाहिजे, प्रशासनावर अंकुश असला पाहिजे, महागाई कमी केली पाहिजे, पेट्रोल, डिझेलचे भाव कमी केले पाहिजे, कर कमी केले पाहिजे अशा एक नव्हे अनेक अपेक्षा उद्धव ठाकरे ॲण्ड कंपनी आणि विरोधकांच्या भाजपा सत्तेत असताना त्यांच्याकडून असतात. मुख्यत्वे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असले की अपेक्षांचा डोंगर उभा राहतो. मात्र, १९९५ पासून २०१४ आणि २०१९ मध्ये जेव्हा जेव्हा ठाकरे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सत्तेत होते, या काळात त्यांनी एकाही समस्येचं निराकरण केल्याचा रेकॉर्ड नाही. त्यामुळे आपण स्वतः काही न करता, साऱ्या अपेक्षा इतरांकडूनच करायच्या हा या लोकांचा ठरलेला सेट पॅटर्न आहे.

नवीन वर्षात देवेंद्र फडणवीसांनी आपल्या कार्याची सुरुवात गडचिरोलीपासून केली. सगळे नववर्षाचे जल्लोषात स्वागत करत असताना, फडणवीसांनी मात्र, गडचिरोली जिल्ह्याची नक्षलग्रस्त अशी ओळख आता पुसून काढण्यासाठी पाऊल उचलत, विकास कामांचा धडाका गडचिरोलीपासून सुरू केला. यावेळी अनेक विकास कामांचे भूमिपूजन, उद्घाटन, लोकार्पण करत महाराष्ट्र आता थांबणार नाही असा संदेश त्यांनी दिला. बस्स विरोधकांच्या आणि प्रामुख्यानं उबाठा गटात पोटशूळ उमळले. म्हणतात गडचिरोलीच्या विकासाचा उचललेला विडा तेथील सर्वसामान्य जनता आणि गरीब आदिवासींसाठी उचलला कोणा खाणसम्राटांसाठी नाही, हे दाखवून देण्याची काळजी देवाभाऊंना घ्यावी लागेल, असा खोचक सल्ला उबाठा गटाने दिलाय्... १९९५ मध्ये ठाकरेंच्या नेतृत्वात तब्बल साडेचार वर्षे राज्यात दोन मुख्यमंत्री होते. त्यानंतर २०१९ मध्ये उद्धव ठाकरे स्वतः अडीच वर्षे मुख्यमंत्री होते. या एकूण साडेसहा सात वर्षांच्या संपूर्ण कार्यकाळात गडचिरोली जिल्ह्याकडे यांनी ढुंकूनही कधी पाहिलं नाही. मुळात मुंबई बाहेरही राज्य आहे, हेच त्यांना माहिती नाही. मुंबईसाठी बलिदान, मुंबईसाठी लढा, मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव, मुंबई महानगर पालिका, मुंबईचा मराठी माणूस, केवळ मुंबई... मुंबई आणि मुंबई. त्यामुळे गडचिरोली जिल्हा तेथील सर्वसामान्य आणि गरीब गोंडी, माडिया बोलणारा आदिवासी, इथला मराठी माणूस आणि त्यांच्या विकासाचा प्रश्न यांना कसा दिसणार? हा तो दिसतो केवळ सत्तेबाहेर असताना. १९९५ पासून जेव्हा जेव्हा सत्तेत होते तेव्हा तेव्हा यांच्याकडे नगरविकास आणि परिवहन खातं राहिलं आहे. शिवाय १९९५ मध्ये वनविभाग, कृषी, सामाजिक न्याय, कौशल्यविकास, उद्योग, रोजगार खाते देखील शिवसेनेकडे होते. काय प्रगती केली महाराष्ट्राने या काळात कृषी क्षेत्रात, उद्योग क्षेत्रात हे महाराष्ट्राने बघितलेच आहे. किती रोजगार दिलेत, किती उद्योग आणलेत, मुंबई, मुंबई करत आपली राजकीय पोळी शेकणाऱ्यांनी मुंबईच्या विकासात काय दिवे लावलेत. बेस्ट आणि महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचं काय वाटोळं केलं हे काही लपलेलं नाही.

हा मधल्याकाळात ठाकरेंच्या मंत्रिमंडळात असलेले मंत्री एकनाथ शिंदे यांनी गडचिरोलीचं पालकत्व स्वीकारल्यानंतर त्यांनी गडचिरोलीसाठी थोडी धडपड करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. अयशस्वी याच्यासाठी मंत्रिमंडळाचे प्रमुख, शिंदेंचेच पक्षप्रमुख उद्धव ठाकरे होते. आणि त्यांच्याकडून कुठलेही सहकार्य, निधी त्यांना मिळत नव्हता. उलट त्यांच्या कामात अडथळा निर्माण केला जात होता. त्यांच्या मंत्रालयात आदित्य ठाकरे आणि त्याचा मावस भाऊ वरुण सरदेसाई हे सातत्याने दखल देत असल्याचे नंतरच्या काळात समोर आले. एवढंच नव्हे तर, गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री असणाऱ्या एकनाथ शिंदे यांच्या जीवाला नक्षल्यांकडून धोका असल्याचा अहवाल गुप्तचर विभागाकडून आल्यानंतर गृहविभागाने झेड प्लस सुरक्षा देण्याचा निर्णय घेतला. तेव्हा मुख्यमंत्री असलेल्या ठाकरेंनी त्यावेळच्या गृहमंत्री शंभुराज देसाईंना फोन करून यावर अंमलबजावणी करण्यास मज्जाव केला. शिंदेंना सुरक्षा देऊ नये असे निर्देशच त्यांनी गृहमंत्र्यांना दिले होते. एकतर स्वतः घरी बसून अंडी उबवणार आणि काम करणाऱ्या माणसाच्या कार्यात आडकाठी आणणार. असले उद्योग ठाकरेंनी घरी बसून केले.

जेव्हा ठाकरे स्वतः मुख्यमंत्री होते, तेव्हा शेतकरी, कष्टकरी, दीन दलित, आदिवासी, महिला या सगळ्यांसाठी काम केलं असतं तर, कदाचित आज सल्ले देण्याची वेळ आली नसती. सत्तेबाहेर असताना यांना अनेक समस्या, अनेक प्रश्न, अनेक कामं, जनता, शेतकरी, महिला, कामगार, कष्टकरी, संपकरी सगळं आठवते. शेतकऱ्यांना कर्जमाफी नको, कर्ज मुक्ती देण्याची मागणी २०१४ मध्ये स्वतः सत्तेत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना हेच ठाकरे सल्ला देत होते. आपलंच सरकार आहे हे माहीत असताना, शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन हेक्टरी ५० हजार देण्याची मागणी करत होते. आणि २०१९ मध्ये स्वतः मुख्यमंत्री झाल्यानंतर आपल्या संपूर्ण अडीच वर्षांच्या कार्यकाळात ना शेतकरी कर्जमुक्त केला, ना शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार मदत कधी दिली. अवकाळी आणि वादळामुळे झालेल्या नुकसानीची मदत सुद्धा दिली नाही. एक नवा उद्योग राज्यात आणला नाही, उलट आलेले प्रकल्प यांच्या वसुली धोरणामुळे त्रस्त होऊन राज्याबाहेर गेले. देवेंद्र फडणवीसांनी मंजुरी दिलेल्या अनेक विकासाच्या प्रकल्पांना निव्वळ स्थगिती देण्याचं तेवढं काम ठाकरेंनी केलं. कायदा व सुव्यवस्था तर यांच्याकाळातली बोलायचं कामंच नाही. स्वतः पोलिसच अपहरण करत होते, पोलिसच वसुली करत होते, पोलिसच हत्या करत होते. हप्ता वसुली प्रकरणी गृहमंत्री स्वतः तुरुंगात गेल्याची राज्याच्या राजकीय इतिहासाला काळिमा फासणारी घटना यांच्या काळात घडली. दोन मंत्री तुरुंगात जाण्याचा रेकॉर्ड ठाकरे सरकारच्या नावे आहे. खून, बलात्कार, धार्मिक कट्टरतावादातून हत्या यासारखे प्रकार तर राजरोसपणे होऊ लागले होते. बिहारप्रमाणे बाहुबली मंत्री सर्वसामान्य नागरिकाचे अपहरण करून बंगल्यावर मारहाण करण्याचा रेकॉर्डही ठाकरे सरकारच्या नावेच आहे. हे सगळं एकच गोष्ट उद्धृत करते ती म्हणजे राज्य चालवणे ''इनके बस की बात नहीं'', यांची लायकी नाही. त्यामुळे हे लोक देखील जो करू शकतो त्यांच्याकडूनच अपेक्षा करत असावेत, असा एक निष्कर्ष यातून निघतो.

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### अमेरिकेत नववर्षात झालेले अतिरेकी हल्ले

नववर्षाच्या दिवशी अमेरिकेसारख्या प्रगत व पुढारलेल्या देशात - न्यू ऑरलियंस, लास व्हेगास व न्यू यॉर्क अशा तीन ठिकाणी झालेले अतिरेकी हल्ले, ही समस्त जगाला धोक्याची घंटा आहे. संपूर्ण जगात मुस्लिम अतिरेक्यांचे वाढते धाडस हे विश्वशांतीला घातक आहे. अमेरिकेचे मावळते शासन हे अतिरेक्यांसाठी मवाळ होते. बायडेन सरकारने, ईल्हान ओमर या आफ्रिकन बाईला आपल्या परराष्ट्र मंत्रालयात महत्त्वाच्या पदावर नेमले होते. या बाईचे विचार वर्णद्वेष्टे व अतिरेकी विचारसरणीला पोषक आहेत व ती अनधिकृतरित्या अमेरिकेत शिरली आहे, हे नुकतेच अमेरिकन सरकारच्या निदर्शनास आले व लवकरच तिची हकालपट्टी होणार आहे. या अतिरेकी विचाराच्या बाईला आपले विरोधी पक्षनेते राहुल गांधी का भेटत होते, त्यांचे गुरू जॉर्ज सोरोस यांची तर यामागे प्रेरणा नव्हती ना, याबद्दल सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. निर्वासित बनून आलेले परदेशी नागरिक आता जर्मनी, फ्रान्स व इतर युरोपियन देशांमध्ये सरकारची व तेथील जनतेची डोकेदुखी झालेले आहेत व त्यांना देशाबाहेर हाकलण्याची मागणी वाढत आहे. आपल्या देशातही रोहिंग्यांची हकालपट्टी होणे व त्यांची परत आयात न होऊ देणे, देशाच्या सुरक्षिततेसाठी व शांततेसाठी अत्यंत आवश्यक आहे.

**गणेश ज. हजारे**/८६९८८१५५५९

### समाजसेवा म्हणजेच ईश्वरसेवा

मनुष्याने सुखाचा विचार न करता जीवन जगण्याचा प्रयत्न करावा. जे जीवन आपल्या वाटेला आले ते समजून घेऊन त्याप्रमाणे जीवन जगावे. जीवन हे परमेश्वराने दिले असते त्यातही चढ-उतार असतो. काही दिवस आनंदाचे असतात तर काही दिवस चिंता करणारे असतात. पण मनुष्याने अशावेळी स्वत:ला विसरून जाऊ नये आणि मृत्यू हा परमेश्वराने ठरवलेला असतो. तेव्हा जोपर्यंत जीवन आहे तोपर्यंत प्रामाणिकपणे देशासाठी, समाजासाठी जगणे हेच आपले कर्तव्य आहे. परमेश्वराने आपल्याला जगात सत्कर्म करून समाजाचा उत्कर्ष करण्यासाठीच पाठवलेले आहे. हे आपण ओळखून विवेकबुद्धीने समाजसेवा करावी. यातच जीवनाचा खरा अर्थ आहे, मोक्ष आहे. मानवजन्म श्रेष्ठ समजून समाजसेवा हीच सेवा आहे असे मानून जगण्याचा आनंदच वेगळा आहे.

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

### प्राध्यापक बनले वेठबिगारी!

राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये सीएचबी प्राध्यापकांची अवस्था अत्यंत दयनीय असून, तुटपुंज्या वेतनावर घरातील खर्च, मुलांच्या शिक्षणाचा खर्च, आरोग्याचा खर्च भागत नसल्याने टपरी, वडापावचा गाडा, भाजीपाला, रंगकाम, गवंडी काम करून उदरनिर्वाह करावा लागत असल्याचे चित्र सध्या राज्यात दिसून येत आहे. गेल्या काही वर्षांपासून राज्यात प्राध्यापकांची भरती न केल्यामुळे प्रत्येक महाविद्यालयांमध्ये असंख्य जागा रिक्त आहेत. अशा रिक्त जागांच्या ठिकाणी स्वतः महाविद्यालये सीएचबी तत्त्वानुसार प्राध्यापकांची भरती करीत असून त्यांना दर महिन्याला फक्त दहा ते पंधरा हजार एवढे तुटपुंजे वेतन मिळत आहे. काही ठिकाणी तर सीएचबी तत्त्वावर काम करणारे असे प्राध्यापक आहेत की, त्यांनी पात्रतेच्या निकषापेक्षाही उच्च पदव्या हस्तांतरित केलेल्या आहेत. जसे, उच्च पदवी, सेट, नेट, पीएच. डी., एलएलबी व इतर काही पदव्या. पण सरकार भरतीला देत असलेल्या चालढकलीमुळे हा सर्व तासिका तत्त्वावर काम करणारा प्राध्यापक वर्ग त्रस्त असून, अशी वेठबिगारीची कामे करण्याशिवाय त्यांच्याकडे गत्यंतरच उरले नाही.

राज्यातील काही महाविद्यालयांमध्ये तर असे उच्चशिक्षित प्राध्यापक आहेत की, भविष्यात आपण कायम होणार या आशेवर राहून, त्यांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य सीएचबी तत्त्वावर काम करून घालविले. तरी पण प्राध्यापक भरतीचा पत्ता नाही. नोकरीमध्ये कायम नसल्याकारणाने कोणी मुलगी देण्यास तयार नाही. वय होत चालले आहे. अशा अनेक यातना कामात कायम नसणाऱ्या वरिष्ठ प्राध्यापकांच्या आहेत. आणि त्याचबरोबर अनेक पालकांनी मुलगा वरिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापक आहे. कायम नसला म्हणून काय झाले. आज ना उद्या तो होईल. या आशेवर राहून त्यांनी आपल्या एकुलत्या एक मुली अशा मुलांना दिल्या आहेत. कुटुंबाचा व मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागत नसल्याने अनेक शहरी भागातील सी. एच. बी. तत्त्वावर काम करणारे प्राध्यापक सकाळ व संध्याकाळ या दोन सत्रांत काम करत आहेत. सकाळी ६ वाजता लवकर घरातून बाहेर पडायचे ते रात्री ११ वाजता घरी यायचे असा यांचा दिनक्रम असल्या कारणाने घरातील व्यक्तींना वेळ देऊ शकत नाहीत. त्यामुळे राज्य व केंद्र सरकारने लवकरात लवकर वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक भरतीला सुरूवात करून सी.एच.बी. तत्त्वावर काम करणाऱ्या लोकांना कायम करून त्यांचे पुढील आयुष्य वेठबिगारी म्हणून नाही तर प्राध्यापक म्हणून जगू शकतील.

**प्रा. सचिन जाधव**/८४२५००३१२७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

## संक्षिप्त वृत्त



### एक्सलेंट इंटरनेशनल प्री-प्रायमरी स्कूलमध्ये नृत्य कलाविष्काराचे अप्रतिम सादरीकरण

**सोलापूर, दि.३ जानेवारी-**
येथील एक्सलेंट इंटरनेशनल प्री प्रायमरी स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंम्मेलनाचे आयोजन करण्यात आले. सर्व उपस्थित मान्यवराच्या हस्ते गणेश स्तवन व दिपप्रज्वलन केले .या प्रसंगी प्री प्रायमरी स्कूलच्या संचालिका भारती कटगेरी यानी प्रास्ताविक केले अजिंक्य वाघमारे व शर्वरी गोरे या बालचमूनी प्रश्न मंजूषा व गोष्टीच्या माध्यमातून खूप छान सादरीकरण केले दिल है छोटासा,नन्हा मुन्ना राही,बम बम बोले ,ओ माय फ्रेंड गणेशा अशा विविध गाण्यावर अप्रतिम नृत्य सादर केले. या कार्यक्रमात बाहुला बाहुली यांच्या प्रतिकृती तयार करून अवर्णनीय लग्नाचा देखावा सादर केले या कार्यक्रमाचे नियोजन श्री मलप्पा कटगेरी व भारती कटगेरी यानी केले सूत्रसंचलन सौ कुलकर्णी यानी केले सदर कार्यक्रमास बहुसंख्य पालक वर्ग उपस्थित होते.

# सराईत गुन्हेगारास अटक; एकूण ९ गुन्हे उघडकीस

## पावणे तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी -**
सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सराईत गुन्हेगारास अटक करून त्याच्याकडून घरफोडीचे २ आणि दुचाकी चोरीचे ७ गुन्हे उघडकीस आणून २ लाख ७७ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

लिंगाप्पा यंकाप्पा पवार (वय २३, रा. जेऊर, ता. अक्कलकोट) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. लिंगाप्पा पवार याच्याकडून वळसंग पोलिस ठाण्यातील २, अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाण्यातील ३, सांगोला, जेजुरी, फलटण शहर पोलिस ठाण्यातील प्रत्येकी एक गुन्हा उघडकीस आला आहे. लिंगाप्पा याच्यावर यापूर्वी तळेगाव दाभाडे, तळेगाव दाभाडे एमआयडीसी, देहु रोड याठिकाणी गुन्हे दाखल आहेत.

वळसंग पोलिस ठाण्यातील घरफोडीच्या गुन्ह्याचा तपास करीत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना यातील संशयित आरोपी लिंगाप्पा पवार हा सोलापुरातील मार्केट यार्ड येथे येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यावरुन पोलिसांनी मार्केट यार्ड येथे सापळा लावून लिंगाप्पा पवार यास ताब्यात घेतले. लिंगाप्पा याच्याकडे चौकशी केल्यानंतर त्याने त्याचे साथीदार चिरंजीव तिरूपटेल भोसले, क्रिश शंकर पवार (दोघे रा. शेगाव, बुलढाणा) यांच्या मदतीने ६ तारखेला रात्री १ वाजण्याच्या सुमारास होटगी गावात तसेच २० डिसेंबरच्या रात्री सातनदुधनी (ता. अक्कलकोट) येथे घरफोडी केल्याचे सांगितले. पोलिसांनी लिंगाप्पा पवार यास अटक करून पोलिस कोठडी घेतली. पोलिस कोठडीमध्ये केलेल्या तपासात लिंगाप्पा याच्याकडून घरफोड्यांमध्ये चोरीस गेलेले सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले. तसेच लिंगाप्पा याने अक्कलकोट, वळसंग, सांगोला तसेच पुणे जिल्हा व सातारा जिल्ह्यात दुचाकी चोरी केल्याचे सांगितले. त्याचकडून चोरीच्या ७ दुचाकी जप्त करण्यात आला आहे. या गुन्ह्यात पोलिसांनी २ लाख ७७ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कारवाई पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर अधिक्षक प्रितम यावलकर, पोलिस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक विजय शिंदे, पोलिस उपनिरीक्षक श्रीकांत गायकवाड, ख्वाजा मुजावर, हवालदार रवि माने, सलीम बागवान, पोलिस नाईक धनराज गायकवाड, पोलिस शिपाई विनायक घोरपडे, सतीश बुरकुल, मनोज राठोड, सुरज रामगुडे, अजय वाघमारे, दिलीप थोरात, कपील काटकर, योगेश जाधव यांनी केली.



### इच्छा भगवंताची मित्र परिवाराच्या वतीने आयुक्तांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी -**
सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त शितल तेली उगले यांना भारतीय प्रशासन सेवेच्या आधिकालिक वेतनश्रेणीत स्थानापन्न पदोन्नती मिळाल्या निमित्त ईच्छा भगवंताची मित्र परिवाराचे मार्गदर्शक, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे विशेष निमंत्रित सदस्य किसन जाधव यांनी पालिका आयुक्त शितल तेली उगले यांना शाल व पुष्पगुच्छ देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

महानगरपालिकेवर प्रशासक असूनही सोलापूर शहराचा देखील विकासाच्या दृष्टीने कायापालट होत आहे. असेच आपल्या हातून या पुढील काळात देखील सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य घडो अशा शुभेच्छा पालिका आयुक्त शितल तेली उगले यांना यावेळी किसन जाधव यांनी दिल्या. तसेच सोलापूर महानगरपालिकेतील झोन क्र.६ चे नवनियुक्त झेडो तथा सहाय्यक आयुक्त सारिका मगर, नगर अभियंता विभागातील नवनिर्मित पदोन्नती झालेले सहाय्यक अभियंता सलीम बक्षी, मुन्ना तळीखडे, अविनाश कांबळे रियाज सिद्दिकी तसेच विद्युत विभागातील कोल्हे आणि गायधनकार या कर्मचाऱ्यांना शाल, मखमली टोपी आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

यावेळी डॉ. सचिन अंगडीकर, महादेव राठोड, माणिक कांबळे, वसंत कांबळे आदी उपस्थित होते.

### मी सोलापूर माझे सोलापूर परिवर्तन व विकास समितीची आज बैठक

**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**
मी सोलापूर माझे सोलापूर परिवर्तन व विकास समितीच्या पदाधिकाऱ्यांची शनिवार ४ जानेवारी रोजी कुचन नगर येथील कामगार सेना कार्यालयात सायं. ५ वाजता बैठक होईल. या बैठकीत सोलापुरातील विविध समस्या व मागण्यांबाबत विचार मंथन व जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात येणार आहे. असे समितीचे संस्थापक विष्णु कारमपुरी यांनी सांगितले.

### महादेव बिराजदार यांचे निधन

**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**
सोलापूर ग्राहक भांडारचे उपाध्यक्ष महादेव पंचप्पा बिराजदार (वय ७१) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.



त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले एक मुलगी जावई सुना व नातवंडे असा परिवार आहे. ते ग्राहक भांडारचे माजी चेअरमन व जनता क्लॉथ स्टोअर्सचे मालक होते.


## ग्रामपंचायत भेंड, ता. माढा, जि. सोलापूर

### टेंडर नोटीस

ग्रामपंचायत भेंड ता.माढा यांचेकडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदार पुरवठादारकडून बंद लखोत्यात निविदा मागवण्यात येत आहे.

**लेखाशिष - भेंड ग्रामपंचायत १५ वा वित्त आयोग सन २०२४-१५ ग्रामनिधी**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पाईपलाईन दुरुस्ती करणे किंव पाणीपुरवठा साधनांची दुरुस्ती करणे. | ४०,०००/- | ४००/- | ५००/- | ४ महिने | सु.बे.अ. |
| २ | सार्वजनिक ठिकाणी शौचालय,मुतारीची सोय करणे. | ८०,०००/- | ८००/- | | | |
| ३ | गावठाण रस्ता सिमेंट काँक्रिटीकरण करणे किंवा मारुती मंदिर सुशोभीकरण करणे | १,५०,०००/- | १,५००/- | | | |
| ४ | भूमिगत गटार करणे | १,४३,०००/- | १,४३०/- | | | |
| ५ | गावठाण अंगणवाडी साहित्य व खेळणी खरेदी करणे. | १,००,०००/- | १,०००/- | | | |
| ६ | जि.प. शाळा बरडे वस्ती साऊंड सिस्टिम व साहित्य खरेदी करणे | ७४,०००/- | ७४०/- | | | |
| ७ | मागासवर्गीय वस्तीमधील ध्वजस्तंभास स्टील कंपाऊंड करणे किंवा साहित्य खरेदी करणे | ९०,०००/- | ९००/- | | | |

**टीप -**
१ कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी ०४/०१/२०२५ सकाळी ११.०० वाजल्यापासून
२ भरलेल्या निविदा स्वीकारण्याच्या दिनांक १०/०१/२०२५ पर्यंत सकाळी ११.०० ते २.०० वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय भेंड
३ निविदा उघडण्याचा दिनांक १३/०१/२०२५ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता
४ निविदा संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ त २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील.
५ निविदा मंजूर/नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच/ग्रामसेवक यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत भेंड**
**ता. माढा, जि. सोलापूर**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत भेंड**
**ता. माढा, जि. सोलापूर**



## हरवले आहे

आमच्या श्री गणेश क्रिडा व शिक्षण प्रसारक मंडळ, पापरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर नोंदणी क्र. एफ ५५९२, सोलापूर संस्थेचे संस्था अधिनियम, १८६० अन्वये मिळालेले प्रमाणपत्र महाराष्ट्र/७५६६/१९९० आणि महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वयेचे एफ - ५५९२, सोलापूर हे दोन्ही मुळ नोंदणी प्रमाणपत्र दि.०१/०८/२०२४ रोजी मौजे मोहोळ ते मौजे देवडी दरम्यान प्रवासात गहाळ झालेले आहे. त्याबाबत रितसर तक्रार मा. पोलीस ठाणे अमलदार, मोहोळ, पोलीस स्टेशन, जि. सोलापूर येथे नोंद केली असून, सदर प्रमाणपत्र कोणास मिळाले असतील ते खालील पत्यावर देण्याची विनंती आहे.

सही/-
**श्री. सागर धनाजी थोरात**
श्री गणेश क्रिडा व शिक्षण प्रसारक मंडळ,
पापरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर.



## जाहीर समन्स

**मा. उपनिबंधक सहकारी संस्था परसेवा**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**
११३-अ, सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

**दि. पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि., पंढरपूर** - **अर्जदार**
४१६३ ब, प्रशासकीय भवन, नवी पेठ, पंढरपूर
विरूध्द
(खालील तपशिलामध्ये नमुद केलेले थकबाकीदार/कर्जदार) - जाब देणार

| अ. क्र. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ९१७/ २०२४-२०२५ | ५२,९२५/- | १<br>२<br>३ | **अनिता सुनिल ऐवळे** रा.७२, सह्याद्री नगर, इसबावी, पंढरपूर<br>**सुनिता अनिल पाटील** रा. मंगळवेढेकर नगर, हॉटेल नागालॅन्ड पाठी मागे, पंढरपूर<br>**मुकूंद पंढरीनाथ कांबळे** रा.जुना कराड नाका, पंढरपूर |
| २ | ९१८/ २०२४-२०२५ | २७,७६६/- | १<br>२<br>३ | **बिलकीस बशीर बागवान** रा. देवकते मळा, एम.एस.ई.बी. पाठी मागे, पंढरपूर<br>**करीश्मा बशीर बागवान** रा. देवकते मळा, एम.एस.ई.बी. पाठी मागे, पंढरपूर<br>**शहनाज महंमद हुसेन बागवान** रा. देवकते मळा, एम.एस.ई.बी. पाठी मागे, पंढरपूर |
| ३ | ९२४/ २०२४-२०२५ | १८,५१३/- | १ | **करूणा सुभाष कडलाक** रा. ज्ञानेश्वर नगर झोपडपट्टी, महावीर नगर, पंढरपूर |
| ४ | ९३९/ २०२४-२०२५ | ३७,३०९/- | २<br>५ | **उमा सोमनाथ भोसले** अध्यक्षा-श्री. सिध्दनाथ महिला बचत गट रा.घडशी गल्ली, भक्ती मार्ग, पंढरपूर<br>**विनोद बाळु पवार** रा. चिप गल्ली, नवीपेठ, पंढरपूर |
| ५ | ९४४/ २०२४-२०२५ | ५०,४४६/- | ३<br>४ | **मंदाकिनी संभाजी रणदिवे** रा.संतपेठ, सांगोला रोड, घडशी गल्ली, पंढरपूर<br>**विनोद बाळु पवार** रा.चिप गल्ली, नवीपेठ, पंढरपूर |
| ६ | ९५१/ २०२४-२०२५ | ४३,९४१/- | ५ | **किशोर बाळु पवार** रा. शिवरत्न नगर, भक्ती मार्ग, पंढरपूर |
| ७ | ९५२/ २०२४-२०२५ | २८,७१९/- | ४ | **सविता संतोष आंबले** रा.जुनी माळी गल्ली, पंढरपूर |
| ८ | १४७/ २०२४-२०२५ | ७६,११६/- | १<br>२<br>३<br>४ | **हिना रियाज सय्यद** रा. महापूर चाळ, संतपेठ, पंढरपूर<br>**हिना रियाज सय्यद** अध्यक्षा-दुर्गा स्वयंसहाय्यता महिला बचतगट रा.महापूर चाळ, संतपेठ, पंढरपूर<br>**बिस्मिला इब्राहीम सय्यद** रा.४४२, महापूर चाळ, संतपेठ, पंढरपूर<br>**राबिया ईसाक सय्यद** रा.४४३, महापूर चाळ, संतपेठ, पंढरपूर |
| ९ | ९२०/ २०२४-२०२५ | ९,४६९/- | १<br>२<br>४ | **माया सदाशिव शिंदे** रा.१३७४, गांधी रोड, तांबट धर्मशाळे पाठीमागे, पंढरपूर<br>**मुमताज रमजान बागवान** रा.२९, जुनीपेठ झोपडपट्टी, पंढरपूर<br>**अर्चना सिताराम वाघमारे** रा.संतपेठ, बडवे चर झोपडपट्टी, पंढरपूर |

यायाकामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत. उपनिर्दीष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार- मंगळवार दिनांक २१/०१/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.

या नोटीसीद्वारे जाबदेणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेत हजर न राहील्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी देण्यात येईल व निर्णय घेण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यास कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. ०३/०१/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्देसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**



## उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर

सिटी सर्वे नं. ८४१३, दूसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवार, सोलापूर.- ४१३००३

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०९ व त्याखालील नियम १९६१ चे नियम ८६ (६) अन्वये

### जाहीर समन्स

**नटराज नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित., सोलापूर** - **अर्जदार**
विरुद्ध
**(खालील तपशीलातील नमूद केलेले थकबाकीदार सभासद) - जाब देणार**

| अ. नं. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार नं. | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ८२/ २०२४ | १,२९,४०२/- | १<br>२<br>३ | **कृष्ण किड्स वेअर प्रो.प्रा. जयवंत वसंतराव कोरे** रा. २२, कित्तूर चन्नम्मा नगर, सैफूल, विजापूर रोड, सोलापूर<br>**महेश माधव केसकर** रा. २८, मूक्तेश्वर नगर, विजापूर रोड, सोलापूर<br>**चंद्रकांत आडव्यप्पा धोत्रे** रा. मु.पो. भंडारकवठे ता. द. सोलापूर |
| २ | ८३/ २०२४ | ६५,७४२/- | १<br>२<br>३ | **विकास विठ्ठल गोरे** रा. ४३ ब, रत्नमंजेरी नगर, विजापूर रोड, सोलापूर<br>**महेश सिद्रामय्या राठीमनी** रा. ६८, कमला नगर, विजापूर रोड, सोलापूर<br>**लखन अरुण राऊत** रा. रोहिणी नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| ३ | ८४/ २०२४ | १,२७,९३३/- | २<br>३ | **महेश माधव केसकर** रा. २८, मुक्तेश्वर नगर, जुळे सोलापूर<br>**संजय मल्लिकार्जुन जाधव** रा. १३०, विश्व नागर, विजापूर रोड, सोलापूर |
| ४ | ८५/ २०२४ | १,३९,१७४/- | १<br>२<br>३ | **पद्मा जयवंत कोरे** रा. कृष्ण साडी कलेक्शन, सैफूल, विजापूर रोड, सोलापूर<br>**श्रीनाथ शंकर डुणगे** रा. २१५, कित्तूर चन्नम्मा नगर, सैफूल, विजापूर रोड, सोलापूर<br>**उन्मेष योगिनाथ साखरे** रा. १२/२४, नेताजी सुभाष हाऊसिंग सोसायटी, विजापूर रोड, सोलापूर |
| ५ | ८६/ २०२४ | ७४,१००/- | २<br>३ | **कविता अंबादास बनसोडे** रा. ए निरापत्र सोसायटी, सोलापूर<br>**वर्षा विठ्ठल इरकशेट्टी** रा. २८५, लोकमान्य नगर, विजापूर रोड, सोलापूर |
| ६ | ८७/ २०२४ | ७४,३९६/- | १<br>२<br>३ | **मानाबाई पंडित राठोड** रा. ७ बी कांचन गंगा, नगर, सैफूल, सोलापूर<br>**भीमराव लालसिंग राठोड** रा. नेहरू नगर, विजापूर रोड, सोलापूर<br>**महेश विठ्ठल बोराळकर** रा. मु.पो. भंडारकवठे ता. द. सोलापूर |
| ७ | ८८/ २०२४ | ७२,१९५/- | १<br>२<br>३ | **लक्ष्मी सिद्राम जमादार** रा. ३७/अ, नरेंद्र सोसायटी सोलापूर -०४<br>**प्रकाश सेशू राठोड** रा.बिलाल नगर, १८ जुळे सोलापूर<br>**नटराज सिद्राम कांबळे** रा. मु.पो. लिंबी चिंचोळी ता. द. सोलापूर |
| ८ | ८९/ २०२४ | ७८,१४७/- | १<br>२<br>३ | **संतोष नामदेव पवार** रा. ५२, नेहरू नगर, विजापूर रोड, सोलापूर<br>**भारत हब्बु राठोड** रा. शासकीय मैदान, नेहरू नगर, सोलापूर<br>**दयानन्द जगन्नाथ बनसोडे** रा. ११२४, ग. ह.झो. नं २, विजापूर रोड, सोलापूर |
| ९ | ९०/ २०२४ | ५४,२३२/- | १<br>२ | **मुक्ताबाई बाबुराव नायकू**<br>**कल्पना शिवशंकर चाटी** |
| १० | ९१/ २०२४ | १,१०,२४९/- | १<br>२<br>३ | **गंगाधर गणपती फुलवाडे** रा. ३१९, उद्धव नगर, भाग १, विजापूर रोड, सैफुल, सोलापूर<br>**अनिल प्रल्हाद कुलकर्णी** रा. २३२ ब प्रसाद नगर, जुळे सोलापूर<br>**विष्णु अंबऋषी चौधरी** रा. ओम साई मार्ट, गाळा नं१७, रोहिणी नगर भाग २, सोलापूर |
| ११ | ९२/ २०२४ | ७५,२९४/- | १<br>२<br>३ | **शगून होजीअरी प्रो. प्रा. संजय व्यंकप्पा नाईकवाड** रा.३७, बेर चैंबर, विजापूर रोड, सोलापूर<br>**महादेवी शाम कानडे** रा. २ अ अत्तार नगर, सोलापूर<br>**सचिन गुलाबचंद शाह** रा. १/९, सुरवसे अपार्टमेंट, होटगी रोड, सोलापूर |

यात अर्जदार पतसंस्था यांनी कलम १०१ अन्वये दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या जाबदार त्यांचे राहते पत्त्यावर सुनावणी नोटिस पाठविली असताना त्या व्यक्ति सदर पत्यावर राहत नसल्याचे अथवा घर बंद असल्याचे नमूद करून नोटिस परत आली आहे. तरी सदर जाहीर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की **उपनिर्दिष्ट अर्जसंबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वतः अथवा वकिलामार्फत दिनांक १६/०१/२०२५ रोजी दुपारी ठीक १२.३० वाजता कागदपत्रासह उपनिबंधक सहकारी संस्था सोलापूर शहर सोलापूर सिटीसेर्वे नं. ८४१३, दूसरा मजला, जुना जिल्हाधिकारी आवारा, सोलापूर ४१३००३** येथे हजर राहावे. या नोटिसद्वारे असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस हजर न राहिल्यास आपल्या गैरहजरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१/०१/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रे सह जाहीर नोटिस दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था सोलापूर शहर, सोलापूर**



## जाहीर नोटीस

सोलापूर शहरातील तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील सिव्हील हॉस्पीटल चौकाजवळील राहुल गांधी झोपडपट्टी ग.व.सु. सोलापूर येथील झोपडी नं. ३९० यांसी मिळकत क्र.१३१४४००४४६ असे आहे. यांसी चतुः सिमा पुर्वेस नफिसा शेख, पश्चिमेस : रिझवान पटेल, दक्षिणेस : मैनु सायरा शेख, उत्तरेस रस्ता, येणे प्रमाणे चतुः सिमेतील मिळकत.

वर नमूद मिळकत ही अब्दुल गफुर महिबुब शेख यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची होती. परंतू अब्दुल गफुर महिबुब शेख यांचे दि.१५/०३/२०१९ रोजी निधन झालेले आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांची धर्मपत्नी श्रीमती सुफिया अब्दुल गफुर शेख ही हयात असून कायदेशीर वारसदार आहे, त्याच्या मृत्यूनंतर सुफिया शेख ही कायदेशीर वारसदार या नात्याने वर नमूद झोपडी क्र. ३९० मालकी हक्काने कब्जे वहिवाटीत आहेत. सुफिया ह्या मयत अ. गफुर महिबुब शेख यांचे एकमेव कायदेशीर पत्नी व वारसदार आहेत.

तरी वर नमूद मिळकतीच्या सोलापूर महागरपालिका ग.व.सु.कर आकारणी रजिस्टरला आमचे अशिलांचे नावाची म्हणजेच सुफिया अब्दुल गफुर शेख यांच्या नावाची नोंद करून घेणेची आहे, तरी सदर बाबत कोणाची हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ८ दिवसाच्या आत कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही तक्रार व हरकत न आल्यास आमचे अशिलांचे नांव सोलापूर महानगरपालिका ग.व.सु. कर आकारणी रजिस्टरला नोंद होईल मुदतीनंतर येणारी कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार व हरकत ही आमचे अशिलावर आणि त्यांनी वर नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली ता. ०३/०१/२०२५

**सही/-**
**ॲड. के. आर. बागबान,**
**बी.कॉम, एलएल.बी, एलएल.एम.**
**रा. ४१२/१०, लक्ष्मी नगर, लिमयेवाडी,**
**सोलापूर, मो.नं. ९९२१३१५७७७**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः मौजे मोडनिंब हद्दीतील लोकांना या जाहीर नोटीसीव्दारे कळविणेत येते की., मिळकतीचे वर्णन : दि. सोलापूर सब दि.ता. माढा पैकी मौजे मोडनिंब हद्दीतील जमीन गट नं. १४६/२ क्षेत्र.१ हेक्टर ३९ आर याबाबत आमचे अशिल चि. रोहन, चि. पुष्पक सचिन बिनगे व सौ. मनिषा सचिन बिनगे रा. मोडनिंब ता. माढा जि. सोलापूर यांनी माढा दिवाणी न्यायालयात रे. मु.नं. ४५४/२०१२ हा दावा सरस निरस मानाने वाटप व विभाजन होवून मिळणेसाठी व दावेतील प्रतिवादी नं. २ गिरीष शिवाजी गिड्डे यांचेविरूध्द दाखल केला आहे. गिरीष गिडडे यांनी जमीन गट नं.१४६/२ क्षेत्र १ हे.३९ आर बाबतचा दिनांक ८.१.२००८ रोजीचा तथाकथित बेकायदेशिर दस्त श्री. सचिन बिनगे यांचेकडून बेकायदेशिर सावकारकी व्यवहारात करून घेतलेला आहे सदर उक्तनमुद शेतजमीनीतील दिनांक. ८.१.२००८ रोजीचे खरेदीखत हे बेकायदेशिर आहे सदर शेतजमीनीत केवळ आमचे अशिलांचीच मालकी हक्कांने कब्जे वहीवाट चालू आहे. गिरीष शिवाजी गिड्डे यांचा जमीन गट १४६/२ क्षेत्र. १ हे ३९ आर यात मालकी हक्कने कब्जा नाही असे असताना दावा प्रलंबीत असताना गिरीष शिवाजी गिड्डे हा सदर जमीन खरेदीदस्त बक्षीसपत्र लिज अथवा इतर दस्ता व्दारे बेकादेयशिरपणे त्रयस्त इसमास हस्तातरण करणेचे तयारीत आहे तसे झालेस आमचे अशिलांचे कायदेशिर मालकी हक्क अधिकारास इजा होईल वरी कोणीही गिरीश शिवाजी गिड्डे यांचे कडून जमीन गट नं.१४६/२ क्षेत्र.१ हे ३९ आर याचा उक्तनमुद हस्तांतरण दस्त करूण घेऊ नये घेतलेस त्यांस होणारे खर्चास व परिणामास सर्वसी तुम्हीच जबाबदार राहाल यांची नोंद घ्यांवी कोणाचीही फसवणूक होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे.

**सही/-**
**ॲड. विकास शिवाजी पाटील**
**बी.ए., एलएल.बी**
**मु. पो. शिवपार्वती मंगल कार्यालयाजवळ**
**गडधरे प्लॉट मोडनिंब ता. माढा**
**जि. सोलापूर मो. नं. ७०२०४७५९२२**



## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या खरेदीपुर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि व सब डि सोलापुर तालुका उत्तर सोलापूर येथील मार्डी येथील गट नंबर ३४३/१, क्षेत्र ०१हे ६० आर, आकार ०१रू ७५ पैसे आहे. यासी चतुःसिमा, पुर्वेस-गट नंबर ३४२, पश्चिमेस वडगाव रस्ता, दक्षिणेस-गट नंबर ३४४, उत्तरेस-गट नंबर ३४३/२ असे आहे. येणेप्रमाणे चतुः सिमेतील शेतजमिन त्यातील तदंगभुत वस्तुसह बबन अमिन बोंगे, जमीदाबी महमद बोंगे, इस्माईल शुकुर बोंगे, जाकीर शुकुर बोंगे, बिसमिल्ला शुकुर बोंगे, वसीम शमीम बोंगे, सद्दाम शमीम बोंगे, सीमा हबीब शेख, आसमा कादर सय्यद यांचे वडीलोपार्जीत संयुक्त मालकी व कब्जेवहीवाटीची आहे. सदर शेतजमिन मालक यांनी वर वर्णनात नमुद शेतजमिन त्यातील तदंगभुत वस्तुसह आमचे अशिल राजेंद्र किसन इमानदार व सिनाना विठ्ठल पवार यांना कायमखुष खरेदी देण्याचे कबुल करून आमचे अशिलाबरोबर सदर व्यवहाराबाबत बोलणी केली असुन आमचे अशिलाकडुन इसारा दाखल रक्कम स्विकारली आहे. सदर संपुर्ण शेतजमिन ही निर्वेध व निजोखमीची व बिनबोज्याची असल्याची ग्वाही व खात्री सदर शेतजमिन मालक यांनी आमचे अशिलास दिली आहे.

आमचे अशिल सदर संपुर्ण जागेच्या खरेदीचा व्यवहार सदर जागा मालकाबरोबर लवकरच पुर्ण करणार आहेत. तरी वर नमुद जागेमध्ये कोणाचाही कोणताही हक्क, हितसंबध, अधिकार, गहाण, टाच, बोजा, लिज, वहिवाट, पोटगी, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, जप्ती अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा हितसंबंध असल्यास त्यांनी ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ०५ (पाच) दिवसाचे आत कागदोपत्री पुराव्यानिशी खालील नमुद पत्यावर लेखी हरकत नोंदवुन पोहोच घ्यावी.

सदर मुदतीत कोणाचीही कसलीही लेखी हरकत, तक्रार न आल्यास वरील नमुद मुदतीनंतर आमचे अशिल सदर नमुद संपुर्ण जागेच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसलीही हरकत तक्रार चालणार नाही कोणाचीही फसगत होऊ नये म्हणुन ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीखः ०४/०१/२०२५.

**सही/-**
**ॲड. श्रीकांत पुंडलिक सपार.**
**४बी-१/३बी, वैष्णवी रूबी नगर,**
**जुळे सोलापूर -४१३ ००८.**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, ता.उ. सोलापूर, जि. सोलापूर येथील व तसेच संपूर्ण सोलापूर जिल्हा परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डि सोलापूर सब डि व तालुका उ. सोलापूर पैकी शहर सोलापूर नेहरु नगर येथील जुना सर्व्हे नं. ३६०/१अ/१क+२अ/३ यासी नविन सर्व्हे नं. ३२/१अ/१क+२अ/३ या पैकी बांधण्यात आलेल्या महालक्ष्मी अपार्टमेंट येथील बिल्डिंग नं. १४ मधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं. अ याचे क्षेत्रफळ ३५.९६ चौरस मीटर इतके आहे, सदरहू मिळकत हि श्री. महेश सुर्यकांत शिंदे यांच्या मालकी व कब्जे वहीवाटीची मिळकत आहे. सदरील मिळकत आमचे पक्षकार श्री. श्रीनिवास बसण्णा तालीकोटी व लक्ष्मीबाई बसण्णा तालीकोटी यांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी परंतु सदरहू मिळकतीबाबतचे पूर्वीचे खरेदी दस्त नं. ७७४ चे मूळ (ओरिजनल) दस्त दि. १४/०२/२००५, खरेदी दस्त नं. १२१४ चे मूळ (ओरिजनल) दस्त दि. ०२/०२/२०११ व खरेदी दस्त नं. १३५० चे मूळ (ओरिजनल) दस्त दि. ०८/०२/२०११ ची प्रत श्री. महेश सुर्यकांत शिंदे यांच्याकडून दि. २३/१२/२०२४ रोजी कंबर तलाव ते गव्हर्नमेंट आय.टी.आय, सोलापूर परिसर येथे अनावधनाने गहाळ झालेले/हरविलेले आहेत. तसेच त्याबाबत श्री. महेश सुर्यकांत शिंदे यांनी विजापूर नाका पो.स्टे., सोलापूर येथे (ऑनलाइन पद्धतीने) दि. ०३/०१/२०२५ रोजी वर नमूद दस्त गहाळ झालेबाबत गहाळ रजि. नं. ६०/२०२५ अन्वये तक्रारदेखील दाखल केलेली आहे. तसेच सदरहू दस्ताशी आमचे पक्षकाराशिवाय अन्य कोणाचा कसलाही कायदेशीर हक्क व हितसंबंध नाही.

तथापी जरी कोणत्याही व्यक्तीचा रजिस्टर खरेदी दस्त नं. ७७४/२००५, १२१४/२०१४ व १३५०/२०११ (सब रजिस्टर, उ. सोलापूर) या दस्ताशी कसल्याही प्रकारचा काहीही संबंध अथवा अधिकार अथवा अन्य काही संबंध असल्यास किंवा आल्यास तसेच सदरील दस्त कोणाला आढळून आल्यास किंवा मिळाल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून तीन दिवसाच्या आत ॲड. प्रविण चंद्रकांत निकम, रा.अभिषेक नगर, सोलापूर मो.नं. ९०२१८२१२५५ यांचेशी प्रत्यक्ष भेटून आपला आक्षेप पुराव्यानिशी नोंदवावा किंवा द्यावा. तसेच त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँका अथवा अन्य कोणाचाही कसलाही विचार केला जाणार नाही. तसेच त्यानंतर येणाऱ्या व्यक्तींचा सदर दस्ताशी काहीही संबंध नाही असे गृहीत धरले जाईल. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे.

ही जाहीर नोटीस दि. ०३/०१/२०२५

**सही/-**
**ॲड. प्रविण चंद्रकांत निकम**
**बी.ए., एल.एल.बी.**
**मो.नं.९०२१८२१२५५**
**अभिषेक नगर, सोलापूर.**

## महत्त्वाचे

### पॅरा-ॲथ्लिट्सना खेलरत्न मिळाल्यामुळे आनंद : प्रवीण

**नवी दिल्ली** : मला प्रतिष्ठेचा मेजर ध्यानचंद खेलरत्न पुररस्कार मिळाल्यामुळे आनंद झाला, मात्र अधिक पॅरा-ॲथ्लिट्सना हा पुरस्कार मिळाला असता, तर अधिक आनंद झाला असता, असे पॅरा उंच उडी खेळाडू प्रवीण कुमार याने म्हटले आहे. प्रवीण कुमार हा पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकलेल्या चार ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार विजेत्यांपैकी एक आहे. त्याची देशाच्या सर्वोच्च क्रीडा सन्मानासाठी निवड झाली आहे. ऑलिम्पिक पदकविजेती नेमबाज मनू भाकर, बुद्धिबळ विश्वविजेता डी. गुकेश आणि पॅरिस ऑलिम्पिकचा कांस्यविजेता पुरुष हॉकी कर्णधार हरमनप्रीत सिंग या तीन सक्षम खेळाडूंसह प्रवीणला खेलरत्न प्रदान करण्यात येणार आहे. तिरंदाज हरविंदर सिंग सारख्या काही पॅरा-ॲथ्लिट्सने गत वर्षी पॅरिसमध्ये टोकियो ऑलिम्पिकचे कांस्यपदक सुवर्णमध्ये बदलले. त्याचा खेलरत्नसाठी विचार न केल्याबद्दल प्रवीण कुमारने नाराजी व्यक्त केली. पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये सात सुवर्णांसह भारताच्या २९ पदकांचा विक्रम मोडीत काढल्यानंतर हे घडले.



### झिम्बाब्वे- आयर्लण्ड मालिका फेब्रुवारीमध्ये

**हरारे** : झिम्बाब्वे आणि आयर्लण्ड यांच्यादरम्यान फेब्रुवारी २०२५ मध्ये सर्वस्वरुपाच्या क्रिकेटची सात सामन्यांची मालिका होणार आहे. झिम्बाब्वे क्रिकेटने जाहीर केलेल्या या मालिका दौऱ्याची सुरुवात ६ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारीदरम्यान बुलावायो येथे होणाऱ्या एकमेव कसोटी सामन्याने होईल. त्यानंतर हरारे येथे तीन एकदिवसीय आणि तीन टी-२० सामने खेळले जातील. ही मालिका झिम्बाब्वेसाठी अफगाणिस्तानविरुद्धच्या आव्हानात्मक घरच्या मालिकेनंतर पुन्हा गती मिळविण्याची महत्त्वपूर्ण संधी दर्शवते. पावसामुळे प्रभावित झालेल्या पहिल्या कसोटीत अनिर्णित राहिल्यानंतरही, झिम्बाब्वे पांढऱ्या चेंडूंच्या मालिकेत कमी पडला, टी-२० मालिका २-१ ने आणि एकदिवसीय मालिका २-० ने गमावली. सध्याच्या अफगाणिस्तान दौऱ्याची सांगता दुसऱ्या कसोटीने होणार असून हा कसोटी सामना ६ जानेवारी रोजी संपणार आहे, असे झिम्बाब्वे क्रिकेटचे व्यवस्थापकीय संचालक गिव्हमोर माकोनी यांनी सांगितले.

### अर्जुन पुरस्कारासाठी दुर्लक्ष केल्यामुळे गुजराथी निराश

**नवी दिल्ली** : भारताचा ग्रॅण्डमास्टर विदित गुजराथी याने शुक्रवारी अर्जुन पुरस्कारासाठी पुन्हा वंचित राहिल्यानंतर निराश झाल्याचे सांगितले. बुडापेस्ट, हंगेरी येथे २०२४ च्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये सुवर्ण जिंकणाऱ्या भारतीय संघाचा विदित भाग होता. २०२३ ग्रॅण्ड स्विस बुद्धिबळ स्पर्धेतही तो विजयी झाला आणि २०२४ कॅण्डिडेट स्पर्धेसाठी पात्र ठरला होता. हॅण्गझोऊ आशियाड क्रीडा स्पर्धेत त्याने डी. गुकेश, अर्जुन एरिगायसी, पेंटाला हरिकृष्णा आणि आर. प्रज्ञानंधासह पुरुषांच्या सांघिक स्पर्धेत रौप्यपदक जिंकले. निराश, हो□पण मी आता पुरस्काराकडे लक्ष देणार नाही व मी माझ्या नियंत्रणात काय आहे यावर लक्ष केंद्रित करेन. मला मिळालेल्या प्रत्येक गोष्टींबद्दल मी मनापासून कृतज्ञ आहे, असे विदित गुजराथी म्हणाला. केनेडी यांनी म्हटल्याप्रमाणे : तुमचा देश तुमच्यासाठी काय करू शकतो हे विचारू नका, तुम्ही तुमच्या देशासाठी काय करू शकता याचा विचार करा, असे विदित म्हणाला.



### झेक प्रजासत्ताकचा इटलीवर विजय

**सिडनी** : कॅरोलिना मुचोव्हा आणि टॉमस मॅचॅक यांच्या नेतृत्वाखाली झेक प्रजासत्ताक संघाने शुक्रवारी इटलीचा २-१ असा पराभव करून युनायटेड चषक टेनिस स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. जागतिक क्रमवारीत २२ व्या स्थानावर असलेल्या मुचोव्हाने जागतिक क्रमवारीत ४ व्या असलेल्या जस्मिन पाओलिनीवर सलग पाचवा विजय नोंदविला. अंतिम फेरीत स्थान मिळवण्यासाठी झेक प्रजासत्ताकचा पुढील सामना अमेरिकेशी होईल. टॉमस मॅचॅकने अवघ्या ५४ मिनिटांत ६-१, ६-२ असा विजय मिळवला. तत्पूर्वी, मुचोव्हाने चौथ्या मानांकित जास्मिन पाओलिनीचा ६-२, ६-२ असा करत झेक प्रजासत्ताकला १-० अशी आघाडी मिळवून दिली. या विजयामुळे मुचोव्हाचा विजयाचा रेकॉर्ड पाओलिनीवर ५-० असा सुधारला. मला खरोखर संघासाठी एक गुण मिळवायचा होता म्हणून मी लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न करत होती. पाओलिनी ही एक अविश्वसनीय खेळाडू आहे. हा खरोखरच कठीण सामना होता. मला शेवटपर्यंत लढायचे होते व मी लढलीसुद्धा, याचा मला आनंद झाला, असे मुचोव्हा म्हणाली.

# हिरवळ खेळपट्टीवर ऑस्ट्रेलियाचे वर्चस्व

## स्कॉट बोलॅण्डचे ४ बळी ● भारत सर्वबाद १८५, ऑस्ट्रेलिया १ बाद ९ धावा



ऑस्ट्रेलियाविरुद्ध फटकेबाजी करताना ऋषभ पंत



तिसऱ्या पंचाव्दारे गडी बाद केल्याचा आनंद साजरा करताना स्कॉट बोलॅण्ड व मार्नस लॅबुशेन

**◆ सिडनी, ३ जानेवारी**

बॉर्डर-गावस्कर चषक पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पाचव्या आणि अंतिम सामन्याला येथे शुक्रवारपासून प्रारंभ झाला. सामन्याच्या पहिल्या दिवशी भारताचा पहिला डाव ७२.२ षटकांत सर्वबाद १८५ धावांतच आटोपला व दिवस अखेर प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाने ३ षटकांत १ बाद ९ धावा केल्या. रोहित शर्माच्या अनुपस्थितीत भारतीय संघाचे नेतृत्व करणाऱ्या जसप्रीत बुमराहने शेवटच्या चेंडूवर उस्मान ख्वाजाला बाद करून ऑस्ट्रेलियाला पहिला धक्का दिला.

मालिकेतील अखेरच्या कसोटी सामन्यासाठी कर्णधार रोहित शर्मानि विश्रांती घेण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे संघनेतृत्वाची जबाबदारी बुमराहने स्वीकारली.

बुमराहने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर भारतीय फलंदाजांना ऑस्ट्रेलियाच्या प्रभवी गोलंदाजीविरुद्ध कडवा संघर्ष करावा लागला.

चेंडूला असमान उसळी देणाऱ्या सिडनीच्या हिरव्यागार खेळपट्टीवर वेगवान गोलंदाजांचा सामना करणे भारतीय फलंदाजांना खूपच अवघड गेले. भारतीय संघ केवळ ७२.२ षटकेच खेळू शकला. वेगवान गोलंदाज स्कॉट बोलॅण्डने ८ निर्धाव षटकांसह २० षटकांत ३१ धावा देत ४ गडी बाद केले. त्याने केवळ एक नोबॉल टाकला. मिचेल स्टार्कने ३ बळी घेतले. पॅट कमिन्सने २, तर नॅथन लियोनला १ बळी मिळाला.

यशस्वी जयस्वाल (१०) व केएल राहुल (४) ही सलामीची जोडी लवकरच तंबूत परतली. मिचेल स्टार्कने केएल राहुलला कोन्स्टासकडून, तर बोलॅण्डने जयस्वालला वेबस्टरकडून झेलबाद केले.

भारताकडून ऋषभ पंतने सर्वाधिक ४० धावा केल्या. याशिवाय रवींद्र जडेजा २६, कर्णधार जसप्रीत बुमराह २२ धावा, शुभमन गिल २० धावा, विराट कोहली १७ धावा व यशस्वी जयस्वाल १० धावा करू शकला. याशिवाय इतर फलंदाजांना दुहेरी आकडाही गाठता आला नाही. केएल राहुलला चार, प्रसिध कृष्णाला तीन आणि मोहम्मद सिराजला तीन धावा करता आल्या. नितीश कुमार रेड्डीला खातेसुद्धा उघडता आले नाही.

डावाच्या ५७ व्या षटकात १२० धावांवर भारताला सलग दोन चेंडूंवर दोन मोठे धक्के बसले आहे. स्कॉट बोलंडने ऋषभ पंत आणि नितीश रेड्डीला बाद केले. वाईट फटका खेळून पंत पुन्हा बाद झाला. त्याचवेळी पुढच्या चेंडूवर बोलॅण्डने नितीश रेड्डीला स्लिपमध्ये झेलबाद केले. पंतने जडेजासोबत पाचव्या गड्यासाठी ४८ धावांची भागीदारी केली होती.

भारताला १४८ धावांवर आठवा धक्का बसला. वॉशिंग्टन सुंदरला मैदानावरील पंचाने नाबाद घोषित केले, परंतु त्यानंतर तिसऱ्या पंचाने निर्णय बदलून सुंदरला बाद जाहीर केले.

बुमराहच्या अखेरच्या चेंडूवर उस्मान ख्वाजा (२) केएल राहुलकडून झेलबाद होताच ऑस्ट्रेलियाचा पहिल्या डावाचा खेळ संपला. खेळ थाबला तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या १ बाद ९ धावा होत्या व सॅम कोन्स्टास ७ धावांवर नाबाद होता.

(वृत्तसंस्था)



## बेसबॉल खेळाडूंचा खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

सोलापूर शहर व जिल्हा बेसबॉल संघटनेचा सोलापूरचा खेळाडू स्वप्नील सुनील भोसले व सिताराम काशिनाथ भांड यांनी पंजाब येथे झालेल्या ३७व्या सीनियर राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून महाराष्ट्र बेसबॉल संघास सुवर्ण पदक मिळवून दिले. त्यांचा खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, शहराध्यक्ष चेतन नरोटे व बेसबॉल संघटनेचे जिल्हाध्यक्ष नगरसेवक सीए विनोद भोसले उपस्थित होते.

या दोघाना प्रा.संतोष खेंडे प्रशांत कदम यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे महाराष्ट्र बेसबॉल असोसिएशनचे सचिव राजेंद्र इखनकर, सोलापूर शहर व जिल्हा बेसबॉल संघटनेचे उपाध्यक्ष प्रा.संतोष गवळी, मारुती घोडके, प्रा.नागनाथ नवगिरे, राजाराम शितोळे यांनी अभिनंदन केले आहे.

# भारतीय पुरुष व महिला खो-खो संघाची घोषणा ८ जानेवारी रोजी

## खो-खो विश्वचषक ● तारा व तेजस शुभंकरचे अनावरण




पहिल्या खो-खो विश्वचषकाचे शुभंकर तारा व तेजसचे अनावरण

**◆ नवी दिल्ली, ३ जानेवारी**

आगामी १३ ते १९ जानेवारीदरम्यान येथे होणाऱ्या पहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय पुरुष व महिला खो-खो संघाची घोषणा ८ जानेवारी रोजी करण्यात येणार आहे, असे भारतीय खो-खो महासंघाचे अध्यक्ष सुधांशू मित्तल यांनी सांगितले. ते तारा आणि तेजस या शुभंकराच्या अनावरण समारंभात बोलत होते.

पुरुष व महिला गटांसाठी प्रत्येकी १५ सदस्यीय संघांना अनुक्रमे भारत अ व भारत ब असे नाव दिले जाईल. सध्या सुरु असलेल्या ६० खेळाडूंच्या शिबिरातून भारतीय संघाची निवड केली जाणार आहे. नवी दिल्लीतील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियम व नोएडा इनडोअर स्टेडियममध्ये ही स्पर्धा होणार आहे. निवडण्यात येणाऱ्या दोन्ही संघांना सात दिवसांचे व्यस्त वेळापत्रक लक्षात घेऊन मैदानात उतरवले जाईल, जेथे प्रत्येक संघ दररोज अनेक सामने खेळेल, असे ते म्हणाले.

### पाकिस्तान खो-खो संघाला व्हिसाची प्रतीक्षा

पाकिस्तानी खेळाडूंना पहिल्यावहिल्या खो-खो विश्वचषकात सहभागी होता येईल, या आशेने त्यांना व्हिसाची प्रतीक्षा आहे. १३ जानेवारी रोजी भारत आणि पाकिस्तान या स्पर्धेच्या पहिल्या सामन्यात भिडणार आहे.

व्हिसा अजून आलेला नाही. मी थोडा तणावात आहे, पण सर्व काही वेळेत व्यवस्थित होईल, असे मित्तल म्हणाले.

या स्पर्धेत अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, ऑस्ट्रेलिया व ब्राझीलसह २४ देशांचा सहभाग असणार आहे. पुरुष व महिला दोन्ही संघांसाठी स्पर्धा साखळी तसेच बाद पद्धतीने खेळविली जाणार आहे.

इंडोनेशिया केवळ महिलांचा संघ पाठवणार आहे, तर इत दोन्ही गटांमध्ये संघ पाठवतील. उपांत्यपूर्व फेरी १७ जानेवारी रोजी, उपांत्य फेरी १८ जानेवारी रोजी व अंतिम सामना १९ जानेवारी रोजी होणार आहे. एकूण ६१५ खेळाडू व १२५ सहकारी स्टाफ सहभागी होतील. भारताचे राष्ट्रीय शिबिर सध्या जवाहरलाल नेहरू स्टेडियमवर सुरू असून शिबिरात ६० पुरुष व तेवढ्याच महिला खेळाडू सहभागी झाले आहेत.

(वृत्तसंस्था)

## राष्ट्रीय फुटबॉल टेनिस स्पर्धेत पानगल प्रशाला तृतीय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

कन्याकुमारी येथे झालेल्या राष्ट्रीय फुटबॉल टेनिस स्पर्धेमध्ये एम.ए. पानगल अँगल उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजने १७ व १९ वर्षांखालील मुलींच्या गटात तृतीय स्थान मिळविले.त्यांना क्रीडा शिक्षक म.आली शेख, नावेद मुंशी, अल्ताफ सिद्दिकी व इक्बाल दलाल सर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्राचार्य डॉ. हारुन रशीद बागबान, उपमुख्याध्यापिका सूररया परवीन जहागीरदार, निकहत नह्लामंदू आदींनी अभिनंदन केले.

**कामगिरी केलेले खेळाडू :** १७ वर्षांखालील : साकीब सौदागर, अब्दुल्ला पटेल व कोतकुंडे अफवान. १९ वर्षांखालील : बागवान अयान, जैन हन्नुरे, मुजमेल पटेल.



## सोलापुरात रंगणार क्रिकेटचा महासंग्राम; मिडिया कपचे आज होणार उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

सोलापूर श्रमिक पत्रकार संघ व सोलापूर ॲडव्हार्टायझिंग वेल्फेअर असोसिएशन (सावा) यांच्या संयुक्त विद्यमाने मिडिया कप २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे.

या क्रिकेट स्पर्धेचे उदघाटन शनिवारी सकाळी १० वाजता सोलापुरातील रेल्वे मैदानावर सोलापूर ग्रामीण पोलिस दलाचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी रेल्वेचे वरिष्ठ वाणिज्य मंडल प्रबंधक योगेश पाटील, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष




विक्रम खेलबुडे, सावा संघटनेचे अध्यक्ष संतोष उदगिरी, जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव चंद्रकांत रेम्बुर्स यांच्यासह अन्य मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

या स्पर्धेला मुख्य प्रायोजक म्हणून माजी नगरसेवक अनंत जाधव हे लाभले आहेत. तर सहप्रायोजक म्हणून माजी नगरसेवक अमोल शिंदे, स्पेनका तर विशेष सहकार्य व्ही.आर. पवार सारीज, बँक ऑफ इंडिया, सीए विनोद भोसले यांचे सहकार्य असणार आहे.

या मिडिया कप २०२५ च्या स्पर्धेत १० संघ सहभागी होत आहेत. अंदाजे २०० हून अधिक पत्रकार, छायाचित्रकार, कॅमेरामन यांचा समावेश असणार आहे. पहिल्या दिवशी १० सामने तर दुसऱ्या दिवशी १० सामने होणार आहेत. या स्पर्धेतील अंतिम सामना रविवारी सायंकाळी ४.३० वाजता होणार आहे. त्यानंतर त्याचठिकाणी बक्षीस वितरणाचा समारंभ होणार आहे.

या स्पर्धेतील सामने पाहण्यासाठी सोलापुरातील क्रिकेट प्रेमींनी उपस्थित रहावे असे आवाहन श्रमिक पत्रकार संघ व सावा संघटनेने केले आहे.

### सामन्यांचे थेट प्रक्षेपण मोबाईलवर...

रेल्वे मैदानावर होत असलेल्या मिडिया कप २०२५मधील सर्व सामन्यांचे थेट प्रक्षेपण होणार आहे. हे सामने मोबाईलवर पाहता येणार आहेत. यासाठीची विशेष व्यवस्था संयोजकांकडून करण्यात आली आहे. शिवाय लाईव्ह स्कोरही मोबाईलवर पाहता येणार आहे.



## विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव चॅरिटेबल ट्रस्टकडून खो-खोसाठी फिरते करंडक

### जिल्हा खो-खो निवड चाचणीत उद्योजक रेवणसिद्ध बिज्जरगी यांची घोषणा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव चॅरिटेबल ट्रस्टकडून पुरुष व महिला जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धेतील विजयी संघांना फिरते करंडक देण्यात येणार असल्याची घोषणा विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव चॅरिटेबल ट्रस्टचे सदस्य व उद्योजक रेवणसिद्ध बिज्जरगी यांनी केली.

धाराशिव येथे रविवार ५ जानेवारी रोजी नॅशनल गेम्सच्या चाचणीसाठी सोलापूर जिल्ह्यातून ३ पुरुष व २ महिला खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्हा खो-खो निवड चाचणी उत्कर्ष क्रीडा मंडळाच्या वतीने ह. दे. प्रशालेच्या मैदानावर सुरु झाली. यात ३० खेळाडूंनी भाग घेतला आहे. या चाचणीच्या उद्घाटनप्रसंगी त्यांनी ही घोषणा केली.

यावेळी ट्रस्टचे संस्थापक सदस्य विजय शाबादी, विश्वनाथ आमने, गणेश कोळी, निवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी अशोक भांजे, सोलापूर ॲम्युचर खोखो असोसिएशनचे खजिनदार श्रीरंग बनसोडे, उपाध्यक्ष सुनील चव्हाण, सहसचिव मोहन रजपूत, सह खजिनदार सोमनाथ बनसोडे, तांत्रिक समिती सचिव उमाकांत गायकवाड, पंचमंडळ सचिव गोकुळ कांबळे, प्रा. विजय दत्तू, अतुल जाधव, पुंडलिक कलखांबकर, श्रीनाथ खटके, विजय आडगळे आदी उपस्थित होते. सोलापूर ॲम्युचर खोखो असोसिएशनचे सचिव ए. बी. संगवे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. उत्कर्ष क्रीडा मंडळाचे सचिव अजित शिंदे यांनी आभार मानले.

## सांगोल्याचे प्रशांत मस्के राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी संघव्यवस्थापक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**



सांगोला शहर व तालुका बास्केटबॉल असोसिएशन सचिव व सोलापूर शहर जिल्हा ॲम्युचर असोसिएशनचे सहसचिव प्रशांत मस्के यांची राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी संघव्यवस्थापक म्हणून निवड झाली आहे. भावनगर येथे होणाऱ्या ७४व्या सिनियर राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी पुरुषांच्या संघव्यवस्थापक म्हणून ते सहभागी होतील. त्यांचे संघटनेचे अध्यक्ष खासदार धैर्यशील मोहिते पाटील, सचिव एम. शफी, नितीन चपळगावकर, जुबेर शेख, अनिल जाधव, प्रा. महेश डेंबरे, अनिल देशपांडे, सादत खरादी, बुजरूक सगरी, श्रीधर गायकवाड यांनी शुभेच्छा दिल्या.

## लोकमंगल प्रशालेच्या संजना बावळेला सुवर्ण

### जिल्हा योगासन स्पर्धा : वैष्णवी भोसलेला कांस्य



वैष्णवी भोसले



संजना बावळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

जिल्हा योगासन स्पर्धेत अवंती नगर येथील लोकमंगल प्रशालेच्या संजना बावळे हिने सुवर्ण तर वैष्णवी भोसले हिने कांस्य पटकाविले.

जिल्हा योग परिषद कित्तूर चन्नमा प्रतिष्ठान व रोटरी क्लब यांच्यावतीने ही स्पर्धा डफरीन चौक येथील नूमवी शाळा घेण्यात आली. त्यामध्ये नववी ते दहावी गटातून संजनाला प्रथम सुवर्णपदक, प्रमाणपत्र व २०१ रुपयाचे बक्षीस तिला मिळाले व वैष्णवीने कांस्यपदक पटकावले. तिला एकशे एक रुपये व प्रमाणपत्र मिळाले. या खेळाडूंना क्रीडाशिक्षक रतिकांत म्हमाणे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूंचे दक्षिण सोलापूर तालुक्याचे आमदार सुभाष देशमुख, अवंती शिक्षण संस्थेचे सचिव प्रदीप साठे कार्यकारी संचालक अभयसिंह साठे व मुख्याध्यापिका शुभांगी साठे यांनी अभिनंदन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# थेट विठ्ठल मंदिरापर्यंत मंत्री विखे-पाटलांच्या गाड्यांचा ताफा

## भाविकांना कमालीचा त्रास; सर्वस्तरातून नाराजी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ जानेवारी-**

मंत्री महोदय किंवा व्हीआयपीच्या गाड्यांचा थाफा थेट विठ्ठल मंदिरापर्यंत नेल्यास सर्वसामान्य भाविकांना त्याचा त्रास होतो. गर्दीच्या वेळी तरी मंत्र्यांनी तसेच व्हीआयपीं मंडळींनी आपला डामडौल बाजूला ठेवून सर्वसामान्य भाविकांना त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी अशी मागणी सर्वसामान्य भाविकांमधून केली जात आहे.

दरम्यान गुरुवारी रात्रीच राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील हे येथे आलेले होते. त्यांनी देखील आपल्याबरोबर असलेल्या २० ते ३० गाड्यांचा ताफा थेट विठ्ठल मंदिरापर्यंत आणला होता. त्यामुळे नाताळसुट्टी तसेच नववर्षाच्या स्वागतासाठी येथे आलेल्या भाविकांना त्याचा थेट त्रास सहन करावा लागला. त्यामुळे सर्वसामान्य भाविकांमधून मंत्रीमहोदयांच्या या कृतीमुळे नाराजी व्यक्त केली जात आहे. मागील दहा ते बारा वर्षापूर्वी काही काळ व्हीआयपी मंडळी तसेच मंत्रीमहोदयांच्या गाड्यांचा ताफा छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंतच येवु दिला जात होता. त्या ठिकाणी गाड्यांचा ताफा थांबविला जात असत. तेथून मंत्री महोदय पायी चालत विठ्ठलाच्या दर्शनासाठी मंदिरा पर्यंत जात असत. अनेक मंत्र्यांकडून या शिस्तीचे पालन केले जात असे. मात्र पुन्हा ही शिस्त खंडीत झाली. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने पुन्हा पंढरपूर बाबत एक खास नियमावाली तयार करुन त्याची सर्वसामान्यांपासून ते व्हीआयपी मंडळींपर्यंत सर्वांनीच अमंलबजावणी करावी अशी मागणी सर्वसामान्यांमधून केली जात आहे.



> गर्दीच्या वेळी तरी व्हीआयपी तसेच मंत्री महोदयांनी आपल्या गाड्या मंदिराच्या व्दारा पर्यंत आणू नयेत. आमच्या बरोबर वृध्दमंडळी, लहानमुले तसेच महिला देखील आहेत. मंत्र्यांच्या गाड्यांच्या ताफ्यामुळे मंदिर परिसरात साधे चालणे देखील अवघड होऊ लागलेले आहे.
>
> **- श्वेता पाटील, भाविक, मुंबई**

### मुख्यमंत्र्यांचा आदर्श तरी मंत्र्यांनी घेणे गरजेचे

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कालच एक आदेश जारी करुन कोणत्याही जिल्ह्यात त्यांचा दौरा असला तर कोणतेही आधिकारी पुष्पगुच्छ आणणार नाहीत या बरोबरच पोलिस दलाकडून देण्यात येणाऱ्या मानवंदनेची प्रथा देखील त्यांनी बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे मुख्यमंत्रीपद हे डामडौल मिरवण्यासाठी नसून काम करण्यासाठी आहे. आपण जनतेचे सेवक आहोत हे त्यांनी दाखवुन दिले आहे. निदान याचे तरी भान राज्यातील इतर मंत्र्यांनी, व्हीआयपी नेतेमंडळींनी लक्षात घेतले पाहिजे. मुख्यमंत्र्यांचा आदर्श तरी सर्वांनी घेतला पाहिजे.

> आपणाला या बाबतची कल्पना असती तर आपण आपल्या गाड्यांचा ताफा छत्रपती शिवाजी महाराज चौकातच थांबविला असता. भाविकांना त्रास होईल अशी कोणतीही आपली भूमिका नव्हती. आषाढी किंवा इतर यात्रांच्यावेळी आपण येथे येतो त्यावेळी आपण शिवाजी महाराज चौकापासून पायीच येतो. आपण पालकमंत्री असताना आषाढी यात्रेचे नियोजन यापूर्वी कधी झाले नव्हते असे भाविकांचे हित लक्षात घेवून त्यांना जास्तीत जास्त सुविधा पुरविल्या जाव्यात असे करण्यात आलेले होते. त्यामुळे या पुढील काळात आपण निश्चित याची दक्षता घेवू.
>
> **-राधाकृष्ण विखे-पाटील, जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य**

> गर्दीच्या वेळी नव्हे तर प्रत्येक दिवशी मंत्री महोदयांच्या गाड्यांचे ताफे थेट विठ्ठल मंदिरा पर्यंत येवू देवू नयेत. सर्वसामान्य भाविकांना त्याचा कमालीचा त्रास होतो. या पुढे आपण असे झाले तर आंदोलनाचे हत्यार उपसणार आहोत.
>
> **- गणेश अंकुशराव, सामाजिक कार्यकर्ते, पंढरपूर**



# महाराष्ट्र बागवान वर्किंग कमिटीतर्फे माजी आ. राजेंद्र राऊत यांना विकासरत्न पुरस्कार

## २०२५ दिनदर्शिकेचे राऊत यांच्या हस्ते लोकार्पण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ जानेवारी-**

महाराष्ट्र बागवान वर्किंग कमिटीच्यावतीने माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या २०१९ ते २०२४ या आमदारकीच्या कार्यकाळात बार्शी शहर व तालुक्यासाठी आमदार निधीतून विविध विकास कार्याबद्दल व विशेषता बागवान समाज मंदिरासाठी ३० लाखांचा निधी दिल्याबद्दल विकासरत्न सन्मानपत्र देऊन माजी आमदार राऊत यांचा संस्थापक अध्यक्ष डॉ. शरीफ बागवान यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी दिनदर्शिकेचे लोकार्पण माजी आ. राऊत यांनी केले.

यावेळी कमिटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शरीफ बागवान, बागवान सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष जुबेर बागवान, सचिव कदीर भाई बागवान, रईस बागवान, इतर कार्यकर्ते उपस्थित होते. या सोहळ्याप्रसंगी बागवान सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष जुबेर बागवान यांनी वर्किंग कमिटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शरीफ बागवान यांचा सत्कार केला. यावेळी वर्किंग कमिटीचे महाराष्ट्राचे पदाधिकारी जुबेर बागवान, सचिव कदीर बागवान, नासिर बागवान सातारा, रईस बागवान वैराग, हाजी शौकत बागवान, हाजी मुस्ताक बागवान मोहोळकर, जावेद बागवान, अकबर बागवान, जावेद रफिक एजाज बुरहान, नवाज रमदान, रमजान तुटके, इब्राहिम काजी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त




### शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये १०१ जणांचे रक्तदान

**सांगोला, दि. ३ जानेवारी-**

सांगोला येथील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त घेतलेल्या शिबिरात १०१ जणांनी रक्तदान केले. उद्घाटन डॉ. शैलेश डोंबे, डॉ. अजिंक्य नष्टे, डॉ. बसवराज पाटील, डॉ. विजय फुले, संस्थेचे सचिव अंकुशराव गायकवाड, विश्वस्त डॉ. यशोदीप गायकवाड यांच्या हस्ते झाले. यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. २१० विद्यार्थिनींची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. डॉ. मेघना देवकते यांनी मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्य डॉ. आर. ए. देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समन्वयक प्रा. पृथ्वीराज लिगाडे, प्रा. दीपाली जुगदर, प्रा. श्रेया कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.

### बुद्धिबळ स्पर्धेत आरोही आलदर लहान गटात तालुक्यात प्रथम

**सांगोला, दि. ३ जानेवारी-**



बुद्धिबळ स्पर्धेत जि.प.शाळा बोधगिरेवस्ती, कोळा, ता. सांगोला या शाळेची विद्यार्थिनी आरोही तुकाराम आलदर हिने प्रथम क्रमांक मिळवला व जिल्हास्तर स्पर्धेसाठी पात्र ठरली. सोलापूर जिल्हा परिषदच्या वतीने सदर स्पर्धा चिंचोली हायस्कूल मध्ये पार पडल्या. स्पर्धा पार पाडण्यासाठी गटशिक्षणाधिकारी सुयोग नवले, विस्तार अधिकारी अमोल भंडारी व सर्व केंद्राचे केंद्रप्रमुख यांनी परिश्रम घेतले. बीडीओ कुलकर्णी यांच्या हस्ते विजयी स्पर्धकांना बक्षीस वितरण करण्यात आले. आरोही आलदर हिला शाळेचे उपशिक्षक सतीश कारंडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. आलदर हिचे मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शंकर आलदर व सदस्य, पालक वर्ग यांनी अभिनंदन केले. तसेच जिल्हास्तर स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



### अक्कलकोट येथे छत्रपती शिवरायांना अभिवादन करून नवीन वर्षाचे स्वागत

**अक्कलकोट, दि. ३ जानेवारी-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळातील छत्रपती शिवरायांना अभिवादन करून माजी सैनिक मेजर श्रीकांत मोरे यांच्याकडून नवीन वर्षाचे स्वागत करण्यात आले. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास मेजर श्रीकांत मोरे यांच्याकडून नवीन वर्षानिमित्त अभिवादन करण्यात आले. यानंतर उपस्थित श्री स्वामी समर्थ भक्तांना लाडू भरवून मेजर श्रीकांत मोरे यांनी नवीन वर्षाच्या सर्व स्वामी भक्तांना शुभेच्छा दिल्या.

# शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयामध्ये विधी साक्षरता शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ जानेवारी-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी, संचलित शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय बार्शी, येथे आज तालुका विधी सेवा समिती बार्शी यांचेवतीने (कॉमन मिनिमम प्रोग्राम माहे डिसेंबर २०२४) कायदेविषयक साक्षरता शिबीर आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे श्रद्धास्थान छ.शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. कार्यक्रमाची रुपरेषा व प्रास्ताविक वकील संघ बार्शीचे अध्यक्ष ॲड. काकासाहेब गुंड यांनी सविस्तरपणे मांडली.

या साक्षरता शिबिरासाठी उपस्थित असणारे कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमुख पाहुणे व इतर मान्यवरांचे स्वागत अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य आणि सर्व शिक्षक वृंद यांनी केले. याप्रसंगी ड. डी.पी. घोगरे यांनी मुलांसाठी बालस्नेही कायदेशीर सेवा आणि त्यांचे संरक्षण या विषयावरती सविस्तर मार्गदर्शन केले. यानंतर ॲड.श्रीमती कुलकर्णी यांनी पीडित महिला आणि लैंगिक अत्याचाराच्या इतर गुन्ह्यातून वाचलेल्यांसाठी भरपाई योजना या विषयावरती विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच या अंतर्गत मनोधैर्य यासारख्या विविध शासकीय योजनांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

ॲड. अक्षय पाटील यांनी शाळा व महाविद्यालयांमध्ये पोस्को कायदा याविषयी सविस्तर माहिती दिली. यामध्ये त्यांनी शाळा व महाविद्यालयांमध्ये कशा प्रकारे काळजी घेतली जावी, सीसीटीव्ही बसवले जावेत, विविध समित्या स्थापन केल्या जाव्यात व तक्रारपेटी ठेवली जावी, असे विचार मांडले. यानंतर ॲड. संजय कोकाटे यांनी स्त्रीभ्रूणहत्या आणि इतर प्रचलित सामाजिक दुष्कृते याविषयी विद्यार्थ्यांच्यामध्ये जागृती करण्याचे हेतूने विविध उदाहरणे देऊन महाराष्ट्रातील असलेल्या कायद्याबद्दल मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्रमुख उपस्थित असलेले प्राचार्य डॉ. डी. पी. गुंड सर यांनी प्राथमिक शिक्षकाला कायदेविषयक ज्ञान असणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत व्यक्त करुन या शिबिराचा आमच्या विद्यार्थ्यांना खरोखरीच फायदा झाला असे नमूद केले. यानंतर या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीमती जी. एस. पाटील मॅडम ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, बार्शी यांनी आपले अध्यक्षीय समारोप मांडले. अलीकडच्या काळामध्ये समाजामध्ये १८ वर्षाखालील मुले आणि मुली यांच्याबाबतीत वेगवेगळ्या प्रकारचे गुन्हे घडण्याचे प्रमाण वाढत चाललेले आहे. त्यामुळे समाजाला निश्चितपणे कायद्याचा धाक असणं गरजेचे आहे. यामध्येही बालकेही काही प्रमाणामध्ये गुन्हेगार म्हणून सापडत आहेत. यासाठी सध्याच्या काळामध्ये घरामध्ये सुसंवाद कमी होत आहे.

तो सुसंवाद अधिक वाढणे गरजेचे आहे. जेणेकरुन पुढच्या पिढीला सुरक्षित भविष्य सहजपणे घरापासूनच मिळू शकेल. त्याचबरोबर बालकांनी आपल्या आई-वडिलांशी तसेच सहकाऱ्यांशी व मार्गदर्शकाशी सतत सुसंवाद साधला पाहिजे, असे मत मांडले. घरामधील कौटुंबिक वातावरण हे मैत्रीपूर्ण ठेवण्याची ही सर्वांची जबाबदारी आहे. यामुळे समाजामध्ये बालकांच्या बाबतीत घडणाऱ्या गुन्ह्यांचं प्रमाण निश्चितपणे कमी होऊ शकतं असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. रत्नमाला पाटील व प्रा. गायकवाड जे. पी. यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे आभार ॲड. बापूसाहेब गलांडे यांनी मांडले.



### समुपदेशनाची गरज

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी चे खजिनदार जयकुमार शितोळे यांनी शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी तसेच शिक्षक आणि पालक यांना समुपदेशनाची असलेली गरज आपल्या मनोगतामधून व्यक्त केली. तसेच शिक्षण व्यवस्थेमध्ये असलेल्या प्रचलित कायदेविषयक तरतुदीमध्ये अधिकाधिक सुधारणा व्हाव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# जुना निमगाव रस्त्यासाठी शेतकऱ्यांची नोटरीवर संमती

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३ जानेवारी-**

जुना निमगाव रस्ता हा पुर्वीच्या गाव नकाशामध्ये आहे . हा रस्ता सध्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नॉन प्लॅनमध्ये आहे. नॉन प्लॅनमधील रस्त्यासाठी प्लॅनमध्ये घेण्यासाठी दर दहा वर्षानी सार्वजनिक बांधकाम विभागहकडून प्रस्ताव जिल्हास्तरावरून पुणे व सार्व. बांधकाम विभाग शासन स्तरावरून मंजुरी घेतली जाते. पण सध्या घ्याच रस्त्याची मंदिर परिसरातील वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी व वाहने पार्किंगचा जटील प्रश्न मिटविण्यासाठी महत्वाचा राजमार्ग आहे असे स्पष्ट दिसत आहे.

हा मार्ग पुढे चार पदरी मार्गाला मिळतो. जुना निमगाव रस्त्यासाठी शेतकऱ्यांनी नोटरीवर संमती सार्वजनिक बांधकाम विभाग सोलापूर यांचेकडे यापुर्वीच दिली आहे.

सध्या अक्कलकोट तीर्थक्षेत्राची वाहतुकीची महत्वाची समस्या निकड पाहता हा रस्ता फारच महत्वाचा बनला आहे. यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने हा रस्ता त्वरीत कायमस्वरूपी प्लॅनमध्ये घेण्यासाठी तातडीने हालचाली कराव्यात. यामुळे या परिसरातील शेतकऱ्याची समस्या तर सुटेलच शिवाय हा मार्ग वाहन तळ ते चार पदरी महामार्ग जोडण्याला पूरक ठरेल. अक्कलकोट तीर्थक्षेत्री मोठ्या प्रमाणात भाविकांची वर्दळ वाढल्याने अक्कलकोट-सोलापूर चारपदरी मार्ग झाला. भाविकांची संख्या, वाहनामुळे वाहनतळची समस्या होती, ही समस्या शासनाची कुठल्याही प्रकारची मदत न घेता श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने स्वखर्चाने वाहनतळ एसटी कर्मचाऱ्याना विश्रांती कक्ष उभे केले. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने वाहनतळ उभे केले नसते तर भाविकांच्या वाहनांची वाहन तळाची फार मोठी समस्या निर्माण झाली असती. मंदिर परिसरात रस्त्यावर वाहने पार्किंग केलेली आढळतात. जुना निमगाव मार्ग शेतकऱ्याची निकट असल्याने परिसरातील जमीनधारक शेतकरी उमेश शरणप्पा येळसंगी, सुरेश शरणप्पा येळसंगी, बापू सिद्राम बोदले, सिद्धराम विरुपाक्ष भुसनुरे, श्रीपाद दिंगबर पुजारी, घुंगरगावकर या शेतकऱ्यांनी रस्त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला संमती दिली आहे. यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याचा त्वरीत मार्गी लावण्याची मागणी होत आहे.



# कोंडबावीच्या उपसरपंचपदी मंजुषा रेडेकर

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील कोंडभावी ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदाची निवडणूक नुकतीच पार पडली यामध्ये मंजुषा मिलिंद रेडेकर यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची उपसरपंच म्हणून बिनविरोध निवड झाली आहे. कोंडबावी गावच्या उपसरपंच पदाची निवडणूक नुकतीच पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून विस्तार अधिकारी ए एम सरवदे यांनी काम पाहिले. या गावच्या विद्यमान सरपंच प्रियंका विजय शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या निवडणूक प्रक्रियेमध्ये उपसरपंच पदासाठी मंजुषा मिलिंद रेडेकर यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड घोषित करण्यात आली. याप्रसंगी ग्रामपंचायत अधिकारी श्रीमती बी के कारंजकर, मार्गदर्शक व ग्रामपंचायत सदस्य विष्णुपंत घाडगे, ग्रामपंचायत सदस्य दादा कृष्णा यादव, वर्षा अनिल माने, अंकुश संभाजी साठे आदी मान्यवरांसह ज्ञानदेव रेडेकर, नवनाथ माने, अनिल माने, सुजित रेडेकर,रमेश माने, लक्ष्मण यादव,आप्पा घाडगे, नामदेव रेडेकर, सुरेश माने, विष्णू मगर,मिलिंद रेडेकर, शिवाजी नामदास, सोमनाथ वाघमोडे, विजय रेडेकर आदी मान्यवर नागरिक उपस्थित होते. तसेच बीट हवालदार राऊत साहेब, पोलीस पाटील सचिन माने पाटील यांनी सदर निवड प्रक्रिया पार पाडावी म्हणून परिश्रम घेतले.

# पगार रखडल्याने हमाल बांधवावर उपासमारीची वेळ

## किमान संक्रांत तरी गोड करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३ जानेवारी-**

माळशिरस मधील धान्य वितरित करणाऱ्या गोडाऊन मधील हमालांना मागील सहा ते सात महिन्यापासून पगार मिळाला नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.ऐन सक्रातीच्या तोंडावर आमचा पगार द्या हो आम्ही कसा सण साजरा करायचा असा टाहो फोडण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

माळशिरस तालुक्यामध्ये रेशनचे धान्य वितरित करण्यासाठी माळशिरस मध्ये दोन तर नातेपुते मध्ये एक अशी तीन गोडाऊन आहेत. यामध्ये काम करणाऱ्या हमालांना जुलैपासून मानधन न मिळाल्यामुळे त्यांचे जीवन जगणे मुश्किल झाले आहे. मागील सहा सात महिन्यापासून पगार तर मिळालाच नाही याबरोबरच कोरोना काळातील देखील त्यांचे मानधन अद्यापही रखडलेले दिसत आहे त्यामुळे उपासमारची वेळ त्यांच्यावर आली आहे. तालुक्याला धान्य पुरवठा करणारे हे हमाल यांचे जीवन हे दररोजच्या कष्टावर अवलंबून असते मात्र प्रशासकीय पातळीवरील यंत्रणा इतकी ढीम आहे की,हे हमालांचे दु:ख जाणून घेण्यासाठी सुद्धा त्यांना वेळ नाही. संबंधित गोडाऊन कीपर यांनी सदरील प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठवले आहेत मात्र अद्यापही हमालांचे पगार मिळताना दिसत नाहीत त्यामुळे गेल्या सहा ते सात महिन्यापासून हे हमाल बांधव प्रयत्नांची पराकाष्टा करताना दिसत आहेत. संक्रातीचा सण तोंडावर आला आहे मात्र हा सण कसा साजरा करायचा असा प्रश्न या हमाल बांधवांना पडला आहे त्यामुळे तात्काळ वरिष्ठांनी याप्रकरणी लक्ष देऊन हमालांची संक्रांत गोड करावी अशी मागणी होत आहे.



# गाव तिथे भाजपाची शाखा करणार : संतोष बोबडे

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. ३ जानेवारी-**

तुळजापूर तालुक्यात भारतीय जनता पक्षाच्या,या नवीन वर्ष २०२५ मध्ये गाव तिथं शाखा निर्माण करणार व भारतीय जनता पक्षाचे विक्रमी सक्रिय सदस्य करणार असल्याची घोषणा तुळजापूर तालुका भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष संतोष दादा बोबडे यांनी केली आहे.

तुळजापूर शहरातील भा ज पा कार्यालयात सदस्य नोंदणी अभियानाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते पुढे बोलताना ते म्हणाले की भाजपाचा सामान्य कार्यकर्ता हा पक्षाचा खरा पाया असून, त्याच्या समर्पण व मेहनतीमुळे पक्ष आज या उंचीवर पोहोचला आहे. कार्यकर्त्यांच्या योगदानातूनच पक्षाचे ध्येय आणि उद्दिष्टे साकार होतात. येणाऱ्या सत्ताकाळात भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता सर्वार्थाने सक्षम होणार असून तुळजापूर तालुक्यात बूथ वाईज सदस्य नोंदणी येत्या ५ जानेवारी ते१५जानेवारी या कालावधीत,एक बूथ २०० सदस्य नोंदणी करण्यात येणार असून संपूर्ण तुळजापूर तालुक्यात ६० हजार सदस्यांची नोंदणी या कालावधीत पक्षाचे सर्व पदाधिकारी यांच्या सहकार्याने करण्यात येणार असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले,नव्या जुन्या कार्यकर्त्यांची सांगड घालून नव्या जोमाने गाव तिथे शाखा काढण्यात येतील असेही त्यांनी सांगितले.त्याचबरोबर तालुक्यातील विधानसभा निवडणुकीत लीड दिलेल्या गावांना आभार भेटी दौरा केला जाणार असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले.



महाराष्ट्रात भारतीय जनता पार्टीच्या महायुतीचे सरकार बहुमताने सत्तेवर आले आहे. कणखर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली, तसेच महसूल मंत्री व प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आ. राणादादा, जिल्हाध्यक्ष संताजी पाटील-चालुक्य यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना निश्चितच न्याय मिळेल. यावेळी दीपक आलूरे, वसंतराव वडगावे,आनंद कंदले,विक्रम देशमुख, आण्णा सरडे, प्रभाकर मुळे, विजय शिंगाडे, साहेबराव घुगे उपस्थित होते.




सोलापूर : पेठे उद्योग समुहाचे प्रमुख व दैनिक तरुण भारतचे संचालक अॅड. चैतन्य दिलीप पेठे यांच्या जन्मदिनी निसर्गमय शुभेच्छा देण्यात आल्या. त्यांचा विनायक दामोदर सावरकर-हिंदुत्व, नक्षत्र-देवता आणि वृक्ष हे पुस्तक तसेच कापडी पिशवी देऊन पर्यावरण संरक्षण गतिविधी जिल्हा संयोजक प्रविण आर. तळे यांनी सन्मान केला. यावेळी कोठारी एंटरप्रायझेसचे उद्योजक अजित कोठारी उपस्थित होते.

# पर्यावरण, स्वच्छता आणि कारवाई या त्रिसूत्रीवर काम

## राज्य उत्पादन शुल्कच्या अधिक्षक भाग्यश्री जाधव यांचा संकल्प

**तभा वृत्तसेवा, अमोल व्यवहारे**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी -**

राज्य उत्पादन शुल्क विभागाचं कार्यालय म्हंटलं की सर्वत्र कारवाई करून आणलेली हातभट्टी, त्याची वाहतूक करणारी वाहनं, दारूचा घमघमाट, बॅरेलचा मुद्देमाल असे चित्र. परंतु, याला अपवाद होत आहे सोलापुरातील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय ठरत आहे. महिला या ज्याप्रमाणे स्वतःचे घर कसं स्वच्छ, टापटीप ठेवत असतात तसाच अनुभव सध्या सोलापुरातील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालयात येऊ लागला आहे. अधिक्षक भाग्यश्री जाधव यांच्या पर्यावरण, स्वच्छता आणि कारवाई या त्रिसूत्रीवर आधारीत संकल्पावर राज्य उत्पादन शुल्क विभाग कार्यालयाचे रूप बदलू लागलेले आहे.

नविन वर्षातील संकल्पाबाबत राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिक्षिका भाग्यश्री जाधव यांच्याशी बातचित केल्यानंतर त्यांनी पर्यावरण, स्वच्छता आणि कारवाई या त्रिसूत्रीवर काम करण्याचा संकल्प व्यक्त केला. त्यांच्या संकल्पपूर्तीसाठी त्यांनी कामालादेखील सुरुवात केली असून कार्यालयातील वातावरण बदलत आहे. जाधव यांनी सोलापुरात रूजू झाल्यानंतर कार्यालयाच्या आवारात २१०० रोपांचे रोपन करून ती रोपे जगविली आहेत. आपण ज्याठिकाणी काम करतो, ते कार्यालय हे स्वतःचे घरच असते. त्यामुळे घर ज्याप्रमाणे स्वच्छ व टापटीप ठेवतो त्याप्रमाणे कार्यालय स्वच्छ ठेवण्यासाठी कर्मचाऱ्यांना कार्यालयातील फायलिंगचे व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन, आवार स्वच्छता या मूलभुत बाबींचे प्रशिक्षण देऊन त्यांच्याकडून ही कामे करून घेतली.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिक्षिका म्हणून सोलापुरात पहिल्यांदाच महिला अधिकारी आल्या आहेत. महिला म्हंटलं की स्वच्छता, टापटीपपणा हा उपजतच गुण आलेला असतो. त्याच गुणाचा वापर करून जाधव यांनी कार्यालयाच्या आवारात अस्ताव्यस्त पडलेला मुद्देमाल एकत्रित करून त्याचा लिलाव करून शासनाला गेल्या अनेक वर्षातील सर्वात जास्त महसुल मिळवून दिला.



जाधव यांनी पदभार घेतल्यानंतर सोलापुरात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागली. लोकसभेच्या ७८ दिवसाच्या आचारसंहितेमध्ये जितकी कारवाई करण्यात आली होती, तितकीच कारवाई त्यांनी विधानसभेच्या ३४ दिवसाच्या आचारसंहितेच्या कालावधीत करून दाखविली. त्यामुळे निवडणुक आयोगाच्या निरीक्षकांसह जिल्हाधिकाऱ्यांनीदेखील कामाबाबत समाधान व्यक्त करून राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविले.

रात्रीच्यावेळी प्रमाणे कार्यालयात अंधारात बसणेदेखील कर्मचाऱ्यांना नकोसे वाटत होते, तिथे आता १५ एलईडी दिवे लावून दोन हायमास्क दिवेदेखील मंजूर घेतले आहेत. कार्यालयाच्या सुरक्षिततेसाठी कार्यालयात सीसीटीव्ही लावून घेतले. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या शारीरीक सदृढतेसाठी लवकरच कार्यालयाच्या आवारात क्रिडा विभागाच्या मदतीने टेनिस कोर्ट व ओपन जीम तयार करण्यात येणार आहे. राज्याचे अर्थमंत्री अजित पवार हेच राज्य उत्पादन शुल्क विभागाचे मंत्री असल्यामुळे कार्यालयाच्या आवारात होत असलेल्या नविन इमारतीच्या बांधकामाच्या निधीसाठी पाठपुरावा करून ही इमारत पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचे जाधव यांनी सांगितले. गत आर्थिक वर्षात जिल्ह्याला दिलेले २५० कोटींच्या महसुलाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी हातभट्टी, ढाबे-हॉटेलमधील अवैध मद्य विक्रि, कारवाई सुरुच राहणार असून हे उद्दिष्ठ पूर्ण होऊन जादा महसुल शासनाला मिळवून देण्याचा संकल्प असल्याचेही जाधव यांनी सांगितले.

कार्यालयात १६० कर्मचारी असूनदेखील स्वच्छतागृह नव्हते. लवकरच कार्यालयाच्या आवारात १२ स्वच्छता गृह, रस्ता, गार्डनचे काम पूर्ण करणार असल्याचे सांगून रेकॉर्ड जपून ठेवणे हे गरजेचे असून त्यासाठी काम करणार असल्याचे जाधव यांनी सांगितले.

## संक्षिप्त वृत्त



### हरिभाई देवकरण महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

हरिभाई देवकरण महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी १९ व्या शतकातील भारतीय समाजात असलेल्या प्रतिकूल सामाजिक परिस्थितीत सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या कामावर प्रकाश टाकला. अमानुष रुढी-परंपरा, कर्मकांडाविरुद्ध ज्योतिबांचे मन पेटून उठले होते. ज्योतिबांच्या मनातील पेटत्या ज्योतिला प्रज्वलीत करण्याचे कार्य सावित्रीने केले व ती खऱ्या अर्थाने सामाजिक क्रांतीची प्रखर ज्योत झाली. शिक्षणाच्या प्रसारासाठी सामाजिक क्षेत्रांतही काम करणे व स्त्रियांचा आत्मविश्वास वाढवणे गरजेचे आहे हे सावित्रीबाईंनी ओळखले, असे सांगून प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी सावित्रीबाई फुले यांचे विचार आचरणात आणणे म्हणजे देश समर्थ बनविणे आहे असे संबोधले. यावेळी आदिती भोसले, सिद्धी गिरे या विद्यार्थिनीने मनोगत व्यक्त केले. यावेळी प्राचार्या दीपा फाटक यांनी प्रत्येकांनी एकमेकांना सन्मान देणे आवश्यक आहे. शिक्षण म्हणजे चांगले विचार घेणे असे आहे. प्रत्येक कृती करण्यापूर्वी विचार केल्यास आयुष्य यशस्वी होईल. देशाच्या विकासात प्रत्येकाचे योगदान महत्त्वाचे आहे असे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गाडेकर यांनी केले. यावेळी पर्यवेक्षक शांतप्पा कुंभार, बनसोडे बी. डी., कार्याध्यक्ष डॉ. दिलीप फुटाणे आदी उपस्थित होते.



### सुरवसे बालक मंदिरमध्ये महात्मा फुले आणि सावित्रीमाई यांच्या वेशभूषेत आले चिमुकले

**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

सुरवसे बालक मंदिर मध्ये सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. यावेळी शाळेत विद्यार्थिनी सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेत आल्या होत्या तर वीरेन गायकवाड या एकमेव विद्यार्थ्यांने महात्मा फुले यांची केलेली वेशभूषा आकर्षण ठरली. या कार्यक्रमासाठी शाळेच्या विश्वस्त राखी सुरवसे तसेच मुख्याध्यापिका शुभांगी लोखंडे यांची उपस्थिती लाभली.व शिक्षक शिक्षकेतर व कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती लाभली. रतन गोरे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मोठ्या गटातील दीपिका ख्याड सावित्रीबाई फुले व नर्सरीतील विरेन गायकवाडने ज्योतिबा फुले यांची वेशभूषा केली. तसेच मोठया गटातील आर्या माने या विद्यार्थ्यांनीने आम्ही सावित्रीच्या लेकी या विषयावर मनोगत व्यक्त केले.

### नव्या वर्षात चिकी चिकी बुबूम बुम चित्रपटाची धमाल ट्रीट

**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**



सगळीकडे नववर्षाच्या उत्साहाचे वातावरण असताना स्वप्नील जोशी, प्रार्थना बेहरे,प्राजक्ता माळी,प्रसाद महादेव खांडेकर,रोहित माने,प्रथमेश शिवलकर,वनिता खरात ही नामवंत कलाकार मंडळी चिकी चिकी बुबूम बुम म्हणत आपल्याला हसवायला सज्ज झाले आहेत.'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपट येत्या २८ फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज होणार आहे.नारकर फिल्म्स अँड एंटरटेनमेंट निर्मित,आयडियाज द एंटरटेनमेंट कंपनी प्रस्तुत आणि स्वर्ण पट कथा आणि प्रजाकार प्रोडक्शन्स यांच्या सहयोगाने येणाऱ्या 'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटाचे दिग्दर्शन प्रसाद महादेव खांडेकर यांचे आहे.चित्रपटाचे निर्माते सुनील नारकर असून,सहनिर्माते सेजल दिपक पेंटर आणि प्रसाद महादेव खांडेकर आहेत.चित्रपटाचे लेखन प्रथमेश शिवलकर,प्रसाद महादेव खांडेकर यांचे आहे.छायांकन गणेश उतेकर यांचे तर संगीत रोहन रोहन यांचे आहे.

# कवड्या जातीचे तीन साप सापडले

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी -**

सम्राट चौक येथील मंत्री चंडक कॉम्प्लेक्स येथे नववर्षादिनी तीन कवड्या जातीचे साप पकडले सम्राट चौक डॉक्टर आंबेडकर उद्यान शेजारील मंत्री चंडक कॉम्प्लेक्स येथे भीमराव लोखंडे यांच्या घरामध्ये कवड्या जातीचे तीन साप एका वेळेस निघाले.



या सापांना नॅचरल ब्ल्यू कोब्रा संस्थेचे सर्पमित्र दीपक इंगळे यांनी या सापांना पकडले या सापांना पाहून घरातील कुटुंबातील सर्वजण घाबरून पळत बाहेर आले. त्यावेळी इंगळे यांनी त्या सापांची पाहणी केली असता हे साप हे बिनविषारी कवड्या प्रजातीचे होते.

नॅचरल ब्ल्यू कोब्राचे सर्पमित्र इंगळे यांनी या तिन्ही सापांना पकडून निसर्गाच्या सानिध्यात सोडले आणि सापाबद्दल असणारी अंधश्रद्धा व गैरसमज याबाबत मार्गदर्शन केले सर्पमित्र इंगळे यांचे बरोबर विनोद इंगळे, गौतम नागटिळक, कमलाकर कांबळे, शांतीकुमार नागटिळक,शुभम इंगळे हे होते.

# इंटॅकच्या समन्वयकपदी प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर

**रविवारी तेजस्विनी आफळे यांचे व्याख्यान**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी -**

इंटॅक या राष्ट्रीय स्तरावरील ऐतिहासिक वारसा जागृती व जतन संवर्धनाचे काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेच्या सोलापूर विभागासाठी प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर यांची समन्वयक म्हणून नेमणूक झाली आहे.

त्यांचा पदग्रहण कार्यक्रम व त्यासोबत सुप्रसिद्ध ऐतिहासिक वारसा संवर्धक- आर्किटेक्ट तेजस्विनी आफळे यांचे, ''ऐतिहासिक वारसा जतन संवर्धन: एक नवा दृष्टिकोन'', या विषयावर व्याख्यान, रविवारी दि. ५ जानेवारी रोजी सायंकाळी सहा वाजता, शिवस्मारक सभागृह येथे होणार आहे.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रसिद्ध उद्योजक भूतपूर्व निर्लेप उद्योग समूहाचे अध्यक्ष मुकुंद भोगले (प्रदेश समन्वयक, इंटॅक महाराष्ट्र) असून प्रमुख अतिथी म्हणून इंटॅक महाराष्ट्र प्रदेश सह-समन्वयक डॉ. शर्वेय धोंगडे असणार आहेत. याप्रसंगी इंटॅक सोलापूर विभागाच्या संस्थापक समन्वयक डॉ.सीमंतिनी चाफळकर, सह समन्वयक आर्किटेक्ट श्वेता कोठावळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर गेले दहा वर्ष इंटॅक सोलापूर या विभागाचे कोअर कमिटी सदस्य म्हणून काम पाहत आहेत. समन्वयक सीमंतिनी चाफळकर यांनी पदमुक्त होण्याची इच्छा प्रदर्शित केल्यानंतर त्यांनी सोलापूर विभागाची जबाबदारी घेण्याची तयारी दर्शवली. त्याप्रमाणे डॉ काटीकर यांची इंटॅक, नवी दिल्ली च्या मुख्य कार्यालयाने सोलापूर विभागाच्या समन्वयकपदी नेमणूक केली.

इंटॅक सोलापूर विभागाच्या स्थापनेपासून म्हणजेच २०१२ ते २०२४ पर्यंत सोलापूर विभागाची जबाबदारी डॉ. सीमंतिनी चाफळकर यांनी सांभाळली. त्यांच्या कारकिर्दीत अनेक ऐतिहासिक वारसा भेटी, जतन-संवर्धन उपक्रम, स्पर्धा, दस्तऐवजीकरण नोंदणी, हेरीटेज समितीची स्थापना, वारसा वाचवण्यासाठी प्रसंगी आंदोलन अशा विविध माध्यमातून अनेक उपक्रम केले गेले. त्याच मालिकेत या पदग्रहण समारंभ प्रसंगी सोलापूरकरांमध्ये ऐतिहासिक वारसा या एकूणच संदर्भातली जागरूकता निर्माण होण्यासाठी ''ऐतिहासिक वारसा जतन संवर्धन : एक नवा दृष्टिकोन'' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानाच्या दरम्यान पंढरपूर व तुळजापूर येथील मंदिर कामासंदर्भातील काही अनुभव देखील व्याख्यात्या सांगणार आहेत.

तरी समस्त सोलापूरकरवासिय, इतिहास प्रेमी, विद्यार्थी, संशोधक, जागरूक नागरिक यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन इंटॅक सोलापूरच्या वतीने करण्यात येत आहे.




# एल्ग्रीस सोलरची नव्या वर्षासाठी ऑफर

## सोलर सिस्टीम बुक करा हिवाळ्यात, पैसे भरा पावसाळ्यात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी -**

एल्ग्रीस सोलरने नव्या वर्षासाठी ऑफर दिली आहे. हिवाळ्यात सोलर सिस्टीम बुक करा आणि पावसाळ्यात पैसे भरा. तसेच सोलर सिस्टममधून वीज निर्मिती चालू झाल्यावर ईएमआय चालु होणार आहे.

सौर ऊर्जा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणारी सोलापूरची एल्बीस सोलार पॉवर सिस्टीमस या क्षेत्रात भरीव योगदान देत असून एल्ग्रीस सोलारच्या दर्जेदार सिस्टिम्स आणि सर्व्हिसेसमुळे अनेक ग्राहकांचे लाईट बिल शून्यावर आले आहे. मागील १० वर्षांमध्ये १००० पेक्षा जास्त संतुष्ट ग्राहक असणारी सोलापुरातील एकमेव कंपनी बनली आहे. सौर ऊर्जा वापरण्याचा कल दिवसेंदिवस वाढत असून लोकांना सौर उर्जेचे दीर्घकाळ फायदे अनुभवास येत आहेत. सोलारमध्ये एकदा गुंतवणूक केली की, जवळपास ३० वर्षे आपल्याला वीज मोफत मिळत रहाते ही गोष्ट अद्भूत वाटावी अशीच आहे पण या प्रणालीचे फायदे जेवढे दीर्घकाळ मिळणारे आहेत त्या प्रमाणात सुरुवातीची गुंतवणूकही मोठी आहे असे अनेकांचे मत असते. यावर उपाय म्हणून एल्ग्रीस सोलरने नव्या वर्षात सोलर सिस्टीम बुक करा हिवाळ्यात, पैसे भरा पावसाळ्यात, अशी भन्नाट ऑफर काढली आहे.

या योजनेतंर्गत सोलर सिस्टम मधून वीज निर्मिती चालू झाल्यावर ईएमआय चालु होणार आहे. या योजनेत ग्राहकांना १००% फायनान्स उपलब्ध होणार असून व्याज दर होम लोन पेक्षाही कमी आहे. यासाठी ग्राहकांना केवळ आधार कार्ड, झछ कार्ड आणि इलेक्ट्रिसिटी बिलाची कॉपी लागेल. साधारण १-२ दिवसांत कर्ज मंजूर केले जातो. एकदा कर्ज मंजूर होऊन सोलर सिस्टम बसल्यावर या सोलर सिस्टममधुन जनरेट होणारी सोलार वीज ग्राहकाला सध्याच्या एमएसइबीच्या दरापेक्षा कितीतरी कमी दरात उपलब्ध होईल. गुंतवणुकीची परतफेड करण्याचा कलावधी २४ महिन्याचा असून साधारणपणे २५ ते २७ वर्षे मोफत वीज पुरवठा होऊ शकेल. तरी इच्छुक ग्राहकांनी एल्बीस सोलरशी (०२० ७१५३ ००२७) या नंबरवर संपर्क साधावा.




# राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नूतन आमदारांचा शनिवारी सत्कार

**महापालिका निवडणूक पूर्व आढावा बैठक होणार**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी -**

राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नूतन आमदारांचा सत्कार आणि महापालिका निवडणूक पूर्व नियोजन आढावा बैठक शनिवार दि. ४ जानेवारी २०२४ रोजी दुपारी ४.३० वाजता आय.एम.ए. हॉल डफरीन चौक, सोलापूर येथे आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती प्रदेश उपाध्यक्ष एड. यु. एन. बेरीया यांनी पत्रकार परिषदेत दिली.


माजी पालकमंत्री लक्ष्मणराव ढोबळे यांच्या हस्ते आणि पक्षाचे शहर अध्यक्ष सुधीर खरटमल यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे. माजी महापौर व प्रदेश पदाधिकाऱ्यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याप्रसंगी पक्षाचे उत्तमराव जानकर (माळशिरस), नारायण पाटील (करमाळा), अभिजीत पाटील (माढा), राजू खरे (मोहोळ) आदी नूतन आमदारांचा यावेळी सत्कार करण्यात येणार आहे.

यामुळे आगामी सोलापूर महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने पदाधिकारी कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक होणार आहे. या बैठकीत पक्षाच्या कार्यकर्त्यांना बूथ यंत्रणा नियोजन, निवडणुकीस सामोरे जाताना येणाऱ्या अडचणी, संभाव्य उमेदवारांची चाचणी या विषयांवर चर्चा व मार्गदर्शन करण्यात येणार आहे, असेही एड. बेरिया यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस माजी महापौर मनोहर सपाटे, एड. शंकर पाटील , भारत जाधव, सुनिता रोटे, प्रशांत बाबर, चंद्रकांत पवार, अक्षय जाधव , बिरप्पा बंडगर आदी उपस्थित होते.

भागवत उमामंदिर

हाऊसफुल्ल गर्दीत | हाऊसफुल्ल ५वा आठवडा
12.30 PM 09.45 PM | 03.00 PM 6.30 PM




Book The Ticket At BookMyShow
तिकीट बुक करण्यासाठी कॉल करा-9158142780

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.









## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### पूर्व वैमनस्यातून तरूणास धातूच्या कड्याने मारहाण

**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

पूर्व वैमनस्यातून तरूणास धातूच्या कड्याने मारहाण करणाऱ्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत बालाजी रमेश सज्जनकर (वय १९, रा. रामवाडी, पोगूल मळा, सोलापूर) यांने दिलेल्या फिर्यादीवरुन यश अनिल जाधव (वय १९, रा. रामवाडी, पोगूल मळा, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २ जानेवारी रोजी दुपारी जुनी मिल चाळीच्या कमानीसमोर यश जाधव याने बालाजी सज्जनकर यास मागील झालेल्या वादावादीच्या राग मनात धरून शिवीगाळ करून हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण केली तसेच हातातील धातूच्या कड्याने सज्जनकर याच्या डोक्यात मारून जखमी केले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस नाईक ढोबळे पुढील तपास करीत आहेत.

### बाणेकरी तालीम येथून ५० हजारांची दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

शहरातील बेगम पेठेतील बाणेकरी तालीम येथून चोरट्याने ५० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत महिबुब अब्दुल करीत शेख (वय ३५, रा. बडी बाणेकरी तालीम, बेगम पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ जानेवारी रोजी पहाटे महिबुब शेख यांनी त्यांची एमएच १३ ईएम ८८७२ क्रमांकाची दुचाकी ही घरासमोर हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जेलरोड पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिस हवालदार शेख पुढील तपास करीत आहेत.

### सुनिल नगरातून १० हजारांची दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

शहरातील सुनिल नगरातून चोरट्याने १० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत अनिल रघुनाथ बगले (वय ३६, रा. मल्लिकार्जुन नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० डिसेंबर रोजी अनिल बगले यांनी त्यांची एमएच १३ बीसी ३३६५ क्रमांकाची दुचाकी ही सुनिल नगरात हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद एमआयडीसी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिस हवालदार भांगे पुढील तपास करीत आहेत.

### विवाहितेच्या छळप्रकरणी पतीसह तिघांविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

विवाहितेच्या छळप्रकरणी पतीसह तिघांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत वैष्णवी पवन दरंदले (वय २१, रा. मराठा वस्ती, भवानी पेठ, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती पवन, सासू गिता, सासरे शरद (सर्व रा. रासकर महा, हिंदुस्थान बेकरी जवळ, श्रीरामपूर, जि. अहमदनगर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ नोव्हेंबर २०२३ ते १४ जानेवारी २०२४ या कालावधीत वैष्णवी या सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती पवन व इतरांनी वैष्णवी यांना घरातील किरकाळे कारणावरून वाद विवाद, भांडण तंटे करून शारीरीक व मानसिक त्रास देऊन हाताने मारहाण करून जाचहाट केला. तसेच अपमानास्पद वागणूक देऊन वैष्णवी यांना नांदवून घेण्यास नकार दिला. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक फौजदार ओव्हाळ पुढील तपास करीत आहेत.

### बुधले गल्लीतून ३० हजारांच्या दुचाकीची चोरी

**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

शहरातील पश्चिम मंगळवार पेठेतील बुधले गल्ली येथून चोरट्याने ३० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत हरशि भालचंद्र गारमपल्ली (वय ४७, रा. पश्चिम मंगळवार पेठ, बुधले गल्ली, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ जानेवारी रोजी हरिश गारमपल्ली यांनी त्यांची एमएच १३ बीएस ३४६९ क्रमांकाची दुचाकी ही घरासमोर हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिस हवालदार आरेनवरू पुढील तपास करीत आहेत.

# ‘उजनी’तून जिल्ह्याला ‘उन्हाळ्यात’ पाण्याचे नियोजन

### जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील

### 3 पाळ्या पाणी सिंचनासाठी देण्याचे नियोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

उजनी धरणात उपयुक्त पाणीसाठा ९६.९२% इतका उपलब्ध आहे. मागील वर्षी ६६ टक्के पाणी उपलब्ध होते. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी व नागरिकांना पिण्यासाठी संपूर्ण उन्हाळा पाणी उपलब्ध राहील यासाठी सूक्ष्म नियोजन करावे. धरणात पाणी उपलब्ध आहे म्हणून पाण्याची उधळपट्टी अजिबात करू नये. तसेच सोडलेल्या अवर्तनातून पाण्याची बचत करावी, असे आवाहन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.



नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित उजनी प्रकल्पाच्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत जलसंपदा मंत्री श्री. विखे पाटील मार्गदर्शन करत होते. यावेळी खासदार प्रणिती शिंदे, धैर्यशील मोहिते पाटील, आमदार सर्वश्री सुभाष देशमुख, देवेंद्र कोठे, समाधान आवताडे, राजू खरे, अभिजीत पाटील, नारायण पाटील, उत्तम जानकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जलसंपदा विभागाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, महापालिका आयुक्त शितल तेली उगले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, लाभ क्षेत्र विकास प्राधिकरणचे कार्यकारी अभियंता तथा कालवा सल्लागार समितीचे सचिव सु. सा. खांडेकर, अधीक्षक अभियंता धीरज साळी, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, उपजिल्हाधिकारी भूसंपादन संतोषकुमार देशमुख यांच्यासह जलसंपदा विभागाचे अन्य अधिकारी व कालवा सल्लागार समितीचे अशासकीय सदस्य उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे युवा कल्याण व क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार हर्षवर्धन पाटील, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी उपस्थित होते.

जलसंपदा मंत्री श्री. विखे पाटील पुढे म्हणाले, उजनी प्रकल्पाच्या पाण्याचे सर्व लोकप्रतिनिधी अधिकारी व शेतकरी, नागरिक यांच्या सहकार्यातून अत्यंत सूक्ष्म नियोजन करण्यात येणार आहे. सद्यस्थितीत जलसंपदा विभागामार्फत ४ जानेवारी, १ मार्च व १ एप्रिल अशा एकूण ३ पाळ्या पाणी सिंचनासाठी देण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. परंतु दिनांक ४ जानेवारी रोजी सिंचनासाठी पहिले आवर्तन उजनी धरणातून सोडल्यानंतर माहे फेब्रुवारी मध्ये उजनी प्रकल्पाच्या कालवा सल्लागार समितीची पुन्हा बैठक घेऊन उपलब्ध पाण्यातून जास्तीत जास्त पाणी देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. तसेच प्रत्येक आवर्तनामधून शेतकरी व नागरिकांनी पाण्याची बचत करावी, असेही आवाहन त्यांनी केले. उजनी प्रकल्पातून पाणी सोडल्यानंतर ते पाणी शेवटच्या टोकापर्यंत पोहोचावे यासाठी जलसंपदा विभागाने कालव्यामध्ये झालेली झाडेझुडपे काढून टाकावीत. कालव्याच्या कडेला झालेली अतिक्रमणे काढावीत. कालव्यातून प्रवाह व्यवस्थितपणे शेवटच्या टोकापर्यंत जाईल यासाठी कालव्याची दुरुस्तीची कामे वेळेत पूर्ण करून घ्यावीत. तसेच कालव्या वरील ब्रिजची दुरुस्ती करून घ्यावी. आवश्यक त्या ठिकाणी नवीन ब्रिज करावेत. यासाठी विभागाने विशेष मोहीम राबवावी. तर जलसंपदा विभागाने भीमा नदीवर ११ बॅरेजेस प्रस्तावित केलेले आहेत तसा प्रस्ताव शासनाकडे आलेला असून या बॅरिजेसचे महत्व लक्षात घेऊन यातील जास्तीत जास्त बॅरेजेस मंजूर करण्याचा आपला प्रयत्न असेल, असे त्यांनी सांगितले.

### लोकप्रतिनिधी मांडलेले विविध मुद्दे

✻ **खासदार :- प्रणिती शिंदे** : उजनी धरणातील शेतकऱ्यांना अजून पर्यंत मोबदला मिळाला नाही त्या अनुषंगाने स्वतंत्र बैठक घेण्याची मागणी केली तर खासदार धैर्यशील पाटील यांनीही शेतकऱ्यांना उजनी धरणातून पावसाळ्यापर्यंत पाणी मिळेल यासाठी योग्य नियोजन करण्याची मागणी केली.

✻ **आमदार :- समाधान आवताडे** : सोलापूर जिल्ह्याला या हंगामात पाण्याचे पाच आवर्तन सोडण्याची मागणी केली तसेच मागील दोन वर्षांपूर्वी पाण्याची पाच आवर्तने दिल्याबद्दल त्यांच्या अभिनंदन. यावर्षीही पाच आवर्तने द्यावे.

✻ **सुभाष देशमुख** :- उजनी प्रकल्पातून सोडण्यात येणारे पाणी शेवटच्या घटकापर्यंत पोहोचेल यासाठी विभागाच्या अधिकाऱ्यांनी काळजी घेण्या बरोबरच कालव्यातील झाडे झुडपे काढण्याची सूचना केली.

✻ **सचिन कल्याणशेट्टी** :- अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील एकरूख पाणीपुरवठा योजनेत पुरेसे पाणी उपलब्ध करून द्यावे.

✻ **नारायण पाटील** :- करमाळा तालुक्याला पुरेसे पाणी मिळावे तसेच उजनी प्रकल्पातून पावसाळ्यात वाहून जाणारे अतिरिक्त पाणी उचल म्हणून करमाळा तालुक्याला उपलब्ध करण्याच्या दृष्टीने विचार करावा असे सांगितले.

✻ **अभिजीत पाटील** :- सीना माढा सिंचन योजनेअंतर्गत माढा तालुक्यातील चार गावांना पाणीपुरवठा करावा यासाठी प्रकल्पातून फक्त ८०० मीटर पाईपलाईनची आवश्यकता असून ती पाईपलाईन टाकून द्यावी.

## 33 हजारांचा ऐवज जबरदस्तीने चोरणाऱ्यांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ जानेवारी -**

शहरातील गेंट्याल चौकात मारहाण करून ३३ हजारांचा ऐवज जबरदस्तीने चोरणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सिद्राम धोंडप्पा बरगुडे (वय ४९, रा. संतोष माळी यांच्या घरात भाड्याने, माळी नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चिट्या व वमश्या (दोघे रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




१ जानेवारी रोजी पहाटे एकच्या सुमारास सिद्राम बरगुडे हे घरी जाण्यासाठी गेंट्याल चौकातून जात होते. त्यावेळी पाठीमागून येणाऱ्या काळ्या रंगाच्या चारचाकी गाडीस बरगुडे यांनी हात केला असता ती काळ्या रंगाची चारचाकी गाडी थांबली. त्या गाडीत दोन युवक होते. ते एकमेकांना चिट्या व वमश्या असे हाक मारत होते. चिट्या नावाच्या इसमाने काळ्या रंगाची हुडी व टी शर्ट घातलेला होता. तर वमश्या याने लाल व निळ्या रंगाचा टी शर्ट घातला होता. त्या दोघांनी बरगुडे यांस मारहाण करून जबरदस्तीने त्यांच्याकडील रोख रक्कम, मोबाईल, मनगटी घड्याळ, अंगठी असा ऐवज तसेच फोन पे वरून ट्रान्झेक्शनद्वारे पैसे काढून घेतले. अशाप्रकार त्या दोघांनी ३३ हजार रुपयांचा ऐवज व ऑनलाईन पैसे जबरदस्तीने काढून घेतले. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक चंदनशिवे पुढील तपास करीत आहेत.

## मनोहर सपाटे, यू.एन.बेरीया यांनी निवडणूकीसाठी थोपटले दंड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

आगामी महानगरपालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आदेश दिला तर आपण निवडणूक लढवण्यास सज्ज आहोत असे सांगत माजी महापौर मनोहर सपाटे, यू.एन.बेरीया यांनी निवडणुकीसाठी पुन्हा दंड थोपटले आहे. सोलापुरात आज पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी आपली भूमिका मांडली.



एका प्रश्नाच्या उत्तरात ते म्हणाले,मी पक्षाचा आदेश पाळणारा कार्यकर्ता आहे. विधानसभा पक्षाच्या आदेशाने लढवली. आता ग्रामपंचायत असो मार्केट कमिटी असो किंवा महापालिका , पक्षाने आदेश दिला तर कोणतीही निवडणूक लढवण्यास कायम सज्ज आहे, असे सपाटे यांनी स्पष्ट केले.आपला पुतण्या ज्ञानेश्वर सपाटे भाजप जाणार अशी चर्चा आहे, असं आपणही ऐकले आहे. पण ज्ञानेश्वर असे काही करेल असे वाटत नाही असे सांगत मनोहर सपाटे म्हणाले, पक्षाचे अस्तित्व कोणाच्या जाण्याने संपणार नाही. राज्यात सर्वच पुतणे आता काकांचे विरोधात चालले. मी तरी अपवाद कसा असेल अशी पुष्टीही त्यांनी जोडली. ऍड.बेरिया म्हणाले, आम्ही नेते शरद पवारांचे पाईक आहोत. पक्षाने दिलेला आदेश पाळण्यास बांधील आहोत. आगामी महापालिका निवडणूक पक्षाने आदेश दिल्यास लढवणारच आहे, असे स्पष्ट केले. महापालिका निवडणुकीतील सर्व जागा स्वबळावर लढविण्याची आमची तयारी आहे मात्र पक्ष जो आदेश देईल, जे धोरण ठरवेल त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल, असेही यावेळी ॲड. बेरिया म्हणाले आहेत.

## पणती प्रज्वलित करून सावित्रीमाईंना अभिवादन

### पांढरे वस्ती शाळेतील उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

पांढरेवस्ती येथील महानगरपालिका मुलींची मराठी शाळा क्र ५ येथे सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त शाळेतील सर्व मुलींनी पणती प्रज्वलित करून अभिवादन केले. मुलींच्या शिक्षणासाठी महात्मा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांनी फार मोठे योगदान दिले आहे. त्यामुळे आज मुली व स्त्रिया सर्व क्षेत्रात आघाडीवर आहेत. सावित्रीबाई फुले यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरक व आदर्शवत आहे, असे प्रतिपादन मनपा पांढरेवस्ती शाळेचे मुख्याध्यापक अमोल भोसले यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक अमोल भोसले, किरण शेळगे, श्रीदेवी गौडगावे, अफरीन शेख यांची उपस्थिती होती.



# मानधन-कंत्राटी सेवकांच्या वेतनावर तब्बल ८ कोटींचा खर्च

### 302 पदे भरूनही महापालिकेला गरज मनुष्यबळाची

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जानेवारी-**

महापालिका मेगा भरतीत अत्यावश्यक ३०२ पदे भरली तरीही प्रशासनाला मानधन-कंत्राटी सेवकांची गरज भासत आहे. महापालिकेतील विविध पदांवरील मानधन-कंत्राटी सेवकांच्या वेतनावर वार्षिक ८ कोटींचा खर्च केला जातो. नगर अभियंता, पीएचई, संगणक आणि उद्यान विभागाकडे सर्वाधिक सेवक आहेत. विविध विभागांसाठी आवश्यकतेनुसार मागणीप्रमाणे मक्तेदारांकडून कंत्राटी कर्मचारी घेतले जातात.

सोलापूर महापालिका प्रशासनात आकृतीबंधातील अत्यावश्यक पदांची मेगा भरती प्रक्रिया करण्यात आली. लाड-पागे आणि अनुकंपा तत्वावरील पदे देखील प्रशासनाने भरली. शासनाने खर्चाची अट शिथिल केली असली तरी महापालिकेच्या प्रशासकीय खर्चाची आकडेवारी ४५ टक्क्यावर पोहोचली आहे. अशावेळी विविध संवर्गातील पदांवरील मानधन आणि कंत्राटी सेवकांच्या वेतनावर प्रशासन दरवर्षी सुमारे ८ कोटी रुपयांचा खर्च करीत आहे. महापालिकेतील रिक्त पदांची संख्या मोठी असली तरी प्रशासनातील उत्पन्नाच्या तुलनेत सेवकांवरील वेतनावर खर्चाची मर्यादा ओलांडत असल्याने प्रशासनाची डोकेदुखी झाली आहे. आकृतीबंधात महापालिका आस्थापनेसाठी ४ हजार ६१२ विविध संवर्गातील पदे मंजूर आहेत. त्यापैकी विविध संवर्गातील ११२५ जागा रिक्त होते. यावर कामगार संघटनांकडून मागणी होत असल्याने पदभरती प्रक्रियेसाठी हालचाली झाल्या. शासनाने देखील ३५ टक्के खर्चाची मर्यादा शिथिल केल्याने महापालिकेतील रिक्त पदांमधील अत्यावश्यक ३०२ पदे भरण्याची प्रक्रिया टीसीएसकडून राबवून ती भरण्यात आली मात्र त्यामधील नियुक्त अनेक पदांवरील कर्मचारी हे दुसऱ्या जिल्ह्यातील असल्याने हजरच झाली नाहीत. इतकेच नव्हे तर महापालिका प्रशासनाने यापूर्वी भरलेल्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करण्याबरोबरच लाड- पागे आणि अनुकंपा तत्त्वावरील सेवक सामावून घेतले आहे. महापालिका आस्थापना वरील विविध विभागात अद्यापही विविध संवर्गात हजारावर कर्मचारी पदांची गरज असल्याने प्रशासनाकडून मानधन सेवक आणि मक्तेदारांकडील सेवकांना दर सहा महिन्याला करार पद्धतीने घेण्यात येत आहेत अशा कर्मचाऱ्यांची संख्या सुमारे ६०९ इतकी आहे. महापालिकेच्या विविध ४० विभागांमधील मानधन आणि कंत्राटी सेवकांवरील वार्षिक खर्च हे ५ कोटी ४६ लाख ४४ हजार ५०५ रुपये आणि सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालयातील पाणी पुरवठा विभागातील मानधन- कंत्राटी सेवकांवरील वार्षिक खर्च २ कोटी ३७ लाख ४ हजार ३६७ रुपये असे एकुण खर्च ७ कोटी ८३ लाख ५० हजार इतका करण्यात येत आहे. आता सन २०२४-२५ मध्ये महानगरपालिकेच्या विविध विभागांसाठी आवश्यकतेनुसार मागणी प्रमाणे कुशल, अकुशल व अर्धकुशल अशा विविध विभागातील १९९ सेवक मनुष्यबळाचा सहा महिन्यासाठी पुरवठा करण्याबाबत २ कोटी ४६ लाख ३२ हजार ३४० रुपयांची निविदा काढण्यात आली. १३ जणांनी निविदा भरली असून प्रक्रिया सुरू आहे. सर्वात कमी दर असलेल्या मक्तेदाराला ६ महिने सेवक पुरवठा करण्याचा प्रस्ताव उपसमितीत मंजूर करण्यात आला आहे. यानंतर तसेच उर्वरित कर्मचाऱ्यांचाही टप्प्याटप्प्याने प्रस्ताव आणि मंजुरी घेण्यात येणार आहे.



**आकृतीबंधानुसार पदांचा तपशील व मनुष्यबळ मागणी पुढीलप्रमाणे**

| पदनाम | एकूण | भरलेली पदे | रिक्त पदे | मागणी पदे |
|---|---|---|---|---|
| इलेक्ट्रिशियन/वीजतंत्री | ९ | २ | ७ | ७ |
| संगणक हार्डवेअर | ३ | ० | ३ | ३ |
| वाहन चालक | १३४ | ६८ | ६६ | १६ |
| वायरमन | १० | ६ | ४ | ४ |
| सुरक्षारक्षक | २० | ४ | १६ | ३ |
| संगणक चालक | ५ | २ | ३ | ३ |
| पंप ऑपरेटर | ४१ | ७ | ३४ | ३० |
| रखवालदार | १८ | १३ | ५ | १ |
| मजूर | ५११ | ३९० | १२१ | १२१ |
| लॅम्प लाइटर | ३१ | १५ | १६ | ८ |
| विद्युत दाहिनी ऑपरेटर | ३ | ० | ३ | ३ |
| एकूण | ७८५ | ५०७ | २७८ | १९९ |

**मक्तेदारांकडील सेवकांची माहिती अशी विभागाचे नाव व संख्या या प्रमाणे** : सार्वजनिक आरोग्य अभियंता व विभागीय कार्यालय : ७ - ६५, नगर अभियंता व विभागीय कार्यालय : ३ - ४०, नगर अभियंता व विभागीय कार्यालय : ४ - ४०, उद्यान विभाग व विभागीय कार्यालय : १ - ३५, संगणक विभाग व विभागीय कार्यालय : २ - ३५, नगर अभियंता व विभागीय कार्यालय : ५ - ४०, नगर अभियंता व विभागीय कार्यालय : ६ - ४०, सार्वजनिक आरोग्य अभियंता व विभागीय कार्यालय : ८- ६४ असे एकूण - ३६७ आहेत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९९३

**घरीं रांडा पोरें मरती उपवासी ।**
**सांगे लोकांपासी थोरपण ।।**

घरात पोटभर अन्न नसतांनाही मिशीवर तांदळाचा दाणा ठेवून पंचपक्वान्न खाल्ल्याचे दाखविणाऱ्यांची संख्या समाजात कांही कमी नाही. अर्थात, स्वत: जवळ कांही नसतांनाही किंवा स्वत:कडे समस्यांचा डोंगर असतांनाही इतरांना मार्गदर्शन करुन मोठेपण मिळविण्याचा प्रयत्न करणारे लोक समाजात आहेत. स्वत:ची पात्रता, लायकी नसतांनाही आपण कांहीतरी आहोत किंवा इतरांपेक्षा कसे महत्वपूर्ण आहोत, हे दाखविण्याचा अनेक लोक प्रयत्न करीत असतात. घरात नाही दाणा आणि मला मोठे म्हणा, अशी वृत्ती लोक जोपासतात. यांचा मूर्खपणा कधी ना कधी समाजासमोर उघडा पडत असतो. मोठेपण हा मूळात असावा लागतो. मूळात मोठेपणाची पात्रताच नसेल तर खोटारडा मोठेपणा जास्त काळ साथ देत नाही. बायका-पोरे सांभाळण्याची पात्रता नसणाऱ्यांनी समाजात मोठेपण गाऊ नये. अगोदर आपले घर व्यवस्थित सांभाळावे आणि मग समाजाला मार्गदर्शन करण्यासाठी बाहेर पडावे. दिव्याखाली अंधार म्हणून घेण्याची वेळ येऊ देऊ नये. घरात बायका-पोरे, अन्न-अन्न म्हणून उपवाशी मरत असतांना बाहेरच्यांना खोटारडी श्रीमंती, मोठेपण सांगणे मूर्खपणाचे असते. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**घरीं रांडा पोरें मरती उपवासी । सांगे लोकांपासी थोरपण ।।**

मोठेपणाचा, पात्रतेचा आव आणून समाजाला फसविणारे अनेक लोक समाजात आहेत. हे खरे असले तरी आम्ही विठ्ठल भक्त आपल्या अनुभवातून समाजापुढे बोलत आहोत. आम्ही अनुभवाशिवाय समाजाला कांही सांगत नाही. त्यामुळे आपण संत, महात्म्यांच्या वचनावर विश्वास ठेवावा अशी अपेक्षाही महाराजांनी व्यक्त केली आहे. समाजात अनेक फसवे लोक असल्याने संत, महात्म्येही फसवेच असतील काय?असा शंकात्मक प्रश्नही मनात आणू नये. कारण संत, महात्म्यांना व्यवहाराशी, मोठेपणाशी कांहीच देणे-घेणे नसते. समाजाच्या कल्याणातच त्यांना सुख असते. त्यामुळे समाजाने फसव्या लोकांच्या तराजूत संत, महात्म्यांना तोलू नये. खोटारडा संतपणाचा बुरखा पांघरुन व्यवहार साधणारे कांही ढोंगी संत, महाराज आहेत. हे सत्य असले तरी खऱ्या संत, महात्म्यांकडे स्वप्नातही वेगळया दृष्टीकोनातून पाहू नये. घरातील लोकांना स्वभाव व पात्रता माहिती असल्याने अनेकांना कवडीचीही किंमत त्यांच्या घरात मिळत नाही. तरीपण असे लोक समाजात मोठ मोठया गप्पा मारुन अनेक भोळया-भाबडया लोकांना टोप्या घालण्यात यशस्वी होतात. अशा लोकांना आपण इतरांना फसविण्यात यशस्वी झालो असे वाटत असले तरी खऱ्या अर्थाने त्यांनी स्वत:चीच फसवणूक केलेली असते. इतरांना आयुष्यभर फसविता येत नाही. कधी ना कधी तरी सत्य बाहेर येत असते. तेव्हा आपली बदनामी, गळचेपी करुन घेण्यापेक्षा आजच सुधारलेले बरे. प्रथम स्वत:ला, कुटूंबाला सुधारावे आणि मग बाहेर सुधारण्याच प्रयत्न करावा. कुटूंब हा समाजाचा एक महत्वपूर्ण घटक असल्याने त्यांच्याकडे पाहणे, त्यांची काळजी घेणे ही अत्यंत महत्वपूर्ण बाब आहे, घरातल्यांना असमाधानी ठेवून बाहेरच्यांना समाधान देता येत नसते. असे चुकीचे वागत असणाऱ्यांनी हा फसवेपणा कधीतरी अंगलट येईल हे लक्षात ठेवावे.

**जय जय राम कृष्ण हरी।**


**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**



सोलापूर : पोलीस रायझिंग डे निमित्त पोलीस स्टेशनच्या वतीने बालभारती माध्यमिक प्रशाला यांच्या सहकार्याने पथसंचलन घेण्यात आले. याप्रसंगी वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद वाघमारे यांनी पोलीस रायझिंग डे याचे महत्त्व सांगितले. या पथ संचालनात एमआयडीसी पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्यासह शाळेतील शिक्षक, शिक्षकेतरी कर्मचारी व ३५० विद्यार्थी सहभागी झाले होते.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलक:- (६) वंदे मातरम

आता ही सर्व भावंडे महादेवाच्या संस्कारात मोठी होत होती. याचवेळी लोकमान्यांचा 'केसरी' शिवरामपंत परांजपे यांचा 'काळ' या अंकाचे घरोघरी वाचत होत असे. हे वाचन स्फुल्लिंग चेतवत असे. डॉक्टर बाळकृष्ण शिवराम मुंजे यांनी राष्ट्रीय वृत्तीच्या मित्रांचा एक संघ उभा केला. त्यात हा सोळा वर्षाचा केशव पण सहभागी झाला होता. त्यातच २९ सप्टेंबर १९०५ ला बंगालची फाळणी झाली. परंतु वंगभंग चळवळींनी साऱ्या देशातच वेग घेतला वंदेमातरम हा मंत्र सर्व देशात निनादू लागला. सर्वच प्रांतातल्या जनमानसात देशभक्ती जागृत होऊ लागली.

### अलक:- (७) चतु:सूत्री

१९०६ च्या डिसेंबर महिन्यात कलकत्त्याला काँग्रेसचे अधिवेशन पार पडले, लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेने १) स्वराज्यर) स्वदेशी ३) बहिष्कार ४) राष्ट्रीय शिक्षण ही प्रत्यक्ष क्रियात्मक चळवळीची चतु:सूत्री घेऊन लोक प्रांतोप्रांती परतले होते. नंतर लोकमान्य नागपूरला थांबले होते. तेव्हा केशव त्यांना भेटायला जात असे. केशव व त्यांच्या मित्रांच्या राष्ट्रीय भावना उद्दीपित करणारे लोकमान्यांचे विचार होते हे निश्चित. लोकनायक बापूजी अणे लिहितात वंदे मातरम् म्हणणे, शिवाजी उत्सवात, गणपती उत्सवात, रामदासनवमी उत्सवात भाग घेणे म्हणजे वाघाच्या जबड्यात हात घालणेच ठरत असे. आणि या सर्व उत्सवात सहभागी होणे, वंदे मातरम् म्हणणे केशवला मनापासून आवडत होतं.

**क्रमश:**

# प्रारूप शहर विकास आराखडा प्रसिद्ध

## एका महिन्याच्या आत नागरिकांनी सूचना व हरकती देण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ३ जानेवारी-**

स्मार्ट सिटी असलेल्या सोलापूर शहरात पुढील २० वर्षात विविध बाबींनी परिपूर्ण करून विकास साधण्यासाठी महापालिकेकडून तयार करण्यात आलेला प्रारूप शहर विकास आराखडा गुरुवार दि. २ जानेवारी रोजी प्रकाशित करण्यात आला आहे, अशी माहिती महापालिकेचे नगररचना विभाग उपसंचालक मनीष भिष्णुरकर यांनी दिली.

महापालिकेतील नगररचना बांधकाम विभाग नगर अभियंता कार्यालय व इतर कार्यालयांच्या अधिकारी कर्मचाऱ्यांमार्फत हा विकास आराखडा गेल्या सहा महिन्याच्या अथक परिश्रमातून तयार करण्यात आला. या प्रारूप विकास आराखड्याला गेल्या आठवड्यात महापालिका उपसमितीत प्रसिद्धीकरणासाठी मान्यता देण्यात आली होती. यानुसार गुरुवार दि. २ जानेवारी रोजी महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला तसेच हा प्रारूप विकास आराखडा महापालिकेच्या संबंधित विभागांकडे लावण्यात आला आहे. आराखडा पाहण्यासाठी नागरिकांची पुढे गर्दी होणार आहे.

या विकास आराखड्यात शहर हद्दवाढ भागाचा चौफेर विकास याबरोबरच शहरातील विविध भागांमध्ये क्रीडांगणे, उद्याने, विरंगुळा केंद्र, वाहनतळ, शहरातील पाणीपुरवठ्यासाठी पाण्याच्या टाक्यांचे नियोजन आणि इतर अनेक विकासाचे मुद्दे शिवाय नागरिकांना अपेक्षित इतर बाबींचा समावेश आहे.

हा प्रारूप आराखडा प्रसिद्ध करण्यात आल्यानंतर संपूर्ण जानेवारी महिन्यात शहरातील नागरिकांकडून या संदर्भातील हरकती आक्षेप आणि विविध सूचना मागविण्यात आले आहेत. फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आलेल्या हरकती आणि आक्षेप यावर तयार करण्यात आलेल्या समितीच्या माध्यमातून सुनावणी होणार आहे. यानंतर आवश्यक काही बदलांसह शहर विकास आराखडा तयार करून तो शासनाकडे मान्यतेसाठी पाठविला जाणार असल्याचेही नगररचना विभागाचे उपसंचालक मनीष भिष्णुरकर यांनी सांगितले.

### हरकती आणि सूचना यावर होणार सुनावणी

सोलापूर शहर विकास आराखडाचे गॅझेट प्रसिद्धीनंतर एका महिन्याच्या आत शहरातील नागरिकांना त्यावर हरकती व सूचना द्यायच्या आहेत. गॅजेट प्रसिद्ध झाल्यानंतर आराखडा महापालिका आयुक्त कार्यालय, नगर रचना कार्यालय तसेच वेबसाईटवरही पाहता येणार आहे. त्याचे नकाशे हवे असतील तर शासन नियमानुसार विहित शुल्क भरून नागरिकांना त्याच्या प्रती कार्यालयात मिळू शकणार आहेत. हरकती , सूचना सोलापूर महापालिकेच्या उपसंचालक नगर रचना कार्यालयाकडे सादर कराव्या लागणार आहेत. त्या हरकती व सूचनांवर नियोजन समितीकडून सुनावणी घेण्यात येणार आहे.



## हुतात्मा वीर विठ्ठलराव कोतवाल यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ३ जानेवारी-**

हुतात्मा वीर विठ्ठलराव कोतवाल यांची ८२ वी पुण्यतिथी सोलापूरमध्ये साजरी करण्यात आली. महानगरपालिकेतील महापौर कक्षामध्ये सर्व समाज बांधव एकत्र येऊन फोटो पूजन करण्यात आले. तसेच डी मार्ट समोरील जो रस्ता आहे डी मार्ट ते विजापूर रोड या रस्त्याला हुतात्मा भाई विठ्ठलराव कोतवाल यांचे नाव आहे आणि त्या नावाचे फलक तिथे भारती विद्यापीठ, डी मार्ट, आणि विजापूर रोड या ठिकाणी लावलेले आहेत त्याचे पूजन आज करण्यात आले , याप्रसंगी वीर कोतवाल शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पांडुरंग चौधरी सर वीर कोतवाल संस्थेचे माजी अध्यक्ष प्राध्यापक ज्ञानेश्वर काळे अध्यक्ष गणेश दळवी उपाध्यक्ष मल्लिनाथ चौधरी सचिव सिद्धेश्वर आगाशे ज्येष्ठ सदस्य भीमराव गंगधरे ,किशोर शेटे , सिद्राम रुद्रार ,पांडुरंग पवार, संजय जोगी पेठकर, भारत भाऊ शिंदे ,भारत भाऊ क्षीरसागर ,संतोष धोत्रे, श्रीराम वाघमारे सुनील इंगळे इत्यादी समाजबांधव उपस्थित होते.

## कैद्यांनी आत्मनिर्भर होवून उद्योजकतेकडे वळावे

**बँक ऑफ इंडिया व्यवस्थापक चंद्रशेखर मंत्री**

**जिल्हा कारागृहात आरसेटीमार्फत कैद्यांसाठीचे विशेष प्रशिक्षण**

**३५ कैद्यांनी सहभाग नोंदवून प्रशिक्षण केले पूर्ण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ३ जानेवारी-**

सोलापूर जिल्हा कारागृह आणि बँक ऑफ इंडिया स्टार स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (आरसेटी) यांच्या संयुक्त विद्यमाने कैद्यांच्या समाजात पुनर्वसनासाठी दि. २६ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत सहा दिवसांचे मोफत उद्योजकता विकास प्रशिक्षण अंतर्गत दुग्ध व्यवसाय व गांडूळ खत निर्मिती प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. यावेळी बँक ऑफ इंडियाचे झोनल मॅनेजर चंद्रशेखर मंत्री यांनी कैद्यांना आत्मनिर्भरतेकडे वळण्यासाठी प्रेरित केले

जिल्हा अग्रणी बँक प्रमुख राम वाखरडे यांनी प्रशिक्षणार्थींना आरसेटीद्वारे व्यवसाय उभारणीसाठी आवश्यक बँक कर्ज शिफारस करण्याचे आश्वासन दिले. तर ३५ कैद्यांनी सहभाग दर्शवून उद्योजकतेचे प्रशिक्षण पूर्ण केले. जिल्हा कारागृह अधीक्षक परदेशी यांनी सर्व प्रशिक्षणार्थींचे अभिनंदन केले. यावेळी कारागृह अधिकारी बाबर यांनी या प्रशिक्षणामुळे मिळालेल्या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले. या प्रशिक्षणात ३५ कैद्यांनी सहभाग नोंदवून प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले आहे. सदर उपक्रम कैद्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी एक सकारात्मक परिवर्तन घडवणारा ठरणार आहे. हा परिवर्तनवादी उपक्रम मंत्री यांच्या पाठिंब्यामुळे शक्य झाला असल्याचे आरसेटी संचालक दिपक वाडेवाले यांनी सांगितले. या समारोप समारंभास बँक ऑफ इंडियाचे झोनल मॅनेजर चंद्रशेखर मंत्री, जिल्हा अग्रणी बँक प्रमुख राम वाखरडे, प्रभारी जिल्हा कारागृह अधीक्षक परदेशी, कारागृह अधिकारी प्रदीप बाबर, आरसेटी संचालक दीपक वाडेवाले, डॉ. सत्यजित पाटील आणि आरसेटी प्रशिक्षक शिवानंद तडवळकर उपस्थित होते. प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी सोलापूर जिल्हा कारागृह प्रशासन व अधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. आभार शिवानंद तडवळकर यांनी मानले.

## 'वाचन संकल्प महाराष्ट्रा'चा उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील महाविद्यालयांचा उस्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ३ जानेवारी-**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचे औचित्य साधुन आणि राज्यातील वाचन संस्कृती वृध्दिंगत करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि.०१ जानेवारी २०२५ ते दि.१५ जानेवारी २०२५ या कालावधीत वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा अनोखा उपक्रम राबविणेसाठी दि.२० डिसेंबर २०२४ रोजी शासन परिपत्रक जारी केले आहे. त्यास सोलापूर जिल्ह्यातील महाविद्यालयांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

नवीन वर्षाची सुरवात समाजातील सर्व घटकांतील तसेच नागरिकांनी आपल्या आवडीचे पुस्तकाचे वाचन करुन करावी, असे आवाहन मंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य चंद्रकांत दादा पाटील यांनी केले आहे.

१ जानेवारी रोजी राज्यातील ६ हजारावर महाविद्यालयांनी या उपक्रमात सहभाग घेतला असून, या उपक्रमाच्या सुरुवातीला सर्व महाविद्यालयांनी त्यांच्या सभागृहामध्ये ग्रंथालयामध्ये सामुहिकरीत्या पुस्तकाचे वाचन सुरु केले आहे. यानिमित्ताने राज्यातील जवळजवळ ४५ लाखाच्या वर विद्यार्थ्यांच्या हातात विविध प्रकाराची पुस्तके दिसून आलेत. येत्या १५ दिवसांत सदर पुस्तक वाचन पूर्ण करण्याचा संकल्प या निमित्ताने प्रत्येक विद्यार्थ्यांने केला आहे. तसेच येत्या पंधरवडयात राज्यातील प्रत्येक महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य वाढावे यासाठी वाचन कौशल्य कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. स्थानिक लेखकांना महाविद्यालयात निमंत्रित करुन विद्यार्थी - वाचक व लेखक या परिसंवादाचे आयोजन करण्यात येणार आहे. वाचन पंधरवडा निमित्ताने महाविद्यालयांमध्ये पुस्तक परिक्षण स्पर्धा आणि पुस्तक कथन स्पर्धा आयोजित करण्यात आले आहे. पहिल्याच दिवशी वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमास सोलापूर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभागी करुन घेतले व वाचन संस्कृतीचे जतन करण्यासाठी त्यांना त्यांच्या आवडीच्या पुस्तकांची निवड करुन पुस्तकासंबंधीचे अभिप्राय १५ दिवसांच्या आत महाविद्यालयास सादर करण्यासंबधी सुचित केले आहे. त्यास महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे असा प्रतिसाद दिल्याचे दिसून येत आहे.




## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - |
| दि. ४ जानेवारी २०२५ | सांबस्वामी सलगर महाराज |
| विक्रम संवत् २०८०-८१ | पुण्यतिथी |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - पौष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. पंचमी - (१०.००) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - शिशीर | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - शततारका (०९.२२) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सिध्दी (१०.०७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (१०.५१) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा,

**वृषभ :** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता. वाचनाची गोडी वाढेल.

**कर्क:** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील.

**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता.

**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील.

**तुळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा.

**वृश्चिक :** मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. काम काजाचा विस्तार होईल.

**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा.

**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल. नियंत्रण ठेवा.

# आर्यनंदी आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर

## सोलापुरात ११ जानेवारी रोजी होणार वितरण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ३ जानेवारी-**

आर्यनंदी परिवार संचलित आर्यनंदी नागरी सहकारी पतसंस्था व आर्यनंदी एज्युकेशन अॅन्ड रिसर्च फौंडेशन, सोलापूरतर्फे देण्यात येणारा आर्यनंदी आदर्श पत्रकार पुरस्कार वितरण सोहळा शनिवार दि. ११ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता शिवस्मारक सभागृह, नवी पेठ, सोलापूर येथे आयोजित करण्यात आला आहे , अशी माहिती आर्यनंदी परिवाराचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजेश फडकुले यांनी दिली आहे.

प. पू. १०८ आचार्य आर्यनंदी महाराजांच्या विचारातून आणि कार्यातून प्रेरणा घेऊन त्यांच्या शुभाशिर्वादाने स्थापन झालेला ''आर्यनंदी परिवार'' सर्वांचे सहकार्य व विश्वासाच्या बळावर यशस्वीरित्या रौप्यमहोत्सव साजरा करीत आहे. सामाजिक बांधिलकीच्या नात्याने सुरु केलेल्या आर्यनंदी नागरी सहकारी पतसंस्था, आर्यनंदी एज्युकेशन अॅन्ड रिसर्च फौडेशनतर्फे. आर्यनदी नागरी सहकारी पतसंस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्ष आणि पत्रकार दिनानिमित्त 'आर्यनंदी आदर्श पत्रकार पुरस्काराने उल्लेखनीय कार्य केलेल्या पत्रकारांचा सन्मान करण्यात येणार आहे.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवि पवार याच्या अध्यक्षतेखाली हा पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आर्यनंदी परिवाराचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजेश फडकुले, जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष दिलीप पतंगे, भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, दैनिक तरूण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, महापालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास बहुसख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन संस्थेचे सस्थापक अध्यक्ष डॉ. राजेश फडकुले यांनी केले आहे.

### हे आहेत पुरस्काराचे मानकरी

संजय जाधव, संतोष चितापुरे, रामेश्वर विभुते, काशिनाथ वाघमारे, विजय थोरात, संतोष अचलारे, तर 'आर्यनंदी आदर्श पत्रकारिता विशेष गौरव पुरस्काराने चंद्रकांत मिराखोर व सादिक इनामदार यांना गौरविण्यात येणार आहे. सन्मानचिन्ह, शाल, पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## चारित्र्याच्या संशयावरून विवाहितेचा छळ करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ३ जानेवारी-**

चारित्र्याच्या संशयावरून विवाहितेचा छळ करणाऱ्या चौघांविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत जरिना मैनोद्दीन शेख (वय ४२, रा. शशिकला नगर, शांती नगर, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती मैनोद्दीन शेख, सासू नशिमा, दीर अब्दुल रजाक, अझरोद्दीन अ. रजाक शेख (सर्व रा. शांती नगर रोड, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जरीना शेख यांच्या लग्नाच्या दोन वर्षानंतर त्या सासरी नांदत असताना पती मैनोद्दीन व इतरांनी घर बांधकाम करण्यासाठी आई वडीलांनी दिलेले सोन्याचे दागिने मोडून पैसे घेतले व नंतर विविध बचत गट फायनान्सकडून पैसे घेऊन शिवीगाळ करून मारहाण केली. तसेच चारित्र्यावर संशय घेऊन समाजामध्ये तिची बदनामी करून नवऱ्यास दुसरी पत्नी करून देतो असे म्हणून जरीना व तिच्या मुलांना शिवीगाळ करून मारहाण करून शारीरीक व मानसिक छळ करून नांदविण्यास नकार देऊन घरातून हाकलून दिले. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार मस्के पुढील तपास करीत आहेत.

## संक्षिप्त वृत्त



### श्री हनुमान सार्वजनिक वाचनालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**सांगोला, दि. ३ जानेवारी-**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती वासुद (ता.सांगोला) येथील श्री हनुमान सार्वजनिक वाचनालयात उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी हनमंत रासकर, सतिश गेजगे व उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच अशोक गायकवाड यांनी पुर्वीचे आणि चालू शिक्षण यातील फरक स्पष्ट कथन करून शिक्षण हेच महत्त्वाचेच आहे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सतिश गेजगे यांनीही शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगितले. याप्रसंगी हनुमान विद्यालय, वासुदचे शिक्षक आण्णासाहेब काशिद, किरण पोरे, अशोकराव व्हटे, संगिता मोरे, पवार, संजय कोळी, अजय केदार, विद्यार्थी, ग्रामस्थ, वाचनालयाचे अनिकेत शिंदे, दिपक केदार, संतोष मोरे, सारिका केदार उपस्थित होते.



### श्री वर्धमान जैन सार्वजनिक वाचनालयात सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

**बार्शी, दि. ३ जानेवारी-**

येथील श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालय, बार्शी येथे दि.३ जानेवारी रोजी क्रांती ज्योती स्त्री शिक्षणाची सुरुवात करणा-या सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महिला मुक्ती दिन साजरा करण्यात आला. वाचनालयाचे ऑ. सेक्रेटरी आनंद पुनमिया, संचालक धिरज कुंकूलोळ, प्रमोद भंडारी यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी वाचनालयाचे सभासद व वाचक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार वाचनालयाचे संचालक धिरज कुंकूलोळ यांनी केले. ग्रंथपाल सुरेश यादव, सहा. ग्रंथपाल पल्लवी तौर, क्लार्क विराज पतंगे, सेवक रेखा यादव हे उपस्थित होते व यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



### पाठक वस्ती येथील जि. प. प्राथमिक शाळेत किशोरी हितगुज मेळावा

**नातेपुते, दि. ३ जानेवारी-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पाठकवस्ती, मांडवे येथे सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त किशोरी हितगुज मेळावा संपन्न झाला. या कार्यक्रमात मुलींच्या जाणिवा प्रगल्भ व्हाव्यात, या उद्देशातून अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी महात्माजी व सावित्रीबाईंच्या वेशात उपस्थित होते .या निमित्त चित्रकला, रांगोळी, लिंबू चमचा या आनंदात्मक खेळांच्या स्पर्धा पार पडल्या. याप्रसंगी अरुण कुंभार यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. शितल जाधव-पवार यांनी मुलींना आरोग्य संपन्न बनण्यासाठी माहिती सांगितली. बाबुराव निकम यांनी विद्यार्थिनींना आहाराविषयी संबोधित केले. प्रास्ताविक मुख्याध्यापिका सोफिया शेख यांनी केले, तर आभार संजय उगले यांनी मानले. या समारंभासाठी रूपाली अभिजीत जगताप, स्वाती मंगेश जगताप, रेणुका ढोबळे, वर्षा जगदाळे उपस्थित होत्या.



### वखारिया विद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिवस म्हणून साजरी

**बार्शी, दि. ३ जानेवारी-**

तालुक्यातील उपळे दुमाला येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित वखारिया विद्यालयात क्रांती ज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती ३ जानेवारी रोजी 'बालिका दिवस ' म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक श्री. दयानंद रेवडकर सर यांच्या उपस्थितीत सहशिक्षिका श्रीमती रोहिणी डोईफोडे-बुरगुटे, शालेय पोषण आहार बनविणाऱ्या आजी वैजंयंता बाकले यांच्या हस्ते सावित्रीमाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यालयातील मुलींनी सावित्रीच्या लेकींनी सावित्रीमाईची वेषभूषा केली होती. याप्रसंगी सावित्रीमाईविषयी स्तुती गीताचे गायन करण्यात आले. मी सावित्रीमाई ही एकांकिका उपस्थित विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली. मुलींसाठी लिंबू-चमचा, संगीत खुर्ची स्पर्धा घेण्यात आली. सूत्रसंचालन सहशिक्षक एन. एन. महाले यांनी केले. यावेळी शंकर शिंदे, सेवक सुरवसे उपस्थित होते.

# उजनी उजव्या कालव्यात उद्यापासून सुटणार पाणी

## आ. समाधान आवताडे : उजनी कालवा सल्लागार समितीची जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ जानेवारी-**

उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरलेले असल्याने जादा पाणी नदीद्वारे व कालव्याद्वारे सोडण्यात येत आहे. हे पाणी मंगळवेढा तालुक्यातील गावांना उपसा सिंचन योजनेच्या लाभक्षेत्रातील मंगळवेढा तालुक्यातील गावांना सोडण्याची मागणी पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी केली असता उद्यापासून हे पाणी सोडण्याचे निर्देश राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले आहेत.



याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उजनी प्रकल्पाच्या सल्लागार समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती त्याप्रसंगी त्यांनी हे निर्देश दिले आहेत. तसेच कालवा सल्लागार समितीची पुढची बैठक येत्या फेब्रुवारी महिन्यात घेऊन आता दिलेल्या निर्देशांची कशा पद्धतीने कार्यवाही झाली आहे याचा त्या बैठकीत आढावा घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या बैठकीमध्ये आ आवताडे यांनी गतवर्षी पाच पाण्याच्या पाळ्या मिळाल्याने सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न बहुतांशी नियंत्रणात राहिला होता त्याबद्दल त्यांनी प्रशासनाचे आणि संबंधित विभागाचे अभिनंदन केले. आतापर्यंत सदर बैठका या पुणे, मुंबई येथे घेतल्या जात होत्या परंतु चालू वर्षाची कालवा सल्लागार समितीची बैठक सोलापूर जिल्ह्यामध्येच होत असल्याबद्दल आ आवताडे यांनी मंत्री विखे-पाटील यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला.

या बैठकीमध्ये तालुक्याच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या मागण्या मांडत असताना आमदार समाधान आवताडे यांनी सांगितले की, मंगळवेढा तालुक्यातील टेलच्या भागातील शेतकऱ्यांना पुरेसे पाणी अद्याप पर्यंत मिळत नाही ते मिळावे अशी त्यांनी मागणी केली. शिवाय कॅनॉल ची निर्मिती होऊन २५ वर्ष झाली कॅनॉल टेलच्या भागातील कॅनॉल ची कामेपूर्वी निकृष्ट झाल्याने अजून शेतकऱ्यांना पुरेशा दाबाने पाणी मिळत नाही. सदर कामाची व्यवस्थित डागडुजी करून आवश्यक दाबाने शेतकऱ्यांना पाणी मिळण्याची ही त्यांनी मागणी केली. तालुक्यातील मरवडे, बोराळे डोणज, नंदुर, कर्जाळ, कात्राळ हुलजंती, ढवळस, मुढवी, धर्मगाव, मंगळवेढा साखर कारखाना रोड या भागातील बहुतांश शेतकऱ्यांना आजही पाण्यासाठी झगडावे लागत आहे. त्यामुळे त्यांना पाणी मिळणे गरजेचे आहे. भीमा नदीवरील को. प. बंधाऱ्यावरील खराब झालेले दरवाजे दुरुस्तीबाबत काही नियोजन झाले आहे? असा आ. आवताडे यांनी सवाल उपस्थित केला.

यावेळी खा. धैर्यशील मोहिते पाटील, खा प्रणिती शिंदे, माजी मंत्री आमदार सुभाष देशमुख, आमदार नारायण पाटील, आमदार राजू खरे, आमदार अभिजीत पाटील, आमदार उत्तम जानकर, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जलसंपदा विभागाचे कपोले, खांडेकर, जलसंपदा अधीक्षक अभियंता धीरज साळे, धनश्री परिवाराचे संस्थापक प्रा.शिवाजीराव काळुंगे, जकराया शुगरचे चेअरमन बिराप्पा जाधव, भारत पवार, जिल्हा लेबर फेडरेशन माजी संचालक सरोज काझी, राजन पाटील, विक्रांत पंडित तसेच संबंधित विभागाच्या विविध खात्याचे अधिकारी पदाधिकारी उपस्थित होते.

### दरवाजांची दुरुस्ती करावी

संबंधित खराब झालेल्या दरवाजांपैकी जे दरवाजे जिल्ह्यातील साखर कारखान्याच्या परिसरात असतील त्या निडलची त्या-त्या संबंधित कारखान्यांनी दुरुस्ती आणि वापर योग्य करावेत असे मंत्री विखे-पाटील यांनी सांगितले असता सर्वांनी त्यास सहमती दर्शवली आहे.

# मुलींनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी

## डॉ. स्नेहा रोंगे : पंढरपुरात सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त कर्तबगार महिलांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ जानेवारी-**

सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे सोलापूर जिल्हा परिषद यांचे मार्गदर्शनाखाली आयोजित पंढरपूर तालुका स्तरीय किशोरी हितगुज मेळावा अजनसोंड येथील शांता प्रभू प्रशालेत मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन शिक्षणाधिकारी सुलभा वठारे, शिक्षणाधिकारी मारुती लिगाडे, छोटी अध्यक्षा सावित्री मुंढेवाडी शाळेची विद्यार्थिनी समीक्षा मोरे ,प्रमुख पाहुणी म्हणून रांझणी शाळेची स्वरा दांडगे तसेच शांता प्रभू शैक्षणिक व सामाजिक संस्था अजनसोंड सचिव हरिदादा घाडगे, सरपंच ज्योती ताई घाडगे, मुख्याध्यापक विक्रांत सर्वगोड, पोलीस पाटील मेघना घाडगे.सामाजिक कार्यकर्त्या रेखा चंद्रराव, डॉ. स्नेहा रोंगे, केंद्रप्रमुख मारुती काळुंगे , स्वाती डोंगरे, शारदा रासकर, यांचेसह सर्व केंद्रप्रमुख यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

प्रास्ताविक ात गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे साहेब यांनी किशोरी हितगुज मेळाव्याची संकल्पना सांगितली.याचवेळी पंढरपूर तालुक्यातील आलेल्या सर्व किशोरींना सकाळी आशा क्षीरसागर यांनी योगा आणि त्याचे महत्त्व सांगितले. स्वरपंढरीचे ज्ञानेश्वर दुधाणे आणि डॉ. प्रसाद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्वरपंढरी गीतमंच्याच्या वतीने समूहगीत सादर करत विद्यार्थ्यांनींना मंत्रमुग्ध केले.

डॉ स्नेहा रोंगे आणि रेखा चंद्रराव यांनी किशोर वयात आपलं आरोग्य सांभाळण्यासाठी महत्वाचे असून वयात आलेल्या किशोरीना आपलं आरोग्य आपण कसं संभाळायचे. दररोज व्यायाम प्राणायाम ध्यानधारणा करणे का आवश्यक आहे तसेच आपल्या आहाराकडे लक्ष देणं महत्त्वाचं आहे.रक्ताचे प्रमाण कसं वाढलं पाहिजे यासाठी महत्वपूर्ण माहिती दिली सांगितली. सूत्रसंचलन शहाजी देशमुख यांनी करत आभार तानाजी नाईकनवरे यांनी मानले. यावेळी पंढरपूर तालुक्यातील विविध शाळेमधील किशोरी आणि शिक्षक शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. मेळावा यशस्वी करण्यासाठी शांता प्रभू प्रशाला केंद्रप्रमुख मारुती काळुंगे चळे आणि तुंगत केंद्रातील शिक्षक शिक्षिका यांचे अनमोल योगदान लाभले.

### नवभारत साक्षरता उल्हास मेळावा

या कार्यक्रमाला जोडून नवभारत साक्षरता उल्हास मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यानंतर किशोरींच्या सुप्त गुणांना वाव मिळण्यासाठी विविध प्रकारच्या स्पर्धेचे त्यामध्ये रांगोळी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, चमचा लिंबू स्पर्धा याचे आयोजनही करण्यात आले होते.

# कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय क्रिकेट संघाचा दणदणीत विजय

## सोलापुरातील अंतर महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अंतर्गत अंतर महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील (स्वायत्त) महाविद्यालयाने दणदणीत विजय मिळवला.





ही स्पर्धा संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर येथे सुरू आहे. या अंतर महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेतील सामना क्रमांक ७- कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर विरुद्ध संगमेश्वर रात्र महाविद्यालय, सोलापूर, या सामन्यामध्ये टॉस जिंकून कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाने प्रथम फलंदाजी करताना तब्बल ३५० धावा जमवल्या. यामध्ये अथर्व देशमाने २ धावा,ओंकार कदम २० धावा, कुणाल परचंडे २५ चेंडूत ४९ धावा,ओंकार रोकडे ३, धावा व या व्यतिरिक्त दोन दोन खेळाडूंनी उत्कृष्ट फलंदाजी करत शतकवीर ठरले यात मारुती कांबळे ४१ चेंडूत ११४ धावा व प्रवीण वाघमारे ३८ चेंडूत १३८ धावा. अशा एकूण ३५० धावांचा डोंगर उभा या सामन्यातील विशेष बाब म्हणजे मर्यादित २० षटकाच्या सामन्यातील जास्त धावा बनवण्याचे जागतिक रेकॉर्ड हे २० षटकात ३४९ धावा जमवण्याचे बडोदा संघाचे आहे. परंतु या जागतिक रेकॉर्डला मोडण्याचे काम आज अंतर महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या क्रिकेट संघाने केले. याचे सर्व श्रेय मारुती कांबळे व प्रवीण वाघमारे यांना जाते. व कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाने गोलंदाजी करताना संगमेश्वर रात्र महाविद्यालयाला फक्त ९७ धावांमध्ये सर्व गडी बाद केले. यात अथर्व देशमाने उत्कृष्ट गोलंदाजी करत ४ फलंदाज बाद केले, नंदकुमार जाधव - २ गडी, श्रेयश शिंदे- १ गडी, तर आशिष मस्के-१ गडी बाद केला. हा सामना कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर यांनी २५३ धावांनी जिंकला.

या सर्व यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, डॉ. तुकाराम अनंतकवळस डॉ. राजेश कवडे, अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, डॉ.अनिल चोपडे, डॉ. उमेश साळुंखे व महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, जिमखाना विभाग सदस्य,शिक्षक कर्मचारी यांनी केले. तसेच या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अनिल परमार, विठ्ठल फुले आणि मनोज खपाले यांचे मार्गदर्शन लाभले.

# वैरागमध्ये आदर्श महिला पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ३ जानेवारी-**

एकता महिला मंच आयोजित क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९४ व्या जयंतीनिमित्त आदर्श महिला पुरस्कार २०२४ वितरण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



यावेळी बार्शीचे पोलीस उपविभागीय अधिकारी जालिंदर नालकुल, वैराग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक निवृत्ती मोरे, सोलापूर ग्रामीणच्या पोलीस उपनिरीक्षक सुरेखा शिंदे, महिला पोलीस कॉन्स्टेबल अर्चना मस्के, अरुणा कोंढारे, विनय गोवर्धन, ओंकार जामदार, रोहित गावसाने, प्रशांत कासार, राहुल चिनके, प्रभाकर क्षीरसागर, रत्नप्रभा गायकवाड, दीपाली माने, प्राजक्ता जामदार, शालन दसवंत, नुरजहा शेख, तेजश्री घेमाड, जास्मिन शेख, वनिता जगझाप, लक्ष्मी सुतार, धनश्री लिगाडे आदी उपस्थित होते. यावेळी सुशीला सोनवणे, मंजुषा राऊत, अनिता मोहिते, सुनिता ठाकरे, विद्या म्हस्के, अश्विनी राजाभाऊ भोसले, शितल सुरवसे , वैशाली नावगुडे, रोहिणी जंगले, वर्षा जाधव, विनंता दाणे,शैला काशीद, फतिमा कोतवाल, वैशाली माईनकर, वसुधा डुरे, सुप्रिया तपासे, मंगल शिंदे, वर्षा कुंभार, स्वप्नाली गंगावणे, स्वादिका देशमुख, सीमा कुलाळ, श्रद्धा पाटील, विद्या गावडे, प्रियंका रगडे, सरोजिनी पवार, ज्योती डांगे, कविता बुरगुटे, रेश्मा बोधले, प्रियंका नलावडे, हिना शेख, पुनम गायकवाड, अश्विनी भिवा भोसले,वृषाली उजनकर, नलिनी यादव,अर्चना माने, जयश्री गायकवाड, प्रणिता मोरे,जयमाला गायकवाड,वाहिदा बागवान, शुभांगी सावंत, मनीषा गुंड, प्रिया सुरवसे, व अन्य १० शिक्षक महिलांना एकता महिला मंच यांच्या वतीने आदर्श महिला शिक्षक पुरस्कार वितरण करण्यात आले. सूत्रसंचालन अरविंद माळवदकर यांनी केले.

# करकंब नगरपंचायत होण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची गरज

## नूतन वर्षात नागरिकांचे स्वप्न पूर्ण होणार का?; राजकीय भूमिकेकडे सगळ्यांचे लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ४ जानेवारी-**

करकंब नगरपंचायतीसाठी सन २०१८ साली ग्रामसभेच्या मंजुरीने प्रस्ताव पाठवण्यात आला होता.सन २०१८ साली नगरविकास खात्याकडून याबाबतच्या अहवालाची सविस्तर मागणी करण्यात आली. २०२0मध्ये त्रुटींची पूर्तता करण्यासंबंधीचे पत्र ग्रामपंचायत, गटविकास अधिकारी पंचायत समिती पंढरपूर यांना देण्यात आले.सन २०२१मध्ये या त्रुटी संदर्भात पत्र नगरविकास खात्याकडून देण्यात आले परंतु निष्क्रिय नेते मंडळींच्या उदासीनतेमुळे त्रुटींची पूर्तता न झाल्याने करकंब ग्रामपंचायत नगरपंचायत झाली नाही.यामुळे करकंब नगरपंचायत होण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची गरज असल्याचे बोलले जात आहे.




ग्रामपंचायतचे नगरपंचायतीत रूपांतर झाल्यानंतर नगरविकास मंत्रालयाकडून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाल्याने गावचा विकास झपाट्याने होण्यास मदत होणार आहे.गावाच्या सर्वांगीण विकासासाठी संबंधितांनी ज्या काही त्रुटी आहेत त्या पूर्ण करून लवकरात लवकर संबंधित कार्यालयाकडे कागदपत्रांची पूर्तता करावी अशा प्रकारची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. करकंब ग्रामपंचायतचे रूपांतर नगरपंचायतीत होणे गरजेचे आहे. करकंब गावचा चारी बाजूंनी होत असलेला विस्तार पाहता गावाच्या विकासासाठी,लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायतीला येणारा निधी अपुरा पडत आहे.परिणामी गावातील अंतर्गत रस्ते,ड्रेनेज,लाईट,पाणी यासारख्या गरजा पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायतीची दमछाक होत आहे. ग्रामपंचायतचे नगरपंचायतीत रूपांतर झाल्यास नगरविकास मंत्रालयाकडून मोठा निधी उपलब्ध होऊ शकेल. परिणामी जादा निधी उपलब्ध झाल्याने गावचा विकास झपाट्याने होण्यास मदत होईल. करकंबची लोकसंख्या जवळपास २८ ते ३० हजार आहे.नवीन हद्दवाढ भागातील शंकर नगर,नेमतवाडी चौक,अभिमाननगर,मेडनिंब रस्ता, जुना शेवते रस्ता या भागातही लोकवस्ती,उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात वाढत आहेत परिणामी या सर्वांना पुरेश्या सुख सुविधा देण्यास ग्रामपंचायतीची यंत्रणा अपुरी पडत आहे.

ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत रूपांतर झाले तर करकंब जिल्हा परिषद व पंचायत समिती गट व गण आपोआपच संपुष्टात येतील अशी भीती स्थानिक राजकीय नेत्यांना वाटत असावी अशी शंका नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. यासाठी सत्ताधारी व विरोधक या दोघांनी करकंब नगरपंचायतीसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून माळशिरस तालुक्यातील अकलूज, नातेपुते,महाळुंग ग्रामपंचायतप्रमाणे पाठपुरावा केल्यास करकंब ग्रामपंचायतचे नगरपंचायतीत रूपांतर होण्यास वेळ लागणार नाही.अशा प्रकारच्या भावना नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहेत.

### लोकप्रतिनिधींनी पुढाकार घ्यावा

माळशिरस तालुक्यात मोहिते-पाटील यांच्या पुढाकाराने झालेल्या आंदोलनामुळे अकलूज नगरपरिषद नातेपुते व महाळुंग नगरपंचायत करण्यात आली. त्याप्रमाणे करकंबमधील सर्व सत्ताधारी व विरोधी पक्षांचे पदाधिकारी, विविध संघटना, कार्यकर्ते, ग्रामस्थ विशेषतः आ. अभिजीत पाटील, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, माजी आ. प्रशांत परिचारक, आ. रणजीतसिंह मोहिते-पाटील या सर्वांनी प्रयत्न केले तर करकंब ग्रामपंचायत नगरपंचायत होऊ शकते. यासाठी सर्वांच्या इच्छाशक्तीची आवश्यकता आहे.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## माढ्याच्या जिल्हा परिषद मुलींच्या केंद्र शाळेत वह्या वाटप



**माढा, दि. ३ जानेवारी-**

येथील जिल्हा परिषद प्राथमिक मुलींची केंद्र शाळेत ज्ञानज्योती क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती व बालिका दिनानिमित्त महात्मा फुले प्रतिष्ठानतर्फे मुलींना वह्यांचे वाटप करण्यात आले.

सीए परीक्षेत यश मिळविलेल्या शाळेच्या माजी विद्यार्थिनी दीप्ती कदम व अंकिता भांगे यांचा सत्कार करण्यात आला. कृष्णप्रिया नितीन चव्हाण हिने सावित्रीबाई फुले यांची भूमिका साकारली व मी सावित्री बोलते या विषयावर भाषण केले. मानसी डोईफोडे हिने महात्मा फुले यांची भूमिका साकारली. नगराध्यक्षा ॲड. मिनलताई साठे, लक्ष्मण राऊत यांनी विचार मांडले. शिक्षिका लोखंडे यांनी सावित्रीच्या ओवी सादर केल्या. विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले. उपनगराध्यक्षा कल्पनाताई जगदाळे, गटनेत्या संजीवनीताई भांगे, नितीन साठे, उपाध्यक्ष डॉ. हनुमंत क्षीरसागर, डॉ. विद्या क्षीरसागर, धनाजी वसेकर, लक्ष्मण राऊत, अर्चना राऊत, नगरसेविका सुनीताताई राऊत, निर्मलाताई थोरात, बागवान, रेश्मा लंकेश्वर, मुख्याध्यापक सुरेश माळी, वैजीनाथ मोगल उपस्थित होते. सूत्रसंचालन गिरी यांनी केले तर स्वागत पवार व आभार वैजीनाथ मोगल यांनी मानले.



## संक्षिप्त वृत्त...



### चंद्रपुरीत नंदकुमार पवार यांचा सत्कार

**नातेपुते, दि. ३ जानेवारी-**

चंद्रपुरी (ता. माळशिरस) या शेती महामंडळाच्या वस्तीमध्ये राहणारे दत्तात्रय पवार यांचा मुलगा नंदकुमार पवार यांची भारतीय सेवेत क्लास वन अधिकारी म्हणून निवड झाल्याने नववर्षाच्या पूर्वसंध्येला त्यांचा चंद्रपुरीत भव्य असा सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच संतोष बोडरे, सरपंच सचिन साळुंखे, वीरेंद्र चव्हाण, कॉन्ट्रॅक्टर मेघराज चव्हाण, छत्रपती तरुण मंडळाचे अध्यक्ष बंटी तांबे, अब्दुल मुल्ला, सद्दाम मुल्ला, उज्वल वाघमारे, शिवाजी साळे, सतीश वाघमारे, अमोल सावंत, मेघराज भोसले, रोहित साळे, लखन वाघमारे, अण्णासो ओव्हाळ, विनोद वाघमारे, सोनबा सावंत, धीरज रणपिसे व वस्तीवरील सर्व माता-भगिनी बालचमू खास करून या नंदकुमारचे अभिनंदन करण्यासाठी जमलेला होता. नंदकुमार म्हणाले, गोरगरिबांच्या या चंद्रपुरी वस्तीवर घरोघरी ज्ञानाचा दिवा प्रज्वलित व्हावा यासाठी आपण शक्य तितके प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले थोड्याच दिवसात येथे एक अभ्यासिका सुरू करावी अशी विनंती त्यांनी सरपंच यांना केली. मनःपूर्वक सत्कार केल्याबद्दल त्यांनी सर्व संयोजक व उपस्थित माता-भगिनी यांचे आभार ऊर्जा मानले.



### कबड्डी स्पर्धेत गुरसाळे शाळा जिल्ह्यात प्रथम

**नातेपुते, दि. ३ डिसेंबर-**

मंगळवेढा येथे झालेल्या जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धेत कबड्डी खेळ प्रकारात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गुरसाळे तालुका माळशिरस जिल्हा सोलापूर येथील मुलींच्या संघाने अत्यंत अटीतटीच्या अंतीम सामन्यात पापरी संघाचा जिद्दीने खेळ करुन जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक पटकावला. या संघात पूजा संतोष चव्हाण, सोनम शहाजी पवार, सिद्धी गणेश घाडगे, समृद्धी सचिन चव्हाण, रिया श्रीराम झेंडे, अनुष्का अंबादास रणदिवे, आसावरी अनिल बोडरे, भक्ती मिथुन झेंडे, श्वेता सोमनाथ रायते, स्नेहा संजय कोरटकर, स्वरांजली अजित माने, सिद्धी महेश रायते या खेळाडू मुलींनी चिकाटीने खेळून प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल मुलींचे व मार्गदर्शक शिक्षकांचे गटशिक्षणाधिकारी प्रदीप करडे, शिक्षण विस्ताराधिकारी सुष्मा महामुनी, केंद्रप्रमुख मधुकर वनसाळे यांनी अभिनंदन केले. शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थ यांच्यावतीने खेळाडू मुलींची मिरवणूक काढून सत्कार करण्यात आला.



### अणदूर येथे सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

**अणदूर, दि. ३ जानेवारी-**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती, अणदूर येथील पौर्णिमा महिला बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. वत्सला नगर येथील जिल्हा परिषद शाळेत बालिका दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. पालिकांनी भाषणे केली तर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. विद्यार्थ्यांना पौर्णिमा संस्थेकडून वही, पेन बक्षीस देण्यात आले. अध्यक्षस्थानी बाबई चव्हाण या होत्या. यावेळी अडद, पल्लवी लंगडे, सिंधुबाई ढवळे, वैजयंती गोवे, विशाखा मुखरे, राधिका बारगळ, अंजली भालेराव, बानू शेख, गंगाबाई भोळे, विद्या कागे, सुनिता माळी, सुनीता राठोड, लक्ष्मी राठोड, इंदुबाई सुरवसे, लक्ष्मी मोकळे, श्रीधर गिरी, आडदवार, स्वामी, पांचाळ, भागवत उपस्थित होते.



### गुळपोळीत बालिका दिन साजरा

**वैराग, दि. ३ जानेवारी-**

भैरवनाथ विद्यालय गुळपोळी येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती यांची जयंती बालिका दिन म्हणूनउत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक प्रमोद देशमुख होते. यावेळी सरपंच सविता दीपक चिकणे, प्रगतशील बागायतदार शिवाजी बारवकर, दीपक चिकणे, दत्तात्रय काळे उपस्थित होते. यावेळी घेतलेल्या वक्तृत्व स्पर्धेमध्ये ६१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. लहान गटाममध्ये प्रथम प्रगती धन्यकुमार चिकणे (पाचवी), द्वितीय बारवकर श्रेया धनंजय (सहावी), तृतीय गायकवाड जानवी आनंद (पाचवी), मोठा गट- प्रथम नरखडे साक्षी सागर (नववी), द्वितीय बारवकर श्रेया प्रवीण (आठवी), तृतीय मचाले प्रसाद अनंत (सातवी) यांनी क्रमांक पटकावला. सूत्रसंचालन अक्षरा धनाजी घोरपडे (सहावी) हिने केले व आभार विक्रांत नाना शिंदे यांनी केले.

# अन्नछत्र मंडळामुळे क्रीडांगणाच्या भिंती बोलू लागल्या

## अक्कलकोट येथील राजेफत्तेसिंह क्रीडागणांचे सुशोभिकरण; क्रीडाप्रेमींसह नागरिकांमधून समाधान







**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३ जानेवारी-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली शिवस्मारक गडकिल्ले अजरामर धातु शिल्प शिवचरित्र दालन बालोद्यान निर्मीती केली. अक्कलकोटच्या वैभवात मोठी भर पडली. आता अक्कलकोट तीर्थक्षेत्र शुभोभिकरणाचा ध्यास मंडळाने घेतला आहे. नुतन वर्षाच्या प्रारंभीच मंडळाने श्रीमंत राजे फत्तेसिंह क्रिंडागण शुभोकरणाचे काम पुर्ण करण्यात आले. स्वच्छता केली. यामुळे अक्कलकोट तीर्थक्षेत्राच्या वैभवात भर पडली आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी क्रीडांगणाची देखभालीसाठी कायमस्वरूपी व्यवस्था कार्यन्वित करावी. सुलभ प्रसाधनगृह, पाणी उपलब्ध व्हावे अशी मागणी होत आहे.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ न्यासाने शहरात सामाजिक बांधिलकी जपत पर्यावरण संवर्धनाचे काम करताना फत्तेसिंह मैदाना भोवतालच्या कुंपणभींती २२ कामगार लावुन विविध आकर्षक रंगात रंगवुन त्यावर विविध पर्यावरण संवर्धनाचे संदेश लिहल्याने सामान्य नागरिकांमधुन कौतुक होत आहे. या रंगरंगोटी सोबतच निरूपयोगी गवत, दगड धोंडे काढुन स्वच्छता करून मैदानाची शोभा वाढविली आहे. येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाकडुन दररोज हजारो स्वामीभक्तांना मोफत महाप्रसाद दिला जातो. या स्वामीसेवेसोबतच अन्नछत्र मंडळ विविध समाजपयोगी कामे करत असते. यात वृक्षारोपण आदी पर्यावरण पुरक उपक्रमांना प्राधान्य असाते.✻ फर्ते सिंह मैदानाच्या सभोवताली असलेल्या कुंपण भींतीला आकर्षक रंगरंगोटी करून त्यावर झाडे लावा झाडे जगवा, पर्यावरणाचा समतोल राखा, वृक्षसंवर्धन, बेटी बचाव बेटी पढाऊ, पर्यावरणाची धरा कास तरच होईल मानविचा विकास,पाणी वाचवा पाणी जिरवा,स्वच्छ सुंदर अक्कलकोट, स्त्री भृणहत्या टाळा आदीसह विविध सामाजिक व पर्यावरणपूरक संदेश लिहुन न्यासाकडुन जनजागृती केली आहे. फर्तेसिंह मैदानावर व्यायामासाठी व फिरण्यासाठी दररोज हजारो नागरिक येत असतात. फर्तेसिह मैदानावर वृक्षारोपण सोबतच जनजागृती फलक लिहल्याने समाधान व्यक्त केले जात आहे. पोलीस प्रशासनाच्या आवाहानाला प्रतिसाद देत शहरात शेकडो दिशादर्शक फलक व सुचना फलक लावले आहेत.

### या आहेत संदेशपर सुविचार

पर्यावरणाची धरा कास तरच होईल मानवाचा विकास, बेटी बचाव बेटी पढाओ, झाडे ला वा झाडे जगवा, वृक्षारोपण वृक्ष संगोपन करा, पाणी हे जीवन आहे, पाण्याचा अपव्यय टाळा, प्रदुषणाला आळा घाला पर्यावरणाचा नाश टाळा, पाण्याचे रक्षण धरतीचे संरक्षण , निर्सगाचे नियम पाळा प्लास्टिक वापर टाळा, पाणी अडवा पाणी जिरवा, बेटी बचाओ बेटी पढाओ, स्वच्छ परिसर निरोगी निरंतर, पर्यावरणाचे रक्षण हेच खरे मुल्य शिक्षण , स्वच्छ अक्कलकोट सुंदर अक्कलकोट , खेलने कुदने का लो संकल्प स्वस्थ रहनेका यही विकल्प, गांधीजीका यही था नारा, स्वच्छ भारत देश हो हमारा, वृक्ष लावा एकतरी पर्यावरणाचे रक्षण करी, स्वच्छता शिका आरोग्याला जिंका, पाण्याचे संरक्षण धरतीचे रक्षण,स्वच्छता असेल जिथे, आरोग्य वसेल तेथे आदी.

### सुरक्षा रक्षक नेमावा

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने राजे फत्तेसिंह क्रीडागणाची स्वखर्चाने रंगरंगोटी व मोठे संदेश लिहुन मोठी जागृती केली आहे हे कौतुकस्पद आहे. त्याचा आदर्श घेण्यासारखा आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी याचे जतन करण्यासाठी कायमस्वरूपी येथे रखवालदार प्रसाधन गृह पाणी याची सोय करावी अशी मागणी युवराज कोळी समर्थ वाघमोडे प्रविण राठोड यांनी केली आहे.



## बार्शीतील शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयात १०४ जणांचे रक्तदान

### कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ जानेवारी-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय बार्शी येथे कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त घेतलेल्या शिबिरात १०४ जणांनी रक्तदान केले. श्रीमान रामभाई शहा रक्तपेढीने रक्तसंकलन केले. उद्घाटन माजी प्राचार्य डॉ. सी. एस. मोरे, प्राचार्य डॉ. दीपक गुंड यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे, प्रा. दिलीप कराड उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. दीपक गुंड यांनी केले. प्राचार्य डॉ. सी. एस. मोरे यांनी संस्थेच्या किंवा इतर सामाजिक कार्यात शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयाचा नेहमीच उत्स्फूर्तपणे सहभाग असतो. यावेळेस देखील रक्तदान शिबिरासाठी मोठा उत्साह या अध्यापक विद्यालयात दिसत आहे. रक्तदान हे श्रेष्ठदान आहे. ते सर्वांनी करणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे एखाद्याचा जीव आपण वाचवू शकतो, असे त्यांनी सांगून रक्तदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

समाजकार्यात विद्यार्थ्यांनी देखील आपला सहभाग नोंदवावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत अध्यापक विद्यालयामध्ये ४० जणांनी रक्तदान केले. प्रा. धुमाळ, प्रा. डॉ. माळी, प्रा. उलभगत, प्रा. गायकवाड, प्रा. साबळे, महेश कुंभारे असे ४० विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. खजिनदार जयकुमार शितोळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी श्रीमान रामभाई शहा रक्तकेंद्र, बार्शीचे मानद सचिव प्रा. दिलीप कराड, प्रशांत बुडूख उपस्थित होते. रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यासाठी श्रीमान रामभाई शहा रक्तपेढी, बार्शी येथील अनुराधा डोंगरे, सुप्रिया लगदिवे, सचिन मांजरे, ताज सय्यद, किरण जाधव यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. उलभगत यांनी केले.

## माढ्याच्या साठे विद्यालयात कार्यक्षमता वृद्धीवर धडे

### माजी विद्यार्थी प्रीतम सावळे यांच्याकडून मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ३ जानेवारी-**

सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशाला माढा येथील विद्यार्थीना प्रशालेचे दहावीच्या ९४-९५ बॅचचे माजी विद्यार्थी तसेचं बीएएसएफ इंडिया लिमिटेड, मुंबई या जर्मन बहुराष्ट्रीय कंपनीत मुंबई येथील मुख्यालयात उच्च पदावर कार्यरत असलेले प्रीतम सावळे यांनी कार्यक्षमता वृद्धी तसेच व्यक्तिमत्व विकास या विषयांवर सचित्र मार्गदर्शन केले.

प्रीतम सावळे हे बीएएसएफ या शेतीसाठीच्या किटकनाशक निर्मिती करणाऱ्या कंपनीमध्ये वरिष्ठ व्यवस्थापक पदावर कार्यरत असून हि कंपनी जगभरामध्ये जवळपास १७० हून अधिक देशांत कार्य करते. शेतकऱ्यांसाठी नाविण्यपूर्ण आणि अनोखी उत्पादने देण्यात बीएएसएफ नेहमीचं अग्रेसर असते. प्रीतम सावळे यांनी आपण ज्या प्रशालेत दहावीपर्यंत शिकलो, त्या प्रशालेचे 'काहीतरी देणे लागतो' या भावनेतून हे मार्गदर्शन केलेले असून गावाकडील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आपल्याला मिळालेल्या 'ज्ञानाचा फायदा व्हावा' या उद्देशाने मार्गदर्शन केले आहे. यावेळी इयत्ता दहावीचे जवळपास १६० विद्यार्थी उपस्थित होते.

प्रीतम यांनी भविष्याविषयी अंतर्मुख केले. या चांगल्या मार्गदर्शनामुळे प्रशालेचे मुख्याध्यापक नागेश खेडकर सर यांनी प्रीतम सावळे यांचे आभार मानत सांगितले की, 'प्रीतम सावळे हा या प्रशालेचा मार्च ९५ साली झालेल्या बोर्ड परिक्षेतील टॉपर विद्यार्थी होता. तो सध्या मुंबई येथे शेतीच्या कीटकनाशक निर्मिती करणाऱ्या कंपनीमध्ये उच्च पदावर काम करतो. त्यांनी आपल्या व्यस्त कार्यक्रमांतूनदेखील वेळ काढून आपल्या प्रशालेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. त्यांनी केलेले मार्गदर्शन है विद्यार्थ्यांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरणार असून भविष्यात त्यांना याचा खूप फायदा होणार आहे.' असे सांगितले. यावेळी एस एस सदावर्ते, मीनाक्षी खेडकर, शितल चव्हाण तसेच किरण शेलार हे उपस्थित होते. किरण शेलार यांनी आभार प्रदर्शन केले.

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी घेतले श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ जानेवारी-**

राज्याचे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. यावेळी उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, जलसंपदा विभागाचे अधिक्षक अभियंता श्री खांडेकर, प्र.तहसीलदार सचिन मुळीक, कार्यकारी



अभियंता सोमशेखर हरसुरे, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

# स्टेमी कार्यक्रमांतर्गत बार्शीतील सुश्रुत मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये मोफत एन्जिओग्राफी, एन्जोप्लास्टी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ जानेवारी-**

स्टेमी महाराष्ट्र शासनाचा अत्यंत प्रभावी कार्यक्रम फेब्रुवारी २०२१ मध्ये सुरु करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट महाराष्ट्रामध्ये हृदयविकाराच्या झटक्याचे निदान आणि उपचार करण्यासाठी लागणारा वेळ कमी करण्यासाठी या कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र शासनाच्यावतीने करण्यात आलेली आहे. सरकारी आरोग्य केंद्रामध्ये हृदयविकाराचा तात्काळ शोध घेण्यासाठी व गरजूंना मोफत आरोग्य सेवा मिळावी हा या कार्यक्रमामागील मूळ उद्देश आहे.



या कार्यक्रमाची सुरुवात जेव्हा झाली तेव्हा महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांमध्ये हा कार्यक्रम लागू करण्यात आला होता. नंतर राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये याचा विस्तार करण्यात आला. स्टेमी महाराष्ट्र कार्यक्रमाचे उद्दिष्ट हृदयविकाऱ्याच्या झटक्याचे रुग्णांसाठी प्रतिक्षा वेळ कमी करणे हे याद्वारे रुग्णांना क्लाऊड कनेक्टेड वन टू इसीजी वापरुन जवळच्या रुग्णालयामध्ये जेथे महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना कार्यान्वित आहे. अशा खाजगी रुग्णालयामध्ये प्रवेश घेणे, सोपा करणे व पुढील उपचार मोफत मिळावा याकरिता सुरु करण्यात आलेला आहे.

एक हब आणि स्पोक मॉडेल जिथे स्पोक सेंटर प्रारंभिक उपचार देतात आणि पुढील व्यवस्थापनासाठी रुग्णांना हब केंद्राकडे पाठवतात. यामध्ये सुश्रुत मल्टीस्पेशालिटीज हॉस्पिटल बार्शी हे एक हब आहे. इथे गेल्या दोन ते तीन महिन्यांपासून स्टेमी कार्यक्रमांतर्गत जवळपास ८ ते १० व इतर १५८८ हृदयरोग अथवा हृदयविकाराचा झटका आलेल्या रुग्णांना मोफत उपचार करण्यात आलेला आहे. हा कार्यक्रम आता सोलापूर व धाराशिव जिल्ह्यात गेल्या अनेक महिन्यांपासून प्रभावीपणे सुरु आहे. तरी अशा हृदयविकाराचा झटका आलेल्या रुग्णांना सुश्रुत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल बार्शी या हबकडे पाठवावे. जेणेकरुन त्यांच्या पुढील तपासण्या व उपचार पूर्णपणे मोफत करण्यात येईल. सुश्रुत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये पूर्णवेळ डॉ. विकास खामकर व नियोजित वेळेत डॉ. सुनील शेवाळे, डॉ. दीपक गायकवाड व डॉ. हेमंत कोकणे हे हृदयरोग तज्ञ उपस्थित असतात.

### तपासणी करुन घेण्याचे आवाहन

गरजू रुग्णांनी जवळील सरकारी आरोग्य केंद्रामध्ये संपर्क साधून आपल्या हृदयाची तपासणी करुन घ्यावी व पुढील तपासण्याची गरज असल्यास सुश्रुत मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल बार्शी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## 'रामकृष्ण'च्या स्वप्नाली मगरने पटकावले सुवर्णपदक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ जानेवारी-**

येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयाची वाणिज्य विभागातील विद्यार्थिनी स्वप्नाली मगर हिने २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या विद्यापीठाच्या परीक्षेत विद्यापीठात प्रथम येत सुवर्णपदक पटकावले आहे.

यापूर्वी देखील स्वप्नाली मगर घेणे बीकॉम भाग तीनच्या विद्यापीठाच्या परीक्षेत सुवर्णपदक पटकावले होते.

स्वप्नाली मगर या विद्यार्थिनीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख, प्रा. बालाजी नगरे, डॉ. अवधूत नवले, डॉ. अमर निंबाळकर, प्रा. सुप्रिया शेटे यांचे मार्गदर्शन लाभले.



याबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मराठवाडा विभाग प्रमुख तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांनी स्वप्नाली मगर आणि वाणिज्य विभागातील सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तिचे या यशाबद्दल कौतुक होत आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### विखे-पाटील यांचा सत्कार

**परंडा, दि.३ जानेवारी -**

महाराष्ट्र राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी तुळजापूर येथे आले असता त्यांचे कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सचिन पाटील यांच्या वतीने तुळजापूर शहरात आगमन झाल्यावर स्वागत करण्यात आला. यावेळी त्याच्या समवेत शहाजी पवार, दिनेश बागल, संदीप गगणे, राम चोपदार, प्रतीक रोजकरी, धैर्यशील दरेकर, यांच्यासह असंख्य भाजप नेते कार्य करते उपस्थित होते.



### चेअरमनपदी अनिल हंगरगेकर

**तुळजापूर, दि.३ जानेवारी -**

जय भवानी विविध कार्यकारी सोसायटी सेवा सहकारी संस्था मर्यादित तुळजापूर या संस्थेची संचालक मंडळाची बैठक ३ जानेवारी रोजी संपन्न झाली. या बैठकीचे अध्यक्ष म्हणून एस.एन. शिंदे सहकारी अधिकारी श्रेणी दोन सहकारी संस्था तुळजापूर यांच्या अध्यक्षतेखाली चेअरमन निवड करण्यात आली. युवा नेते विनोद गंगणे यांच्या नेतृत्वाखाली नवीन चेअरमन म्हणून अनिल हंगरगेकर यांची एक मताने (बिनविरोध) चेअरमन म्हणून निवड करण्यात आली. निवड झाल्यानंतर सर्व संचालकातर्फे सुहास गायकवाड उपसभापती कृषी उत्पन्न बाजार समिती तुळजापूर व व्हा.चेअरमन सतीश भोसले व इतर संचालक यांनी नूतन चेअरमन यांचा सत्कार करण्यात आला.



### विखे पाटील यांचा महायुतीकडून सत्कार

**तुळजापूर, दि.३ जानेवारी -**

महाराष्ट्र राज्याचे कृष्णा आणि गोदावरी खोरे विकास महामंडळाचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दि.३ जानेवारी रोजी तुळजाभवानी देवीचे दर्शन घेऊन विधीवत पूजा केली. दर्शनानंतर श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या धार्मिक कार्यालयात महायुतीकडून शिवसेनेचे धाराशिव जिल्हा सहसंपर्कप्रमुख अमरराजे कदम, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तुळजापूर शहराध्यक्ष महेश चोपदार यांनी तुळजापूर महायुतीच्या वतीने सत्कार केला. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य पाटील, राष्ट्रवादीचे दत्तात्रय हुंडेकरी, युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख सुरज कोठावळे, खंडु कुंभार हजर होते.



### अभिमन्यू पवार यांचे स्वागत

**धाराशिव, दि.३ जानेवारी -**

ताकविकी (ता.तुळजापूर) येथे देवेन्द्र फडणवीस मुख्यमंत्री व्हावे म्हणून औसा तालुक्याचे आमदार अभिमन्यूजी पवार यांची औसा ते तुळजापूर पायी नवसपूर्ती पदयात्राचे आगमन झाले असता भाजपचे प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा रुपामाता समूहाचे प्रमुख ॲड. व्यंकटराव गुंड यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा देऊन स्वागत करण्यात आले. तदनंतर तुळजाभवानी आराधी मंडळाचा गोंधळाचा आयोजित भक्तीपर कार्यक्रमाचा आनंद घेतला. यावेळी माजी जि.प. उपाध्यक्ष सुधाकर गुंड, बाबुराव पुजारी गुंड, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. प्रशांत पवार, बँकेचे संचालक शंकर गाडे, रुपामाता अर्बन मल्टीस्टेट संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद खांडेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यनारायण बोधले, सोमेश्वर शिंदे व इतर मान्यवर उपस्थित होते.

### आरोग्य शिबीर संपन्न

**उमरगा, दि.३ जानेवारी -**

कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय मुरूम यांच्या वतीने गणेशनगर येथे राष्ट्रीय सेवा योजनेची शिबिर संपन्न होत आहे. यामध्ये ग्रामीण रुग्णालय मुरूम व कला, वानिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिर घेण्यात आले. यावेळी उपस्थित स्वयंसेवक व गावातील नागरिक यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये एकुण ८५ नागरिकाचे रक्त गट, सीबीसी एच.बी.एस.ए.जी. व एच.आय.व्ही. व बीपी शुगर विविध आजाराची तपासणी करून उपचार करण्यात आले. यावेळी कला, प्राचार्य गोविंद इंगोले वैद्यकीय अधीक्षक डॉ. अरदाळे व प्रयोग शाळा तंत्रज्ञ विजय भोसले, समुपदेशक सुजित जाधव, पुष्पा गोरे, उमेश लोखंडे, प्रा. गजानन उपासे, प्रा. किसन माने, प्रा. शेषराव राठोड, प्रा. बालाजी इंगोले, प्रा. रोहन हराळकर, प्रा. विनय इंगळे, प्रा. वर्षा हुलगुंडे आदी उपस्थित होते.

# सततच्या पावसाचे निकष बदलणार; अनुदानाबाबत मुख्यमंत्री सकारात्मक

**आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी घेतली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट....**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ जानेवारी -**

सततच्या पावसामुळे मोठे नुकसान होऊनही केवळ निकषात बसत नसल्याने जिल्ह्यातील अनेक महसूल मंडळातील शेतकरी अनुदानापासून वंचित राहिले आहेत. त्या सर्वानाच मदत मिळायला हवी यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. वस्तुनिष्ठ परिस्थितीचा आधार ग्राह्य धरून सततच्या पावसाच्या निकषात बदल करत राज्य नैसर्गिक आपत्ती अंतर्गत शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी मदत व पुनर्वसन खात्याच्या सचिवांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सूचना दिल्या असून मदतीपासून वंचित उर्वरित शेतकऱ्यांना दिलासा देण्याबाबत मुख्यमंत्री महोदयांनीही अनुकूलता दर्शविली असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील ५७ पैकी ३३ महसूल मंडळात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी झाली होती. अतिवृष्टीमुळे बाधित असल्याची नोंद झालेल्या मंडळातील एक लाख ८१ हजार शेतकऱ्यांना राज्यसरकारने २२१ कोटी रुपयांची नुकसान भरपाई मंजूर केली आहे.याच कालावधीत धाराशिव, भूम, परंडा आणि तुळजापूर तालुक्यातील २४ महसूल मंडळात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली असताना प्रचलित निकषांमुळे अतिवृष्टीची नोंद झाली नव्हती. मात्र झालेले नुकसान मोठे होते. अनेक ठिकाणी सदोष पर्जन्यमापकांमुळे अतिवृष्टी असतानाही ती नोंदविली गेली नाही. त्यामुळे २०२२ साली ओढवलेल्या आपत्तीवेळी केलेली प्रक्रिया अनुसरून उर्वरित २४ महसूल मंडळात दोन वर्षापूर्वी ज्याप्रमाणे वस्तुनिष्ठ नुकसानीच्या निकषानुसार केलेल्या पाहणीचा अहवाल ग्राह्य धरला होता अगदी तीच प्रक्रिया अनुसरून तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणीही आपण पत्राद्वारे त्याचवेळी केली होती, असे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले. आपण व्यक्तिशः अनेक गावातील नुकसानीची महसूल व कृषी अधिकाऱ्यांसह पाहणी केली होती. यामध्ये सलग पाच दिवसात कमी-जास्त असा मिळून ५० मिमी पेक्षा अधिक पाऊस झाल्याने पिकात थांबलेले पाणी, जमिनीवरील खरवडून गेलेली माती तसेच वाहून गेलेले पीक यामुळे अनेक भागात पिकांचे पूर्ण नुकसान झाल्याचे दिसून आले. असे असतानाही सलग पाच दिवसाच्या कालावधीत प्रत्येक दिवशी किमान १० मि.मी पाऊस झाल्यास या प्रचलित निकषात बसत नसल्याने २४ महसूल मंडळातील शेतकरी मदती पासून वंचित राहिल्याची बाब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. शासन निर्णयातील सततच्या पावसाचा सलग पाच दिवसाच्या कालावधीत प्रत्येक दिवशी किमान १० मि.मी पाऊस झाल्यास हा निकष शिथिल करुन महसुल मंडळामध्ये सलग पाच दिवसाच्या कालावधीमध्ये सरासरी ५० मिमी किंवा ५० मिमी पेक्षा जास्त पाऊस झाल्यास असा बदल करून व वस्तुनिष्ठ पंचनाम्याच्या आधारे जिल्ह्यातील उर्वरित महसूल मंडळातील शेतकऱ्यांना राज्य नैसर्गिक आपत्ती अंतर्गत मदत करण्या संदर्भातही संबंधित अधिकाऱ्यां समवेत बैठकीचे आयोजन करावे अशी विंनती मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे. जिल्ह्यातील उर्वरित शेतकरी बांधवांच्या नुकसानीपोटी त्यांना दिलासा देण्याबाबत मुख्यमंत्री फडणवीस साहेबांनी अनुकूलता दर्शविली असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

### जोवर मदत मिळत नाही तोवर पाठपुरावा करणार : आमदार पाटील

स्वयंचलित हवामान केंद्रात २४ तासात ६५ मिलीमीटरपेक्षा जास्त पाऊस झाल्यास आणि शेतीचे ३३ टक्क्यांपेक्षा अधिकचे नुकसान असल्यास अनुदान स्वरूपात शेतकर्यांना मदत दिली जाते. मात्र अतिवृष्टी झालेली असताना प्रचलित निकषात न बसलेल्या अनेक महसूल मंडळांत शेती पिकांचे नुकसान झाले आहे. राज्य सरकारने सततचा पाऊस आपत्ती म्हणून घोषित केला आहे. पीक काढणीच्या काळात सोयाबीनला बुरशीजन्य रोगाचाही प्रादूर्भाव झाला होता. शेंगातील दाण्याची प्रत खराब झाल्याने शेतकर्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे. त्यामुळे ज्या महसूल मंडळांना या नुकसान भरपाईतून वगळले आहे त्यांना जोवर मदत मिळत नाही तोवर आपण पाठपुरावा करणार असल्याचे आमदार पाटील यांनी म्हटले आहे.

## रामकृष्ण महाविद्यालयात विभागीय गुणवंत विद्यार्थी मार्गदर्शन मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ जानेवारी -**

येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात मराठवाडा विभागीय गुणवंत विद्यार्थी मार्गदर्शन मेळावा महाविद्यालयाचे प्राचार्य तथा मराठवाडा विभाग प्रमुख डॉ. जयसिंगराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

या मेळाव्याचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून मराठवाडा विभाग प्रमुख प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख हे होते.

या मेळाव्याला मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. देशमुख म्हणाले की, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी सुरू केलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढण्यास मदत होते.

यावेळी कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्राध्यापक बी एस सूर्यवंशी, प्रा. क्षीरसागर, डॉ. मच्छिंद्र नांगरे, संतोष साळुंखे, किशोर जाधवर, प्रा. क्रांती कदम आदींसह विविध संस्कार केंद्रातून गुरुदेव कार्यकर्ते आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर मेळाव्याचे प्रस्ताविक प्रा.एस.ए. शेख यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. वैभव आगळे यांनी केले तर आभार प्रा. अतुल देशमुख यांनी मानले. सदर कार्यक्रमासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रम श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मराठवाडा विभाग प्रमुख प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

## उर्सच्या आयोजनास सर्वांनी सहकार्य करुन साजरा करावा

**धाराशिव अपर पोलीस अधिक्षक गौहर हसन यांची उर्स पुर्वतयारी आढावा बैठक संपन्न...**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ जानेवारी -**

धाराशिव येथे थोर संत हजरत ख्वाजा शमशोद्दीन गाझी दर्गा येथे आयोजित उर्समध्ये दरवर्षी हिंदु मुस्लीमसह सर्व धर्माचे भाविक मोठया उत्साहाने व भक्तीभावाने सहभागी होतात. या उर्सची परंपरा ७२० वर्षाची आहे. यावर्षी देखील आयोजित करण्यात येणाऱ्या उर्ससाठी सर्वांनी सहकार्य करुन आनंदाने साजरा करावा, असे आवाहन अपर पोलीस अधिक्षक गौहर हसन यांनी केले.

आज ३ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात हजरत ख्वॉजा शमशोद्दीन गाजी हजरत ख्वॉजा शमशौद्दीन गाजी (रहे) शरण शाहवली उर्स पूर्वतयारीच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत हसन बोलत होते. यावेळी प्रभारी अपर जिल्हाधिकारी शिरीष यादव, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी नीलेश राठोड, मुख्याधिकारी वसुधा फड, तहसिलदार (महसूल) अभिजीत जगताप, अन्य विभागाचे संबंधित अधिकारी तसेच उर्स आयोजन समितीचे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

यादव म्हणाले, ऊर्सच्या काळात कोणतीही आपत्ती उद्धवणार नाही यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात.उर्स परिसरात मदत केंद्र स्थापन करून या केंद्रातील विविध विभागाचे संबंधित अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती असावी. ऊर्सच्या परिसरात वीज पुरवठा अखंडितपणे सुरू राहील, यासाठी वीज वितरण कंपनीने लक्ष द्यावे. ऊर्सचा परिसर हा स्वच्छ असावा. तेथील मार्गावरील खड्डे बुजविण्याचे काम व साफसफाईचे काम नगरपालिकेने वेळेत पूर्ण करावे. वाहतूक व्यवस्था विस्कळीत होणार नाही याकडे पोलीस विभागाने लक्ष द्यावे.

ऊर्समध्ये असणाऱ्या खाद्यपदार्थाच्या दुकानांनी नाममात्र परवाना रक्कम भरून अन्न व औषध प्रशासनाचे लायसन्स घ्यावे. ऊर्स काळात राज्यमार्ग परिवहन महामंडळांनी ज्यादा बसेसची व्यवस्था भाविकांसाठी करावी. असे त्यांनी यावेळी सांगितले.

## भातागळी येथे खा. ओमराजे निंबाळकर, आ. कैलास पाटील, आ. प्रवीण स्वामी यांचा नागरी सत्काराचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ जानेवारी -**

लोकसभा निवडणुकीत विजयी झाल्याबद्दल खासदार ओमराजे निंबाळकर तर विधानसभा निवडणुकीत विजयी झाल्याबद्दल आमदार कैलास पाटील, आमदार प्रवीण स्वामी यांच्या नागरी सत्काराचे दि.५ जानेवारी सायंकाळी सहा वाजता भातागळी तालुका लोहारा येथे आयोजन करण्यात आले असून त्याच वेळेस ग्रामदैवत शंभो महादेवाची महापूजा तसेच नवस पूर्ती निमित्त नंदी सोडण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी तालुक्यातील महाविकास आघाडीच्या तसेच शंभू महादेवाच्या भक्तांनी उपस्थित रहावे असे आव्हान सत्कार समितीतर्फे करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महादेव देवस्थान कमिटीचे अध्यक्ष संजय पाटील राहणार आहेत. तर या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून बाबा पाटील, राजू तोडकरी, नवरदेव कदम, दीपक जवळगे, दिलीप भालेराव, प्रकाश आष्टी, आश्लेष मोरे, रजाक अत्तर, सलीम शेख, डॉ. लक्ष्मण आसबे, भातागळीच्या सरपंच सुषमा माने तसेच विकासेसोचे चेअरमन बाळासाहेब जगताप हे राहणार आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनिल जगताप, मुकुंद जगताप, तानाजी आनंदगावकर, गणेश फत्तेपुरे, महादेव आनंदगावकर, फुलचंद जगताप व समस्त ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

## तुळजापूर उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयास टाळे ठोकण्याचा शेतकऱ्यांचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.३ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील कसई येथील गट नंबर २४ व गट नंबर ७१ या क्षेत्राची मोजणी करण्यासाठी अतितातडीची फिस ऑगस्ट २०२४ मध्ये भरूनही सतत चालढकल करत असल्याने अमोल डोंगरे व शंकर पवार या शेतकऱ्यांनी येणाऱ्या आठवड्यात मोजणी न केल्यास ८ जानेवारी रोजी तुळजापूर येथील उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय तुळजापूरला टाळे ठोकण्याचा इशारा थेट जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन देऊन केला आहे.

तुळजापूर येथील भूमी अभिलेख कार्यालयाने दोन-तीन वेळेस नोटिसा देऊनही सतत कोणत्यानाकोणत्या कारणाने चालढकल करत असल्याने या संतप्त शेतकऱ्यांनी टाळे ठोकोचा इशारा दिला आहे. हे कार्यालय सतत चर्चेत राहत असून तालुक्यातील असंख्य शेतकऱ्यांना यामुळे अडचणीचा सामना करावा लागत आहे. दप्तरदिरंगाईमुळे अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असून किरकोळ कारणासाठीही जिल्हाधिकारी तसेच न्यायालयाचे दार ठोठावे लागत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून अनेक शेतकरी या भूमी अभिलेख कार्यालयाकडून न्यायाची अपेक्षा ठेवून आहेत. परंतु बऱ्याच शेतकऱ्यांना न्याय मिळत नसल्याने अशा प्रकारचे आंदोलन करण्याची वेळ शेतकऱ्यांवर येत आहे.

यामुळे जिल्हाधिकारी यांनी या भूमी अभिलेख कार्यालयास कायमस्वरूपी उपअधीक्षक देऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अन्यथा भविष्यात उग्र स्वरूपाचे आंदोलन शेतकरी करतील या कार्यालयाची अब्रू चव्हाट्यावर आल्याशिवाय राहणार नाही अशाही प्रतिक्रिया शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहेत.

## मैलारपुर येथील बोरी नदीवर उभारण्यात येत असलेल्या पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे





**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३ जानेवारी -**

सोलापुर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावरील नळदुर्ग बायपास रोडवरील मैलारपुर येथील बोरी नदीवर उभारण्यात येत असलेल्या पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे होत आहे. पुलाचे काम सुरु असतानाच झालेल्या पुलाच्या कामाला भेगा पडल्या आहेत. त्यामुळे राष्ट्रीय महामार्गावरील अतिशय महत्वाच्या असलेल्या या पुलाच्या बांधकामावर साशंकता व्यक्त केली जात आहे.

सोलापुर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गाच्या रखडत पडलेल्या चौपदरीच्या कामाला आता गती आली आहे. हा महामार्ग नळदुर्ग शहराच्या बाहेरून गेला असुन गोलाई ते श्रीक्षेत्र मैलारपुर व पुढे रिसॉर्ट मार्गे राष्ट्रीय महामार्ग असे बायपासचे काम सध्या सुरु आहे. तब्बल १० वर्षापेक्षा जास्त कालावधीपासुन या महामार्गाचे काम रखडत पडले आहे. मात्र सध्या अणदुर ते श्रीक्षेत्र मैलारपुर मार्गे गेलेल्या बायपास रोडचे काम वेगात सुरु आहे मात्र या कामाच्या दर्जाबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे.

वास्तविक पाहता हा राष्ट्रीय महामार्ग अतिशय महत्वाचा असुन या महामार्गावरून दररोज हजारो वाहने ये जा करतात यामध्ये जड वाहनांसह अतीजड वाहनांचा मोठ्या प्रमाणात समावेश असतो. त्यामुळे या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम विशेष करुन या महामार्गावर उभारण्यात येत असलेले उड्डाणपुल तसेच पुलांचे काम अतिशय दर्जेदार व दीर्घाकाळ टिकणारे होणे गरजेचे आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाच्या अधिकारी व अभियंत्यांनी या कामाकडे लक्ष देऊन हे काम संबंधित ठेकेदारांकडुन चांगल्या दर्जाचे करुन घेणे गरजेचे आहे. कारण केवळ निकृष्ठ दर्जाच्या कामामुळे भविष्यात या महामार्गावर एखादी मोठी दुर्घटना होऊन जीवितहानी होऊ नये याची दक्षता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभाग व काम करणाऱ्या संबंधित ठेकेदाराने घेऊन हे काम करावे.

सध्या खंडोबा मंदिराजवळील बोरी नदीवर पुल बांधण्याचे काम सुरु आहे. सध्या जे या पुलाचे काम सुरु आहे ते अंतीम टप्प्यात आले आहे. त्यामुळे पुलाच्या झालेल्या कामाचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाने गुन नियंत्रक विभागाडुन या कामाची तपासणी करून घ्यावी. कारण या पुल भारणीचे काम निकृष्ठ दर्जाचे होत असल्याचे दिसुन येत आहे. पुलाच्या वरच्या भागात जे काँक्रिटी करणाचे काम झाले आहे त्या कामाला अजुन काम सुरु असतानाच अनेक ठिकाणी तडे गेले आहेत.वास्तविक पाहता महामार्गावरील पुलाच्या कामात अशा प्रकारे निष्काळजीपणा करणे योग्य नाही.

या पुलाच्या कामावर जो अभियंता देखरेख करीत आहे. तो झोपा काढत आहे की काय असा संशय येत आहे. या पुलाच्या झालेल्या कामात अनेक ठिकाणी सळया आत्ताच उघड्या पडल्या आहेत. त्यामुळे या पुलाचे काम घिसाडघाईने होत असल्याचा संशय येत आहे. हा पुल बोरी नदीवर उभारला जात आहे.

त्यामुळे या पुलाचे काम दर्जेदारच होणे गरजेचे आहे. राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी या होत असलेल्या कामाची पाहणी करुन झालेल्या कामाची तपासणी करावी, अशी मागणी होत आहे.

## आयडियल इंग्लिश स्कूलमध्ये सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.३ जानेवारी -**

तालुक्यातील हिंगळजवाडी येथील आयडियल इंग्लिश स्कूल मध्ये सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन संस्थाध्यक्ष अनिल देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या वेशभुशा केली होती. तर यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या जिवावर आधारित भाषने विद्यार्थ्यांनी सादर केला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्या वैशाली आडसूळ, ज्ञानदा घुटुकडे, सारिका मुळे, शुभांगी घेवारे,

राजकन्या नाडे, भाग्यश्री खोडवे, मीनाक्षी लोमटे, उमा कोथिंबीरे, नंदिनी शिंदे आदी शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.

## ⏩ सावित्रीबाई फुलेंना अभिवादन...



**येरमाळा : गौर (ता. कळंब) येथील जि.प. शाळेतील विद्यार्थीनींनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा साकारून व प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन केले. यावेळी सर्व शिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते.**



### लोटस पोदार लर्न स्कूल

**उमरगा, दि.३ जानेवारी -**

शिवछत्रपती बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लोटस पोदार लर्न स्कूल येथे 'सावित्रीबाई फुले' जयंती साजरी करण्यात आली. प्रथमतः सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य श्रीकांत वारुडे, उपप्राचार्य अतुल फावडे व सर्व महिला शिक्षिका यांच्या हस्ते करण्यात आले. सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेत मुलींनी विशेष सहभाग नोंदविला. त्यामध्ये स्वरा श्रीमेवार या विद्यार्थिनीने 'मी सावित्री'या एकपात्री नाटकाचे उत्कृष्ट सादरीकरण करुन मनोगत व्यक्त केले. त्याबरोबर इयत्ता आठवीत शिकणाऱ्या सुर्यान जाधव, ओमकार सुरवसे, सोहम स्वामी, सुरज नागदे, चैतन्य पाटील, सृष्टी कवठे, प्रज्ञा पवार, साक्षी पाटील यांनी कार्यक्रमात विशेष सहभाग नोंदविला. सूत्रसंचालन अन्वी पवार व अभिमन्यू जाधव या विद्यार्थ्यांनी केले. हा कार्यक्रम शाळेचे प्राचार्य श्रीकांत वारुडे, उपप्राचार्य अतुल फावडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सहकार्याने संपन्न झाला.



### इंदिरा गांधी आदर्श आश्रमशाळा

**जळकोट, दि.३ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील होर्टी येथील इंदिरा गांधी आदर्श प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेत सावित्रीबाई फुले जयंती व बालिका दिनानिमित्त शाळेतील विद्यार्थीनींचा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश चव्हाण यांच्या हस्ते सत्कार करून खाऊ वाटप करण्यात आले. प्रथमतः सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून अभिवादन करण्यात आले.यावेळी शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक जे.व्ही. मुगळे, शिवाजी कवठे, धनंजय भोसले, शंकर थाटे, शिवशंकर बिराजदार, सचिन बनजगोळे, प्रेमदास राठोड, भिमराव नरसोडे, मारुती हब्बु, लक्ष्मण घोडके शिक्षक वृंद, विद्यार्थी उपस्थित होते.



### जळकोटवाडी जि.प. शाळा

**जळकोट, दि.३ जानेवारी -**

येथून जवळच असलेल्या जळकोटवाडी (नळ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिवस बालिका दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. थोर माजसुधारक सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन अंगणवाडीताई व शाळेतील बालिकांच्या हस्ते करण्यात आले. सावित्रीबाई फुले यांच्या कार्याविषयी शाळेचे मुख्याध्यापक उमेश भोसले यांनी माहिती सांगितली. जयंतीदिनानिमित्त शाळेतील बालिकानी विविध वेशभूषा धारण केली होती. विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित चित्रपट दाखविण्यात आला. याप्रसंगी सरपंच शिवाजीराव कदम, शिक्षणप्रेमी राजू लोखंडे, अंगणवाडीताई सरोजा कदम, आशा कार्यकर्ती गंगुताई लोखंडे, मुख्याध्यापक उमेश भोसले, सहशिक्षक अशोक राठोड, सुधीर लष्करे, अंगणवाडी सेविका -मदतनीस आणि शाळेतील बालचमू उपस्थित होते.

### रुपामाता माध्यमिक विद्यालय

**धाराशिव, दि.३ जानेवारी -**

रुपामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात क्रांतीज्योती, ज्ञानज्योती, सावित्रीबाई फुले जयंती बालिका दिन म्हणून साजरी करण्यात आली. तसेच सावित्रीबाई फुले वेशभूषा, गीत गायन, एकपात्री नाटिका, नृत्य सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या मनोगतामध्ये सावित्रीबाई फुले यांचे जीवन स्त्रीशिक्षण, सामाजिक समता, सावित्रीबाईंच्या कार्याचा आदर्श घेऊन महिलांच्या आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी आधुनिक उपक्रम राबवण्याची गरज आहे असे बहुमूल्य मनोगत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. यावेळी सुरेश मनसुळे, सचिन यादव, बापू शेख, सचिन सोनकठले, निमेश गावित, रवी पवार, दिलीप ठाकूर, दयानंद थोरात, विद्यार्थी उपस्थित होते.

## मुलींनी शिक्षणाचा सदुपयोग करून घेऊन समाजाची जडणघडण करावी : सिमंता शेटगार



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.३ जानेवारी -**

सावित्रीबाईंनी समाजाचा रोष तीव्र असतानाही त्याकाळच्या परंपरागत पद्धतीला छेद देण्याचे खूप मोठे धाडस त्यांनी त्या काळी दाखवले म्हणूनच आज आपण मुली शिक्षण घेऊन समाजाच्या उन्नतीसाठी काम करत आहोत. केवळ त्यांच्या त्यागामुळे व सोसलेल्या हाल अपेष्टांचे ऋण फेडायचे असेल तर प्रत्येक मुलींनी मातांनी शिक्षणाचा सदुपयोग करून घेऊन कुटुंबासोबतच समाजाची जडणघडण करावी, असे प्रतिपादन सहशिक्षिका सिमंता शेटगार यांनी केले.

येथील श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर उमरगा येथे दि.३ जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शेटगार प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका सविता लोहार या होत्या तर ज्येष्ठ शिक्षक गोपाळ आष्टे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून शाळेतील मुलींनी सावित्रीबाई फुले यांचा वेश परिधान करून उपस्थित झाल्या होत्या. त्यांचा पेहराव उपस्थित यांचे लक्ष वेधून घेत होते.

तसेच याप्रसंगी इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतच्या अनेक मुलींनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याविषयी व समाजाच्या भल्या विषयी केलेल्या कामाबद्दल आपले सविस्तर मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाला शाळेतील सर्व विद्यार्थी शिक्षक व पालक मोठ्या संख्येने हजर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती संगीता भावसार यांनी तर आभार विवेक जाधव यांनी मानले.

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त लिट्ल फ्लॉवर्स शाळेत बालिका दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३ जानेवारी -**

पहिली महिला शिक्षिका आणि समाजसेविका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्म दिवसानिमित्त लिट्ल फ्लॉवर्स मराठी प्राथमिक शाळेत त्यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यानिमित्ताने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन शाळेच्या सर्व महिला शिक्षिका सुनिता शिंदे, वनिता कारंडे, अरुणा कुंभार, नुतन ठाकरे व माध्यमिक शाळेतील शिक्षिका शैलजा गवळी यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. त्याचबरोबर इयत्ता ७ वी व ६ वी तील विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकण्याचे कार्य केले. शाळेतील सर्व बालिकांसाठी विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमधून त्यांच्यातील कलागुणांना वाव देण्यात आला. या स्पर्धेमध्ये ३० विद्यार्थिनींनी आनंदाने सहभाग घेतला. शाळेतील महिला शिक्षिका अनिता कदम यांनी सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट विद्यार्थ्यांपुढे मांडला तसेच शाळेचे मुख्याध्यापक संजय पवार यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

## जि.प.प्रशाला नळदुर्ग येथे सावित्रीबाई फुलेंना अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.३ जानेवारी -**

जि. प. प्रशाला नळदुर्ग येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिवस बालिका दिन म्हणुन साजरा करण्यात आला.

यावेळी आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन प्रशालेचे मुख्याध्यापक इनामदार निजामोद्दीन मैनोद्दीन हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणुन नळदुर्ग येथील बालरोग तज्ञ डॉ. स्वाती शिंदे, पोलीस कॉन्स्टेबल शकीला तांबोळी, अंगणवाडी कर्मचारी किरण सोनवणे, शालेय व्यवस्थापन समिती, माता-पालक व सखी सावित्री मंच यांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य व माता भगिनी व विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कदम यांनी केले. पालकांना मार्गदर्शन प्रशालेतील शिक्षक संजय जाधव, तसनीम सय्यद, कविता पुदाले, निलोफर मैंदर्गी, शमशाद दखनी यांनी केले. यावेळी स्वाती कांबळे व डॉ. स्वाती शिंदे यांनी केले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन दुगम अरूणा यांनी केले. तर आभार अंजली कुलकर्णी यांनी मानले.

## सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात सामूहिक वाचन उपक्रम





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३ जानेवारी -**

डायरेक्टर ऑफ टेक्निकल एज्युकेशन महाराष्ट्र राज्य मुंबई व डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे यांच्या सूचनेनुसार सध्या महाविद्यालयामध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये दररोज महाविद्यालयामध्ये राबविण्यात येत आहे.

त्या अंतर्गत सर्व विद्यार्थी आणि कर्मचारी या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग घेत आहेत. त्या अनुषंगाने सध्या महाविद्यालयामध्ये वेगवेगळ्या ऍक्टिव्हिटी राबविल्या जातात. याचाच एक भाग म्हणून सावित्रीबाई फुले यांची जयंती वाचन दिवस म्हणून साजरा करण्यात आली. यावेळी ग्रंथालयामध्ये घेण्यात आलेल्या या उपक्रमामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांच्या हस्ते प्रथम सावित्रीबाई यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी सावित्रीबाई फुले यांच्यावर आलेल्या विविध वर्तमानपत्रांमधील लेखावरील संकलन करून त्याचे विद्यार्थ्यांनी सामूहिक वाचन केले. व सावित्रीबाई फुले यांचा इतिहास समजून घेण्याचा प्रयत्न केला. लोकतसेच विद्यार्थ्यांनी वाचन केलेल्या सर्व लेखाचे रसग्रहण करून थोडक्यात सारांश मांडला. यावेळी कार्यक्रम समन्वयक प्रा. सुनीता गुंजाळ, डॉ. उषा वडणे, प्रा. वर्षा पाटील, सविता नलावडे, सूक्ष्मा टेकाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या सामूहिक वाचनामुळे व सध्या महाविद्यालयात चालू असलेल्या उपक्रमामुळे वाचनाची गोडी लागली असून भविष्यात वाचन करणे खूप गरजेचे असल्याचे विद्यार्थ्यांनी प्रतिक्रियेत नमूद केले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी उपस्थित होते.

## खामसवाडीची रुधिरा शेळके अॅबकस परीक्षेत राज्यात टॉपर; नऊ विद्यार्थी प्राविण्याने उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.३ जानेवारी -**

खामसवाडीच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या दहा विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पातळीवरील अब्याकस परीक्षेत विशेष प्राविण्य मिळविले आहे तर रुधिरा गोपाळ शेळके ही राज्यातून या परीक्षेत बी वन श्रेणीत पहिली आली आहे.

तिसरी व चौथी या वर्गासाठी राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर या परीक्षा घेण्यात येतात. विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे महत्व कळावे टॅलेन्ट यावे यासाठी या परिक्षेचे आयोजन करण्यात येते. सदरील परीक्षेसाठी राज्यातून पंधरा हजार विद्यार्थी बसलेले होते.

प्रत्येक्षात अकरा हजार विद्यार्थ्यांनी हि परीक्षा दिली होती. या परीक्षेतील पाच हजार विद्यार्थ्यांतुन रुधिरा गोपाळ शेळके बिवन श्रेणीतून राज्यातून प्रथम आली आहे. तर राधिका जोशी, श्रेया ढोईफोडे, यशश्री हिलकुटे, वेदिका जोशी,आईशा शेख, वैष्णवी भन्साळी,रमेश तापडे, शौर्य पाटील, चैतन्य जोशी, अनुश्री लातुरे, आदित्य लातुरे, ज्ञानेश्वरी शेवते हे विद्यार्थी विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झाले आहेत. रुधिरा शेळके ही गोपाळ शेळके यांची मुलगी असुन सर्वच स्तरातून तिचे कौतुक होत आहे.

रुधिरासह सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक शिवराज बाकले, शिक्षक विक्रम मुंडे, अनंत बाबर, पंकज मोरे, नागनाथ शेळके, तुकाराम कराळे, अनंत मडके रोहिणी माने, पूनम लोखंडे यांनी सत्कार केला.

## फुले जयंतीनिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.३ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्यावतीने थोर समाजसुधारक, स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करुन विविध क्षेत्रातील मान्यवर व महिला मुक्ती दिनानिमित्त विविध क्षेत्रातील महिलांचा सत्कार करण्यात आला.

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त भाजपा कार्यालयात अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३ जानेवारी -**

स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रणेत्या, पहिल्या महिला शिक्षिका, प्रतिभासंपन्न कवयित्री, समाजसुधारणेसाठी संपूर्ण आयुष्य वेचलेल्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त भाजपा नेते मा. आ. सुजितसिंह ठाकूर यांनी भाजपा संपर्क कार्यालय, परंडा येथे स्मृतीस विनम्र अभिवादन केले.

यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य अॅड. झहीर चौधरी, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अरविंद रगडे, युवा मोर्चा जिल्हा चिटणीस रामकृष्ण घोडके, जेष्ठ नेते शहाजी पाटील, जयंत सायकर, धनंजय काळे, गौरव पाटील, सुरज काळे, मनोहर पवार, महिला शहराध्यक्षा ज्योती भातलवंडे, शुभदा शेलार तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खामसवाडीत क्रांतीज्योती सावित्रीबाई यांना ठिक-ठिकाणी अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.३ जानेवारी -**

स्त्री शिक्षणाच्या जनक जगातील पहिल्या शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त खामसवाडीत अभिवादन करण्यात आले.

सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिन म्हणूनही साजरी केली जाते. खामसवाडीतील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जगदंबा माध्यमिक शाळा,अभिनव विद्यामंदिर, सिद्धिविनायक बँक, प्रियदर्शनी वाचनालय, नेहरू युवा मंडळ सामाजिक संस्था, ग्रामपंचायत कार्यालय आदी ठिकाणी अभिवादन करण्यात आले. अनेक लहान चिमुकल्या विद्यार्थिनींनी सावित्रीबाई यांचा वेष परिधान केलेला पहायला मिळाला. जिल्हा परिषद माध्यमिक व जगदंबा माध्यमिक मध्ये सावित्रीबाई यांना अभिवादन करून मुलींची भाषणे झाली. स्त्रीशिक्षणाचे महत्व विद्यार्थ्यांनी स्पष्ट केले.

अब्याकस परीक्षेत राज्यातून पहिली आलेली मधुरा गोपाळ शेळके हिचा अन्य विद्यर्थिनींचा शाळेत, ग्रामपंचायतमध्ये, सिद्धिविनायक बँकेत विशेष सत्कार करण्यात आला.

## ज्ञानज्योति सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.३ जानेवारी -**

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्सव समिती व सावित्रीबाई फुले सखी मंच लोहारा यांच्या वतीने लोहारा शहरातील माळी कॉम्पलेक्स शिवनगर येथे ज्ञानज्योति सावित्रीबाई फुले यांची १९४ वी जयंती दि.३ जानेवारी रोजी साजरी करण्यात आली.

यावेळी ज्ञानज्योति सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन ज्ञानज्योति महिला सहकारी पतसंस्था धाराशिव तथा युवती सेना मराठवाडा प्रमुख अॅड. आकांक्षा ज्ञानराज चौगुले यांच्या हस्ते करुन अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जि.प. सदस्या तथा ज्ञानज्योति महिला सहकारी पतसंस्था सचिव मिराताई अविनाश माळी (लोहारा) होत्या. तर प्रमुख म्हणुन नगराध्यक्षा वैशाली अभिमान खराडे, राजेंद्र माळी, अविनाश माळी, उपनगराध्यक्ष आयुब हबीब शेख, अभिमान खराडे, शामल माळी, सुमन दिपक रोडगे, शमाबी शेख, आरती कोरे, सुनंदा क्षीरसागर, दिपक रोडगे, इंद्रजित लोमटे, श्रीनिवास माळी, आयुब अब्दुल शेख, इकबाल मुल्ला, श्रीकांत भरारे, के. डी. पाटील, हरी लोखंडे, राजेंद्र माळी, अंकुश नारायणकर, राम क्षीरसागर, शहाजी जाधव, अमोल माळी, संतोष माळी, ज्ञानेश्वर क्षीरसागर, संजय दरेकर, सचिन करे, नंदिनी अणदुरकर, समृध्दी क्षीरसागर, सई क्षीरसागर, शोएब शेख, रोहन खराडे, यांच्यासह महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जाहिर प्रगटन
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार उमरगा यांचे कार्यालय**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/दंडणीय/कावि-** **दिनाक ०१/१०/२०२४**

समस्त गावकरी मौजे मुरुम ता. उमरगा जिल्हा धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात श्री/अशोक कृष्णप्पा धनशेट्टी रा. मुरुम ता. उमरगा जि.धाराशिव यांनी जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नाव जान्हवी रेवाप्पा राऊत.

सदरील व्यक्तीचा मौजे मुरुम ता. उमरगा या ठिकाणी दि. ०४/०४/२०१७ या दिवशी जन्म झाला असून प्रमाणपत्र मिळणे संबंधी सदरील कार्यालयात दिनांक ११/०६/२०२४ या रोजी अर्ज केला आहे.

वरील जन्म-मृत्यू बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा. आक्षेप मुदतीनंतर च्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित /-**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार उमरगा**

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बस व स्कूल व्हॅनचा अपघात; तीन विद्यार्थी जखमी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ जानेवारी-**
नागपूर-रत्नागिरी महामार्गावर लातूर तालुक्यातील भातखेडा शिवारात सकाळी सात वाजण्याच्या सुमारास महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची बस आणि स्कूल व्हॅन यांचा दाट धुके असल्याने वाहनांचा अंदाज न आल्याने अपघात झाला. यात स्कूल व्हॅनमधील तीन विद्यार्थी किरकोळ जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

गुरुवारी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास एमएच-२४-एयू-७७३१ या क्रमांकाची लातूर ते उदगीर जाणारी एस. टी. बस आणि एमएच-२४-एएस-०७३७ या क्रमांकाची स्कूल व्हॅन यांच्यात समोरासमोर अपघात झाला. सकाळी धुके असल्यामुळे हा अपघात झाल्याचे सांगण्यात आले आहे. या अपघातात तीन विद्यार्थी किरकोळ जखमी झाले आहेत. घटनेनंतर सुमारे दोन तास वाहतूक खोळंबली होती.

सदर घटना घडल्याचे लक्षात येताच काही महिला व उपस्थितांनी तत्काळ पोलिसांशी संपर्क साधला.



लातूर ग्रामीण ठाण्याचे पोलीस अधिकारी व कर्मचारी तत्काळ घटनास्थळी पोहोचले व जखमींना लातूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती ठीक असल्याचे सांगण्यात येत आहे. एका विद्यार्थ्याच्या उजव्या डोळ्याच्या शेजारी थोडीशी जखम झाली आहे.

हे विद्यार्थी लातूर येथील कृपा सदन शाळेसाठी गावातून निघाले होते. स्कूल व्हॅनमध्ये भातखेडा येथील तीनच विद्यार्थी होते. स्कूल व्हॅनही भातखेडा येथीलच असल्याचे सांगण्यात आले आहे.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


## संक्षिप्त वृत्त...

### वाचन संस्कृती वाढीसाठी प्रयत्न करावे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जानेवारी -**
जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा हरंगुळ ( बु.) येथे शिक्षण परिषद केंद्रीय शाळा हरंगुळ (बु.) येथे संपन्न झाली. या शिक्षण परिषदेस हरंगुळचे माजी सरपंच तथा व्यंकटराव पनाळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना व्यंकटराव पनाळे यांनी, विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती निर्माण करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाशिवाय अन्य साहित्य वाचण्याविषयीची गोडी निर्माण करून वाचन संस्कृती वाढीसाठी प्रयत्न करावे असे आवाहन केले. तसेच केंद्रांतर्गत असलेल्या सर्व शाळांना विद्यार्थ्यांमध्ये वाचन चळवळ निर्माण करण्यासाठी लागणारी पुस्तके व ग्रंथसंपदा उपलब्ध करून देऊ असेही सांगितले. या शिक्षण परिषदेचे अध्यक्ष म्हणून हरंगुळ केंद्राचे केंद्रप्रमुख गोरखनाथ लोखंडे हे उपस्थित होते.

### राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचे लातूर येथे स्वागत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जानेवारी -**
राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे हे आज लातूर दौऱ्यावर आहेत. सकाळी त्यांचे लातूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन झाले. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधिक्षक सोमय मुंडे यांनी यावेळी त्यांचे स्वागत केले.
प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता देवेंद्र निळकंठ, तहसीलदार सौदागर तांदळे, लातूर शहर महानगरपालिका सहायक आयुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यावेळी उपस्थित होते.

### राष्ट्रीय सफाई आयोगांचे सदस्य लातूर दौऱ्यावर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जानेवारी -**
राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ. पी. पी. वावा हे ६ व ७ जानेवारी २०२५ रोजी लातूर दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. डॉ. पी. पी. वावा यांचे ६ जानेवारी रोजी सायंकाळी ६:३० वाजता धाराशिव येथून लातूरला आगमन होईल व मुक्काम. ७ जानेवारी रोजी दुपारी १२ वाजता त्यांच्या उपस्थितीत महानगरपालिका आयुक्त, नगरपरिषद व नगरपंचायतींचे मुख्याधिकारी यांची बैठक होईल. दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, गट विकास अधिकारी, शिक्षणाधिकारी, जिल्हा कामगार अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा अग्रणी बँक प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत बैठक घेतील. सायंकाळी ५ वाजता मोटारीने बीडकडे प्रयाण करतील.

### डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत 'श्रीकिशन' यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जानेवारी -**
येथील अभिनव मानव विकास संस्था द्वारा संचलित श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत नेत्रदीपक यश संपादन केले आहे. या परीक्षेला विद्यालयातील एकूण ५५ विद्यार्थी बसले होते. त्यामध्ये ३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यापैकी ९ विद्यार्थी दुसऱ्या स्तरावरील प्रात्यक्षिक परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत.
डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेस विद्यालयातील सहावीच्या वर्गातील २३ तर इयत्ता नववीचे ३२ विद्यार्थी बसले होते. त्यात सहावीचे ११ तर नववीचे २१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तर सहावीमधील विद्यार्थी माऊली महेश जगळपुरे आणि इयत्ता नववीचे अथर्व संतोष मरे , अथर्व राजाराम कात्रे, आदित्य अभिजित हेबारे , यशराज सचिन बिरादार, प्रणव मिलिंद अंचुले , समर्थ कल्याण गिरवलकर, अलोक विठ्ठल पिनाटे व प्रज्वल ईश्वरप्रसाद अजमेरा हे आठ असे एकूण नऊ विद्यार्थी दुसऱ्या स्तरावरील प्रात्यक्षिक परीक्षेसाठी पात्र ठरले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना सौ. सुरेखा भोसले, मधुकर काळे यांनी मार्गदर्शन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, कोषाध्यक्ष जयेश बजाज, अतुल देऊळगावकर यांसह सर्व पदाधिकारी, रमाकांत स्वामी, गिरीश कुलकर्णी, राहुल पांचाळ आदिंनी अभिनंदन केले आहे.

## भाजपाचे सदस्य नोंदणी अभियान यशस्वी करा : आ. कराड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ जानेवारी-**
संपूर्ण राज्यात भाजपा सदस्यता अभियान सुरू झाले असून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात पक्षश्रेष्ठीने दिलेल्या उद्दिष्टाहून अधिक सदस्यांची नोंदणी करून प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी हे अभियान यशस्वी करावे असे आवाहन लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आ. रमेश कराड यांनी केले आहे.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्र राज्यात सदस्यता अभियान राबवले जात असून हे अभियान लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात यशस्वी करण्यासाठी मतदार संघातील प्रमुख पदाधिकारी, शक्ती केंद्रप्रमुख आणि बूथ प्रमुखांची व्यापक बैठक आ. कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर येथील भाजपा संवाद कार्यालयात शुक्रवारी दुपारी झाली. यावेळी किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रम शिंदे, पंचायतराज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, रेणापूर तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, बन्सी भिसे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

सर्वाधिक सदस्य असलेला जगातील एकमेव भारतीय जनता पार्टी हा राजकीय पक्ष असून या पक्षाचे नेते देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या नेतृत्वात लाखो कार्यकर्ते कार्यरत आहेत असे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, भाजपा राष्ट्रीय पक्षश्रेष्ठनी यावेळी देशभरात २१ कोटी सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट ठेवले आहे त्यानुसार प्रत्येक विधानसभा मतदार संघात ६० हजार सदस्य करण्याचे ध्येय निश्चित करण्यात आले आहे.

निवडणुकीत भाजपा यश अपयश निकाल काहीही लागला तरी दुसऱ्या दिवसापासून पक्ष कायम कामात आहे लातूर ग्रामीण मतदार संघात भाजपाचा विजय होईल हे कोणालाही शक्य वाटत नव्हते मात्र कार्यकर्त्यांच्या मेहनतीतून हे शक्य झाले पंधरा वर्षाच्या संघर्षाला आणि मेहनतीला फळ आले असे सांगून येणारा काळ हा कार्यकर्त्यांच्या निवडणुकीचा काळ आहे जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपंचायत, ग्रामपंचायत, सोसाट्या या निवडणुकीत



भाजपाच्या कार्यकर्त्याला यश मिळाले पाहिजे यासाठी सदस्यता नोंदणी अभियान महत्त्वपूर्ण असल्याचे बोलून दाखविले.

मतदारसंघातील भाजपाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी शक्ती केंद्र प्रमुख आणि बूथ प्रमुख यांनी सदस्यता नोंदणी अभियानात जातीने लक्ष घालून सर्वांना सोबत घेऊन प्रत्येक बूथवर घरोघरी जाऊन किमान दोनशे भाजपाचे सदस्य करावेत आणि पक्षश्रेष्ठीने दिलेल्या उद्दिष्टाहून अधिक किमान ७५ हजार भाजपा सदस्य लातूर ग्रामीण मतदार संघातून झाले पाहिजेत यासाठी सर्वांनी मेहनत घ्यावी अशी सूचना आ. रमेशआप्पा कराड यांनी यावेळी बोलताना केली.

प्रारंभी दशरथ सरवदे यांनी बैठकीचे प्रास्ताविक केले. भाजपा सदस्य नोंदणी अभियान लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात यशस्वी व्हावे यासाठी लातूर आणि रेणापूर या दोन्ही तालुक्यांसाठी स्वतंत्रपणे अभियान समिती नियुक्त करण्यात आली आहे.

## मॅथ मॉडेल मेकिंग स्पर्धेत ओजसचे यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जानेवारी -**
मॅथ मॉडेल मेकिंग स्पर्धेत संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कूलमधील ओजस पलंगे याने यश मिळविले आहे. त्याबद्दल त्याचा रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.
नांदेडच्या स्वारातीम विद्यापीठ व दयानंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मॅथ मॉडेल मेकिंग स्पर्धा घेण्यात आली. त्यात जिल्ह्यातून ३१ मॉडेलसह ५८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. त्यात संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कूलच्या इयत्ता नववीतील ओजस किरण पलंगे याने सहभाग घेत गणितशास्त्रीय प्रतिकृतीचे मॉडेल तयार केले होते. त्यास प्रथम क्रमांक मिळाला. त्यानंतर नांदेड येथे पार पडलेल्या विभागीय स्पर्धेत ओजस पलंगे याने प्रथम क्रमांक मिळविला. त्याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला.

या यशाबद्दल ओजस पलंगे व मार्गदर्शक गणित शिक्षक अविनाश जाधव यांचे कौतुक शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. पी.आर. देशमुख, सचिव प्रा. अनिरुद्ध जाधव, सहसचिव गोपाळ शिंदे, ॲड. सुनील सोनवणे, विद्यालयाचे संचालक बी.ए. मैंदर्गे, प्राचार्या वीणा कोपकर, उपप्राचार्य राजेंद्र ढिवरे, स्मिता साळुंके आदींनी केले.

## वाहतुकीस अडथळा; ऑटोचालकावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जानेवारी -**
एका ऑटो चालकाने रस्त्यावर वाहन उभे करुन स्वतःच्या आणि इतरांच्या जीवितास धोका निर्माण होईल, अशी स्थिती निर्माण केल्याचे आढळून आले. याप्रकरणी शिवाजी नगर पोलिस ठाण्यात बुधवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरातील शिवाजी नगर पोलिस ठाण्यासमोर ऑटो चालकाने आपल्या ताब्यातील वाहन सार्वजनिक रस्त्यावर उभे केले होते. त्यामुळे स्वतःच्या आणि इतरांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचे आढळून आले. याप्रकरणी पोशि. काकासाहेब बोचरे यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलिसांत बुधवारी गुन्हा दाखल आहे.

## आ. देशमुखांनी स्विकारली नागरिकांची निवेदने



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जानेवारी -**
राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी गुरुवार दि. २ जानेवारी रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संघटना संस्थांचे पदाधिकारी, नागरिक यांची भेट घेऊन त्यांच्या समस्या अडचणी समजून घेतल्या, तसेच त्यांच्या निवेदनाचा, निमंत्रणाचा स्वीकार करून संबंधितांना तात्काळ पुढील आवश्यक
कार्यवाहीसाठी सूचना केल्या.

यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबन भोसले, विठ्ठल पावडे, प्रा. प्रवीण कांबळे, संजय निलेगावकर, गोविंद देशमुख, सिकंदर पटेल, तानाजी फुटाणे, चंद्रशेखर दंडिमे, डॉ.उमेश कानडे, चंद्रकांत मद्दे, अनिल चव्हाण, विकास महाजन, गणेश एसआर देशमुख, प्रवीण सूर्यवंशी, युसुफ शेख, मयूर चव्हाण, धनंजय देशमुख, पप्पू देशमुख, रमाकांत सलगरे, राजेंद्र वडगावे, मनोहर पटेल, विजय फेसगाळे, तबरेज तांबोळी, विपिन अग्रवाल, विष्णुदास धायगुडे, नागसेन कामेगावकर, सायरा पठाण, अभिमान भोळे आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते नागरिक उपस्थित होते.

## कातपूर येथे सिमेंट रस्ता व नाली बांधकामाला सुरुवात



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जानेवारी -**
आ. अमित देशमुख यांनी तांडे, वाडीवस्ती येथे राहणारा समाज गरीब असतो, हा समाज स्थिर व्हावा याकरीता ते राहत असलेल्या भागात प्राथमिक आणि मुलभुत सोयीसुवीधा उभारण्यास नेहमीच प्राधान्य दिले आहे.

या अनुषंगानेच मौजे कातपूर येथील पदाधिकारी आणि नागरीकांच्या मागणी प्रमाणे तांडा सुधार योजना अंतर्गत सिमेंट रस्ता व सिमेंट नाली बांधकाम करण्यासाठी ४ लाख रुपये निधी मंजूर होण्यासाठी त्यांनी शिफारस केली होती. कातपूर येथे या कामासाठी निधी उपलब्ध झाला असून सदरील काम सुरू झाले आहे.

लातूर तालुक्यातील कातपूर येथे तांडा सुधार योजना अंतर्गत ४ लाख रुपये निधी मंजूर झाला आहे. या निधीतून सिमेंट रस्ता व सिमेंट नाली बांधकाम कामास सुरूवात झाली आहे. यावेळी लातूर कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक शिवाजीराव देशमुख, उपसरपंच विष्णू (मनोज) बालासाहेब देशमुख, सुधीर देशमुख, शेषेराव देवकते, महादेव मस्के, ज्ञानोबा भोकरे, पांडुरंग मस्के, वाल्मिक बोयणे, दिलीप पाटील, गोविंद आयतनबोयणे, शत्रुघ्न आयतनबोयणे, अरविंद कांबळे, विश्वकर्मा पांचाळ उपस्थित होते.

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घ्यावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जानेवारी -**
येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी भारतातील पहिल्या महिला शिक्षिका,मुख्याध्यापिका, स्त्री उद्धारक, समाजसुधारक,स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या,समस्त स्त्रियांना उजेडाची वाट दाखवणाऱ्या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सर्वांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घ्यावा यासाठी बालिका दिन,महिला मुक्तिदिन व जयंतीच्याही शुभेच्छा दिल्या. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.

## विलास साखर कारखाना देणार अंतिम ऊस दर ३ हजार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जानेवारी -**
निवळी येथील विलास सहकारी साखर कारखाना यूनिट १ ने चालू हंगामात गाळपास आलेल्या उसाला पहिल्या हप्त्यापोटी २७०० रुपये प्रति मे. टनांप्रमाणे रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली आहे. अंतिम ऊस दर किमान ३ हजार रुपये प्रति मे. टन राहणार आहे, अशी माहिती मांजरा परिवाराने दिली.

लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रेरणेने, माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे मार्गदर्शन व कारखान्याचे संस्थापक, आ. अमित देशमुख, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन धीरज देशमुख, कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई देशमुख यांचे नेतृत्वाखाली विलास सहकारी साखर कारखान्याची यशस्वी वाटचाल सुरू आहे.

यंदाच्या हंगामात ३१ डिसेंबरअखेर १ लाख ७१ हजार ८४० मे. टन उसाचे गाळप केले असून दैनंदिन साखर उतारा १२.३६ टक्के व सरासरी साखर उतारा ११.२५ टक्के आहे. १ लाख ७६ हजार ५१० क्विंटल शुभ्र दाणेदार साखरेचे उत्पादन झाले आहे. चालू हंगामात कारखाना कार्यक्षेत्रातील उसाचे प्राधान्याने गाळप करण्यात येत आहे, अशी माहिती कारखान्याचे व्हा. चेअरमन रवींद्र काळे व कार्यकारी संचालक संजीव देसाई यांनी दिली आहे.

विलास कारखान्याने नेहमीच ऊस उत्पादकांच्या कल्याणासाठी कार्य केले आहे. चालू हंगामातही विलास साखर कारखाना सर्वोत्तम ऊस दर देण्याची परंपरा कायम राखणार आहे असल्याचेही देसाई यांनी सांगीतले.

## देशी व पारंपारिक वाणांचा अवलंब करावा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जानेवारी -**
राष्ट्रीय कृषि विकास योजना पुरस्कृत वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, लातूर येथील शाश्वत कृषि विकासासाठी मॉडेल जीनोम क्लब या प्रकल्पांतर्गत देशी/गावरान वाणांचे व जैवविविधतेचे संवर्धन ई. करिता उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी आणि बचत गटांना दिनांक २ जानेवारी, २०२५ रोजी वर्ष २०२३-२४ व २०२४-२५ करिता जिनोम सेव्हीअर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे कुलगुरू मा. डॉ. इंद्र मणि, संचालक शिक्षण डॉ. भगवान आसेवार व संचालक संशोधन डॉ. खिजर बेग यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे, प्रकल्प समन्वयक डॉ.राहुल चव्हाण, सहसमन्वयक डॉ. योगेश भगत व डॉ. विद्या हिंगे यांनी केले. याप्रसंगी, कृषि अधिकारी श्री. दिलीप राऊत, कृषि विज्ञान केंद्र समन्वयक डॉ. सचिन दिग्रसे, प्रगतशील शेतकरी श्री. प्रभाकर नागरगोजे, श्री. अशोक चिंते, इंजी. सुधीर सोळंके, कृषि महाविद्यालय, कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, गळीतधान्य संशोधन केंद्र येथील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थिनी-विद्यार्थी मोठ्या संख्यने सहभागी झाले होते.

मा. कुलगुरू यांनी अध्यक्षीय भाषणात कृषि जैवविविधता जागरूकता व संगोपन या उल्लेखनीय कार्य करत असलेल्या कार्याबद्दल गौरवद्गार काढले. तसेच या क्षेत्रात कार्य करित असलेल्या शेतकरी, बचत गट यांची प्रशंसा करून प्रोत्साहित केले. नामशेष व दुर्मिळ होत चाललेल्या देशी व पारंपारिक वाणांचे संकलन, विश्लेषण, संगोपन व व्यापारीकरण करणे या चतु:सुत्री पद्धतीचा अवलंब करून जैवविविधता ऱ्हास थांबवून दीर्घकालीन शाश्वत कृषि विकासासाठी या पद्धतीचा अवलंब करावा असे मोलाचे मार्गदर्शन केले यावेळी अनेकांची उपस्थिती होती.

## राजमाता जिजामाता संकुलात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जानेवारी -**
येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता विद्यालय, तुळजाभवानी विद्यालय, संगमेश्वर विद्यालय व राजमाता जिजामाता बी. एड. महाविद्यालयात जयंतीनिमित्त क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून शुक्रवारी महिला शिक्षिकादिन साजरा करण्यात आला.

अध्यक्षस्थानी संकुलाच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये होत्या. यावेळी प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे व वैशाली केंद्रे, संस्थेच्या सदस्य स्वाती घुले, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजीव मुंढे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या निमित्त संकुलातील इयत्ता ५ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांच्या घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण



करण्यात आले.

यावेळी प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले, महात्मा फुले व सावित्रीबाईंनी १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली. बालविवाह, सती, केशवपन अशा कित्येक कुप्रथांना सावित्रीबाईंनी विरोध केला.

त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण प्रसार व समाज सुधारणेच्या कामात व्यतीत केले, असे त्यांनी सांगितले. यावेळी शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते, विष्णू कराड यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्राचार्य केंद्रे यांच्यासह इतरांनी सावित्रीबाईंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

CMYK

लातूर
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## वैष्णवी श्रीकांत पाटील हिची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३ जानेवारी -**

युवक व क्रीडा सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय पीपीटी चॅलेंज स्पर्धेतून शिवाजी महाविद्यालय, उदगीरच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाची विद्यार्थीनी वैष्णवी श्रीकांत पाटील हिची केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण मंत्रालयाच्या वतीने विकसित भारत यंग लीडरर्स डायलॉग २०२५ अंतर्गत दिल्ली येथे होणाऱ्या केंद्रीय युवक महोत्सवांतर्गत राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या राष्ट्रीय महोत्सवामध्ये ती महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे. स्त्री सबलीकरण या विषयावर महाराष्ट्रातील ज्या तीन विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. त्यामध्ये वैष्णवीचा समावेश असून मराठवाड्यातून निवड झालेली ती एकमेव आहे. वैष्णवीच्या या यशाबद्दल किसान शिक्षण प्रसारक मंडळ व शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने तिचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी श्रीरंगराव पाटील, पांडुरंग शिंदे, हिरागीर गिरी, गुंडेराव पाटील, रामराव एकंबे, प्राचार्य डॉ. मांजरे आदि उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### लातूर कॉलेज ऑफ फार्मसीत सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**औसा, दि.३ जानेवारी -**

भारतातील पहिल्या शिक्षिका, मुख्याध्यापिका, स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या विद्येची जननी व समस्त स्त्रियांना उजेडाची वाट दाखवणाऱ्या क्रांतीसुर्य ज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, संचालक नंदकिशोर बावगे, माधुरी बावगे, प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला, प्राचार्या योगिता बावगे, प्राचार्य संतोष मेदगे, प्रा. अतुल कदम, प्रा. राजशेखर चौधरी, प्रा. माधुरी पोळकर, प्रा. शुभम वैरागकर आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.



### शिवाजी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**उदगीर, दि.३ जानेवारी -**

शिवाजी महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी केली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.एम. मांजरे होते. त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन केले. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाशझोत टाकताना डॉ. मांजरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी डॉ.व्ही.के. भालेराव, डॉ.एस.डी. सावंत, डॉ.ए.एच. पाटील, प्रबंधक बी.के.पाटील, व्ही.डी. गुरनाळे, आर.एम. लाडके, देवनाळे, शेडोळे, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ.डी.बी. मुळे यांनी तर आभार डॉ.ए.एस. टेकाळे यांनी मानले.



### दैठणा येथे अंगणवाडीत सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**शिरूर अनंतपाळ, दि.३ जानेवारी -**

दैठणा (ता. शिरूर अनंतपाळ) येथे अंगणवाडी क्र.२ मध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती बालिका दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी अंगणवाडी क्रमांक दोन मधील शिक्षिका म्हणून जयश्री बिरादार व सहाय्यक मदतनीस संगीता शिंदे आणि सुरेखा पाटील यांच्याकडून उपस्थिती लावण्यात आली. यावेळी जयश्री बिरादार यांनी या दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.

### लातूर-धाराशिव सीमेवर पारंपरिक वेशभूषेत पदयात्रेचे स्वागत...

# आ. अभिमन्यू पवारांची पदयात्रा धाराशिव जिल्ह्यात दाखल

### वॉटर ग्रीड प्रकल्प पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी केला होता नवस...

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.३ जानेवारी -**

मराठवाड्याचा सर्वात महत्त्वाचा प्रोजेक्ट म्हणून मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाकडे पाहिले जाते. हा प्रकल्प पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस असावेत. अशी माझी इच्छा होती. यामुळे आई तुळजाभवानीला मी नवस केला होता. याचबरोबर महाराष्ट्राच्या कल्याणासाठी पुन्हा देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले आणि माझा नवस पूर्ण झाला. म्हणून मी नवसाची पुर्तता करण्यासाठी पायी औसा ते तुळजापूर जात आहे.अशी स्पष्टोक्ती आ. अभिमन्यू पवार यांनी दोन जिल्ह्याच्या सिमेवर उजनी येथे पारंपरिक वेशभुषेत गावकऱ्यांनी पदयात्रेचे स्वागत केले. त्यावेळी ते बोलत होते.



आमदार अभिमन्यू पवार यांची तीन दिवशीय पदयात्रा गुरुवार दि.२ रोजी धाराशिव जिल्ह्यात दाखल झाली. लातूर-धाराशिव जिल्ह्याच्या सिमेवर असलेल्या उजनी येथे ग्रामस्थांनी पारंपारिक वेशभूषेत पदयात्रेचे स्वागत केले. तर धाराशिव जिल्ह्यात अनेक ठिकाणी आमदार अभिमन्यू पवारांचे हार पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले आहे. पदयात्रा गुरूवारी ताकविकी येथील तुळजाभवानी अन्नछत्र येथे थांबून शुक्रवारी सकाळी तुळजापूर च्या दिशेने रवाना होणार आहे. राज्यात महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर यावे व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व्हावे यासाठी आमदार अभिमन्यू पवारांनी नवस बोलला होता. तो पुर्ण झाल्याने आमदार अभिमन्यू पवार यांच्यासोबत शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह बुधवारी सकाळी औसा येथून पदयात्रेला रवाना झाले आहेत. गुरुवारी सकाळी पदयात्रा धाराशिव जिल्ह्यात दाखल झाली आहे. यावेळी धाराशिव जिल्ह्यात पदयात्रेचे स्वागतासाठी ठिकठिकाणी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शुक्रवारी सकाळी पदयात्रा तुळजापूरच्या दिशेने निघाली असून दुपारी ३ वा. नंतर पदयात्रा तुळजापूर मध्ये दाखल झाली.

या पदयात्रेत आमदार अभिमन्यू पवार यांच्यासह भाजपाचे तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता,बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोनवणे, उपसभापती प्रा. भिमाशंकर राचट्टे, ॲड. परिक्षीत अभिमन्यू पवार, कासारसिरसी मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर वाकडे, औसा शहर अध्यक्ष सुनिल उटगे, ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष प्रा. सुधीर पोतदार, बाजार समितीचे संचालक युवराज बिराजदार, प्रवीण कोपरकर, विष्णू कोळी, प्रदेश कार्यकारिणी सदस्यपदी रविशंकर केंद्रे, भाजप युवा मोर्चाचे प्रदेश सचिव दत्ता चेवले, गिरीराज सोमाणी, प्रा. शिव मुरगे, लहू कांबळे, बंकट पाटील, अक्रम खान, बालाजी निकम, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष नितीन कवठाळे, सचिन आनसरवाडे आदीसह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

> **सिंचन, औद्योगिक विकास साधणार...**
> औसा मतदार संघात सिंचनक्षेत्रात वाढ करुन औद्योगिक विकासातून रोजगार निर्मिती करणार आहे.य ामध्ये अनेक कामे पुर्ण झाली आहेत. उर्वरीत या पाच वर्षात पुर्ण करणार असल्याचा विश्वास आ. अभिमन्यू पवार यांनी पदयात्रे दरम्यान व्यक्त केला.

## शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीबाबत माने यांची पदाधिकाऱ्यांशी चर्चा



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.३ जानेवारी -**

शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांनी शुक्रवार दि.३ जानेवारी रोजी निलंगा येथे लातूर जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक घेऊन शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणी बाबत शिवसेना पक्ष पदाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली.

याप्रसंगी जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांनी लातूर जिल्ह्यातील निलंगा, देवणी, शिरूर अनंतपाळ व औसा या तालुक्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावून या बैठकीमध्ये संघटनात्मक बांधणी येणाऱ्या सर्व निवडणुका सध्याची राजकीय परिस्थिती यासंदर्भात सविस्तर असा आढावा घेऊन मार्गदर्शन केले.

येणाऱ्या निवडणुकीसाठी सर्व पदाधिकाऱ्याने तत्पर राहावे तसेच गाव तिथे शाखा सर्व पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या सर्व अंगीकृत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन शिवसेना मजबूत करावे, असे आव्हान शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांनी केले.

यावेळी माने म्हणाले की शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना केलेली कामे हेच खऱ्या अर्थाने आपल्यासाठी मोठी शिदोरी असून जनमाणसात पक्षाची प्रतिमा उंचावण्याची योग्य वेळ आलेली आहे आणि पुन्हा शिवसेनेचे ताकद वाढवून एकनाथ शिंदे यांचे हात बळकट करण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी काम ला लागावे अशा सूचना केल्या.

यावेळी युवा सेना जिल्हाप्रमुख युवराज वंजारे, उपजिल्हाप्रमुख सुधीर पाटील, महिला आघाडी जिल्हाप्रमुख अर्चनाताई बिरादार, शिरूर आनंदपाल तालुकाप्रमुख विकास शिंदे, देवणी तालुकाप्रमुख धनंजय बिरादार, निलंगा तालुका प्रमुख भगवान जाधव, महिला आघाडी तालुकाप्रमुख विधीज्ञ शिंदे तसेच शिवसेनेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## श्रीराम विद्यालयात नेहरू युवा केंद्रातर्फे तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धा



**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.३ जानेवारी -**

श्रीराम विद्यालय रेणापूर येथे आज दि. जाने रोजी नेहरू युवा केंद्र लातूर तर्फे कबड्डी, खो-खो, धावणे, गोळाफेक इ. स्पर्धाचे तालूका स्तरावर आयोजन करण्यात आले होते. जिल्हा युवा अधिकारी साक्षी समैया. लेखपाल संजय ममदापूर यांच्या मार्गदर्शना खाली या कार्यक्रम ाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून प्राचार्य सिध्देश्वर मामडगे. तर प्रमूख अतिथी म्हणून श्रीराम प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सतिष मोरे, पर्यवेक्षक अनिल कुटवाड, प्रा. भरत धायगुडे, क्रिडाविभागप्रमूख विवेक भातीकरे, सांस्कृतिक विभागप्रमूख अमृतेश्वर स्वामी, प्रा.एल.आर. शेवाळेख प्रा. चंद्रशेखर मोटे, तालुका समन्वयक अविनाश दुमपल्ले यांची उपस्थिती होती.

धावणे (मुली) स्पर्धेत प्रथम सोनिया पांचाळ, द्वितीय भक्ती येमले, तृतीय मानवी पांचाळ. धावणे मुले प्रथम रमन पांचळ, द्वितीय पवन मदने, तृतीय आरुष झुल्फे. गोळाफेक स्पर्धेत मुली प्रथम गायत्री राजे, द्वितीय अमृता निकम, तृतीय सोनिया पांचाळ. गोळाफेक (मुले) प्रथम उमर शेख, द्वितीय रमन पांचाळ, तृतीय अखिलेश काळे. कबडी प्रथम श्रीराम विद्यालय रेणापूर, द्वितीय वीर हनूमान क्रिडा मंडळ रेणापूर. खो-खो प्रथम श्रीराम विद्यालय रेणापूर., द्वितीय प्रभात क्रिडामंडळ रेणापूर यांनी पारितोषिक पटकावले.

विजेत्या खेळाडूंना ट्रॉफी व प्रमाणपत्र असे देण्यात आले आणि विजेता संघास पुढील स्पर्धा आहे जिल्हास्तरीय होणार आहेत आहे. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी क्रिडाविभाग प्रमूख विवेक भातीकरे, निलेश उगीले, सूरज अकनगिरे यांनी परिश्रम घेतले.

## कानेगावात बालिका दिन उत्साहात साजरा

### बालिका दिनानिमित्त बालसभेतून मुलींनी मोकळ्या केल्या आपल्या भावना

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.३ जानेवारी -**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील कानेगाव येथील जिल्हा परिषद शाळेत दि.३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती 'बालिका दिन' म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी बाल सभेचे आयोजन करण्यात आले होते.

बाल सभेतून मुलींनी आपल्या शिक्षणाविषयी व शिक्षणात येत असलेल्या अडचणी विषयी आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून राधाबाई येडले तर प्रमुख पाहुणे म्हणून पद्मावती बने, पायल स्वामी, सायली शिवणगे, श्रद्धा आटरगे, प्रिया लांडगे यांनी भूमिका वठवली.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यपुरस्कार प्राप्त शिक्षक सुशीलकुमार पांचाळ यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक गंगाधर बोरुळकर, आदर्श शिक्षिका राधाबाई येडले, पद्मावती बने यांनी आपली मनोगत व्यक्त केले.

यावेळी राधा सुर्यवंशी, प्रशांत जाधव, चंद्रसेन ढगे, विश्वनाथ लांडगे आदी उपस्थित होते. यावेळी शाळेतील सर्व चिमुकल्या विद्यार्थिनींनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा साकारली होती. यावेळी शाळेच्या वतीने सर्व सावित्रीच्या लेकींचा पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. तसेच, सावित्रीबाईंच्या प्रतिमेचे पूजनही विद्यार्थिनींनीच्या हस्तेच करण्यात आले.

बालिका दिनानिमित्त सावित्रीबाईंच्या जीवनपटाविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकिता सुरवसे व स्वरांजली लांडगे हिने तर आभार शरद येडले यांनी मानले.

## सावित्रीचा वसा आणि वारसा जपणे हे आजच्या मुलींचे कर्तव्य आहे : प्रा. सुरेखा दहिफळे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३ जानेवारी -**

भारतीय संस्कार आणि संस्कृतीचे जतन करतच सावित्रीचा वसा आणि वारसा जपणे हे आजच्या मुलींचे कर्तव्य आहे असे मत राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. सुरेखा दहिफळे यांनी व्यक्त केले. त्या वाढवणा येथील श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्याल व राजे संभाजी माध्यमिक विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती निमित्त बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजे संभाजी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शरद आमगे तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य युसूफ मुंजेवार, मच्छिंद्र गडीकर, नरसिंग कांबळे उपस्थित होते. परीपाठाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सावित्रीबाई फुले यांच्या कार्याविषयी विद्यार्थ्यांनी सय्यद शबाहद वहाब यांनी मनोगत व्यक्त केले. सावित्रीच्या पाठीशी खंबीरपणे ज्योतिबा उभे होते. जेव्हा महिलांवर संकटे येतात तेंव्हा आजच्या पुरुषांने ज्योतिबा सारखे खंबीरपणे उभे राहिले पाहिजे, असे मत अध्यक्षीय भाषणात शरद आमगे म्हणाले.



कार्यक्रम यशस्वी पडण्यासाठी प्रा. रामदास केदार, प्रा. महादेव इंद्राळे, प्रा. दत्तात्रय मुधाळे, प्रा. विष्णू केंद्रे, प्रा. मनोज मुळे, प्रा. रहीम पठाण, स्मिता हाळणे, गुरुलिंग स्वामी यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचलन प्रा. अनिल मगर तर आभार प्रा. दत्तात्रय मुधाळे यांनी मांडले.

## पशुसखीनी शाश्वत उत्पन्नासाठी मूल्यवर्धनाकडे वळावे : प्रा.डॉ. अनिल भिकाणे




**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३ जानेवारी -**

पशुसखींमध्ये उद्यमिता रूजली पाहिजे. शेळीच्या दुधापासून चीज, पनीर इत्यादी मुल्यवर्धित पदार्थ पशुसखींनी बनविले पाहिजे. अधिक अर्थार्जनासाठी शेळीपालक पशुसखींनी लेंडीखत आणि गांडूळखत निर्मितीचे मार्ग चोखंदळावेत, असे प्रतिपादन महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक प्रा.डॉ. अनिल भिकाणे यांनी उदगीर पशुवैद्यक महाविद्यालयात माविम पुरस्कृत पहिल्या पशुसखी प्रशिक्षणाच्या समारोप प्रसंगी आभासी पद्धतीने प्रमुख अतिथी म्हणून केले.

पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता प्रा.डॉ. नंदकुमार गायकवाड हे अध्यक्षस्थानी होते.

प्रा.डॉ. भिकाणे पुढे म्हणाले की, शेळीपालकांना मुल्यवर्धनातून अधिक अर्थप्राप्ती होऊ शकते. त्याकरिता पारंपरिक दृष्टिकोण सोडून उद्यमितेच्या दृष्टीने शेळीपालन केल्यास पशुसखींना उत्पन्नाचा एक शाश्वत मार्ग प्राप्त होऊ शकतो असा विश्वास प्रकट केला.

समारोपप्रसंगी पशुसखींसोबत चर्चा करून क्षेत्रातील त्यांचे कार्यानुभव आणि प्रशिक्षणाचा त्यांनी आढावा घेतला. अध्यक्षीय भाषणात प्रा.डॉ. गायकवाड म्हणाले की, नवतंत्राच्या यशस्वी प्रयोगाचे समाजात वेगाने अनुकरण होत असते. त्यामुळे प्रशिक्षित पशुसखींनी आत्मसात केलेले ज्ञान आणि कौशल्य स्वतः च्या गोठ्यात प्रथम उपयोगात आणावे. पशुवैद्यकीय क्षेत्रात उपलब्ध संशोधन आणि या संशोधनाचा पशुपालकांच्या गोठयातील प्रत्यक्ष उपयोग यात फार मोठी तफावत आहे.

ही दरी कमी करण्यासाठी अशा तंत्रज्ञानाच्या प्रसाराला गती मिळणे आवश्यक आहे. प्रशिक्षणातून आत्मसात केलेल्या ज्ञानाचा उपयोग पशुसखीने स्वतः आपल्या गोठ्यात करून इतरांना त्याबाबत प्रेरित करावे असे आवाहन केले.

समारोप प्रसंगी मंचावर माविम लातूरचे सहाय्यक जिल्हा समन्वय अधिकारी श्री. दीपक टेकाळे आणि प्रकल्प सह-समन्वयक डॉ. नरेंद्र खोडे हे उपस्थित होते. डॉ. धनंजय देशमुख, प्रकल्प समन्वयक यांनी आभासी पद्धतीने तसेच सहाय्यक जिल्हा समन्वय अधिकारी दीपक टेकाळे यांनी पशुसखींना यथोचित मार्गदर्शन केले. दि.२३ ते २७ डिसेंबर २०२४ दरम्यान घेण्यात आलेल्या श्रृंखलेतील या पहिल्या पाच दिवसीय प्रशिक्षणात लातूर जिल्ह्यातील २६ पशुसखी महिलांनी हिरीरीने सहभाग घेतला.

प्रकल्प सह-समन्वयक डॉ. नरेंद्र खोडे यांनी प्रास्ताविक केले. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या पशुसखींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. मंगल कलढोणे, अश्विनी मस्के, रत्नमाला देडे, मुक्ता कांबळे, रुक्मिणी बैकरे, सुलताना शेख, आणि माया गायकवाड या पशुसखी महिलांनी प्रशिक्षणाबाबत अभिप्राय व्यक्त केला.

सूत्रसंचालन डॉ. राम कुलकर्णी यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. मत्स्यगंधा पाटील यांनी केले. प्रशिक्षणाच्या आयोजनासाठी प्रशिक्षण समन्वयक डॉ. शरद आव्हाड समवेत आयोजन समिती सदस्य, पदव्युत्तर विद्यार्थी डॉ. संकेत नरवाडे, डॉ. अयान पाटील, डॉ. वेदान्त पांडे, डॉ. सुहासिनी हजारे, आणि डॉ. विनोद जाधव यांनी अथक परिश्रम घेतले.

यांप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, कर्मचारी गण, आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.